सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | शनिवार, ७ मार्च २०२६ | वर्ष ३ रे अंक ३६४ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

CHITRA's
City Side Resort

तुमच्या प्रत्येक शुभ कार्याला नेहमीच प्रथम स्थान असणाऱ्या सोलापुरातील पहिल्याच 'चित्राज्, सिटी साईड रिसॉर्ट्स' मध्ये आपले स्वागत आहे...!

## Grand Opening

you are cordially invited to celebrate the Grand Opening of our new
CHITRA'S City Side Resort
by the hands of
Smt. Ranjana Ramesh Jawalkar

### What's Special About Solapur's First Chitra's City Side RESORT...?

- 85 Luxurious Rooms
- 7000 square feet Banquet Hall
- 40000 sq. feet Big Lawn
- 12000 sq. feet Small Lawn

- Water Park
- Adventure Park
- VR games
- Arcade Games
- Toy Train & Many More

**Suitable For**
- Pre Wedding Shoot
- Engagement
- Destination Wedding
- Corporate Programs
- Largest Resorts with Arrangements for Wedding Ceremonies of up to Three Thousand People.

Where memories are made

"CHITRA'S City Side Resort provides the residents of Solapur with a peaceful, safe, and pleasant environment along with a beautiful nature experience, located just 15 kilometers from Solapur."

Saturday, 7th March 2026 at 7:00 pm to 10:00 pm

Venue : 267/1, Akolekati, Kondi-Akolekati Road, Tal. North Solapur, Maharashtra 413 222.

INVITEE

Director


Mr. Dhiraj Ramesh Jawalkar

Director

Mrs. Chitrarekha Dhiraj Jawalkar

CEO

Mr. Kunal Dhiraj Jawalkar
MBA & Diploma in Hotel Management


ENTRANCE

VILLAS

LAWN AREA


TRIPLEX BUILDING

BANQUET HALL

BANQUET HALL

COTTAGES


Samarth Ads



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### कोलकाताहून सात आंतराष्ट्रीय उड्डाणे रद्द

**कोलकाता** : पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षामुळे शुक्रवारी कोलकाताहून आखाती देशांना जाणारी सात आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. पश्चिम आशियातील सध्याच्या परिस्थितीमुळे नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळावरून दुबई, दोहा आणि अबू धाबीला जाणारी आणि जाणारी सात उड्डाणे रद्द करण्यात आली, असे भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या निवेदनात म्हटले आहे. रद्द केलेल्या सेवांमध्ये एअर अरेबिया, एतिहाद एअरवेज, कतार एअरवेज आणि एमिरेट्स द्वारे चालवल्या जाणाऱ्या उड्डाणांचा समावेश आहे.

### एका क्लिकवर मिळणार ऑनलाईन रेशनकार्ड

**नाशिक** : छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान अंतर्गत निफाड तालुक्यात एक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविला गेला आहे. तालुक्यातील सोनेवाडी खुर्द हे गाव आता पहिले 'ऑनलाइन रेशनकार्ड गाव' म्हणून घोषित करण्यात आले आहे. गावातील दुर्गामाता महिला बचत गटाचे रास्तभाव दुकान या उपक्रमाचे केंद्र आहे. गावातील पात्र लाभार्थ्यांची माहिती डिजिटल पद्धतीने अद्ययावत करण्यात आली आहे. या प्रणालीअंतर्गत शिधापत्रिकांची ऑनलाइन नोंदणी, आधार संलग्नता आणि धान्य वितरणाची अंमलबजावणी पूर्ण झाली आहे. गावात एकूण १११ शिधापत्रिकाधारक आहेत.

### चारधाम यात्रेसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू

**डेहराडून** : उत्तराखंडमध्ये चारधाम यात्रेसाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. आता भाविक घरबसल्या मोबाईल, संगणक, मोबाईल ॲप किंवा व्हॉट्सॲपद्वारेही यात्रेसाठी नोंदणी करू शकतात. यात्रेत सहभागी होणाऱ्या सर्व भाविकांसाठी नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. जेणेकरून प्रशासन प्रवाशांची संख्या, सुरक्षा आणि गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे हाताळू शकेल. या वर्षी चारधाम यात्रा १९ एप्रिलपासून सुरू होत आहे. परंपरेनुसार याच दिवशी यमुनोत्री आणि गंगोत्री धामचे दरवाजे भाविकांसाठी उघडले जातील. त्यानंतर २२ एप्रिलला केदारनाथ धाम आणि २३ एप्रिलला बद्रीनाथ धामचे दरवाजे उघडले जातील. ऑफलाईन नोंदणी १७ एप्रिलपासून सुरू केली जाईल. यात्रा सुरू होण्यापूर्वी हरिद्वार, ऋषिकेशसह अनेक प्रमुख ठिकाणी बायोमेट्रिक नोंदणी काऊंटर लावले जातील, जेणेकरून ज्या भाविकांकडे इंटरनेटची सुविधा नाही तेही सहजपणे नोंदणी करू शकतील.

### कामगारांना ट्रकने चिरडले दोघांचा मृत्यू, तीन जखमी

**छ. संभाजीनगर** : छ. संभाजीनगरजवळ समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला. सीसीटीव्ही बसवण्याचे काम करणाऱ्या कामगारांना भरधाव ट्रकने चिरडले. यात दोघांचा जागीच मृत्यू, तर तीन जण गंभीर जखमी झाले. जखमींना छ. संभाजीनगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. दुपारच्या वेळी जेसीबीच्या बाजूला बसून जेवण करत असताना जेसीबीसह कामगारांना ट्रकने उडवले. समृद्धी महामार्गावरील ४०६ पॉईंटवर सीसीटीव्ही बसवण्याचे काम सुरू होते. शुक्रवारी दुपारच्या सुमारास काही कामगार जेसीबीच्या बाजूला जेवण करीत होते. त्याच वेळी भरधाव ट्रकने अचानक जेसीबी आणि तेथील कामगारांना जोरदार धडक दिली. यात दोन कामगारांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि महामार्ग सुरक्षा पथक घटनास्थळी दाखल झाले.

# ७५ हजार पदांची भरती होणार

## देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

◆ **मुंबई, ६ मार्च**

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा करीत राज्यात आणखी ७५ हजार पदांची भरती करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. राज्यातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सरकारने हा महत्त्वाचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर आतापर्यंत राज्यात मोठ्या प्रमाणावर सरकारी पदांची भरती करण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांत विविध विभागांमध्ये मिळून सुमारे १ लाख २० हजार पदे भरली गेली आहेत. या भरती



प्रक्रियेमुळे प्रशासन अधिक सक्षम झाले असून, अनेक विभागांमधील रिक्त पदांचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर कमी झाला आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

याचबरोबर राज्यातील रिक्त पदे टप्प्याटप्प्याने भरून काढण्याचा सरकारचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पुढील काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोग म्हणजेच एमपीएससी तसेच इतर भरती यंत्रणांच्या माध्यमातून आणखी ७५ हजार पदांची भरती करण्यात येणार आहे. ही भरती विविध विभागांमध्ये केली जाणार असून, प्रशासनातील मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यावर भर दिला जाणार आहे. सरकारी नोकरीची वाट पाहणाऱ्या लाखो तरुणांसाठी ही घोषणा महत्त्वाची मानली जात आहे. गेल्या काही वर्षांपासून सरकारी भरतीची मागणी करण्यात येत होती. त्यानुसार आता राज्य सरकारने मोठ्या प्रमाणावर पदभरती करण्याचा निर्णय घेतला आहे. *(तभा वृत्तसेवा)*

## स्वतंत्र एआय विभागाची घोषणा



**राज्य** प्रशासनात पारदर्शकता, गतिमानता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर करताना अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून सरकारी कारभार पूर्णपणे कागदविरहित करण्यावर भर देणार असल्याची घोषणा केली.

महाराष्ट्राला जागतिक तंत्रज्ञान केंद्र बनवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि एआय विभाग स्वतंत्रपणे स्थापन केला जाणार आहे. या विभागाला बळकटी देण्यासाठी स्वतंत्र आयुक्तालय आणि माहिती-तंत्रज्ञान संवर्ग निर्माण केला जाईल. एआय, क्वांटम संगणन, ड्रोन आणि डीपटेक सारख्या क्षेत्रांसाठी विशेष धोरण आखून राज्याला या क्षेत्रात जगात आघाडीवर नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

नागरिकांना घरबसल्या सेवा मिळाव्यात यासाठी आपले सरकार २.०, मैत्री २.० आणि महाडीबीटी २.० ही पोर्टल्स नव्या स्वरूपात विकसित केली जात आहेत. यासोबतच संपूर्ण राज्याचा कारभार १०० टक्के ई-ऑफिस आणि कागदविरहित करण्यासाठी जमिनीचे सर्व व्यवहार संगणीकृत केले जाणार आहेत.

### नागपुरात होणार स्टेट डेटा सेंटर

जमिनीच्या व्यवहारांमधील फसवणूक रोखण्यासाठी आणि मालकी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सरकार महाराष्ट्र भूमी मालकी हक्कधारी अधिनियम आणणार आहे. वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पृष्ठभूमीवर राज्याचे स्वतंत्र सायबर सुरक्षा धोरण तयार केले जाणार असून, डेटा सुरक्षिततेसाठी नागपूर येथे अत्याधुनिक स्टेट डेटा सेंटर उभारले जाईल.

**शिक्षण आणि जिओ-टेक्नॉलॉजीवर भर**

अमरावती जिल्ह्यातील शिक्षण विभागाची सर्व कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख शैक्षणिक संकुल उभारले जाणार आहे. अचूक नियोजनासाठी राज्यात महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी अप्लिकेशन सेंटरची स्थापना केली जाणार असल्याची घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर करताना केली.

### अर्थसंकल्पात सर्व घटकांच्या विकासाचा संकल्प : डॉ. उईके

राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात सर्वसामान्यांचे प्रतिबिंब उमटले आहे. शेतकरी, शेतमजूर, दलित, आदिवासी, महिला, दुर्बल घटक आदिंच्या विकासाचा संकल्प अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार नेहमीच सामान्य नागरिकांचा विचार करून आर्थिक धोरणे राबवित असल्यामुळे लोकांचे जीवनमान सुकर झाले आहे.



आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी बजेटमध्ये २१७२३ कोटी रुपयांची भरघोस तरतूद केली आहे. यात राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजना, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, डॉ. एपीजे अबुल कलाम अमृत आहार योजना, नमो आदिवासी स्मार्ट शाळा अभियान, आदर्श आश्रमशाळा, भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना, पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना आदींचा समावेश आहे. राज्यातील जनतेला या अर्थसंकल्पामुळे दिलासा मिळणार आहे, असे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र अमृतकाळ रस्ते विकास योजना २०२५-२०४७

- ६२७२ किमी द्रुतगती मार्ग
- १४,९१९ किमीचे राज्य व जिल्हा मार्ग
- ४२४७ किमी पर्यटन परिपथ समावेश
- ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेच्या वाटचालीस बळ

### महाराष्ट्र देशाचे आर्थिक इंजिन

- विकसित भारत-२०४७ च्या स्वप्नपूर्तीत महाराष्ट्राचा वाटा सर्वाधिक असणार
- १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे जलद गतीने वाटचाल
- २०४७ पर्यंत ५ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट

### महाराष्ट्र-मेट्रोराष्ट्र



- मुंबई, पुणे व नागपूर : ४९० किमी मेट्रोचे जाळे । १७३ किमीच्या मार्गिका खुल्या
- येत्या वर्षात ५० किमीचे नियोजन । २०२९ पर्यंत आणखी १६५ किमीचे नियोजन

### वाहतूक व मालपुरवठा व्यवस्थापन

- प्रवासी व मालवाहतुकीसाठी अखंड संपर्क जाळे स्थापित करण्याचे उद्दिष्ट
- मेट्रोचे जाळे १२०० किमीपर्यंत वाढविणार
- द्रुतगती मार्गाचे जाळे ६००० किमीपर्यंत वाढविणार

### नवीन नागपूर व्यापार व वित्तीय केंद्र

- नागपूर शहराच्या आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी नवीन नागपूर या नावाने व्यापार व वित्तीय केंद्र विकसित करणार
- नागपूर शहराच्या विस्तार व विकासाला चालना देण्यासाठी नागपूर रिंगरोडला मान्यता

### शाश्वत शहरी विकास

- २०४७ पर्यंत राज्याची नागरी लोकसंख्या ७० टक्के व त्यांचे जीडीपीतील योगदान ७५-८० टक्के असेल. यासाठी शहरांचा शाश्वत विकास घडवून आणणे अत्यंत महत्त्वाचे
- १० पेक्षा जास्त सक्षम प्रादेशिक प्राधिकरणे स्थापन करणार
- ५० पेक्षा जास्त सुनियोजित शहर समूह विकसित करणार
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सेवा १०० टक्के डिजिटाइज करणार

### जय श्रीराम



- नाशिक येथे रामकाल पथ विकास प्रकल्प
- राज्यातील तिसरी चित्रनगरी नवरगाव, रामटेक (नागपूर) येथे विकसित करणार
- रामटेक (नागपूर) येथे रामसृष्टी व कालिदास सृष्टी उभारली जाणार
- महाकवी कालिदास यांच्या जीवनावर आधारित चित्रपट तयार करणार

### विविध पर्यटन प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर

- महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याचे व रणनीतीचे प्रतीक असलेल्या साताऱ्यातील वासोटा किल्ला येथे रोप-वे प्रकल्प
- राज्यातील पाच ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्याकडे
- पंढरपूर मंदिर विकास आराखडा टप्पा १ पूर्णत्वाकडे, पुढील टप्पा प्रगतीपथावर
- महानुभाव पंथीयांच्या विविध धार्मिक स्थळांच्या विकासाची कामे प्रगतीपथावर
- महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त ५० पर्यटन स्थळी पायाभूत सुविधा अत्याधुनिक करणार

### शाश्वत पर्यटनाला प्रोत्साहन

- पर्यटकांची संख्या १६ कोटींवरून ३८ कोटींपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट
- मुंबई, सिंगापूर आणि दुबईमध्ये पर्यटन गुंतवणूक कक्ष स्थापन करणार
- प्रवास १०० टक्के डिजिटाइज करून पर्यटन परिसंस्था निर्माण करणार

### सेवा क्षेत्राच्या उत्पन्नात ९-१० पट वाढीचे उद्दिष्ट

- सेवा क्षेत्राचा जीडीपी ३१२ अब्ज डॉलर्सवरून ३००० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढविणार
- ३० लाखांपेक्षा अधिक रोजगार निर्मितीची क्षमता
- महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र- जीसीसी धोरण जाहीर
- ४०० नवीन क्षमता केंद्रे व ४ लाख नोकरीच्या संधी निर्माण होणार
- व्यवसाय सुलभता, संस्थात्मक संरचना, राज्य व केंद्र शासनाच्या कार्यक्रमांचे अभिसरण यावर विशेष भर
- पुणे हे जीसीसीसाठी देशातील सर्वाधिक पसंतीचे स्थान




### उद्योग



- उद्योग अर्थव्यवस्था १२ पटीने वाढविण्याचे उद्दिष्ट
- उद्योग क्षेत्रात जीडीपी १२३ अब्ज डॉलर्सवरून १५०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढविणार
- महाराष्ट्राला जागतिक उत्पादनाचे केंद्र बनविणार
- उच्च विकासाची क्षमता असलेल्या क्षेत्रांसाठी मूल्यसाखळ्यांची निर्मिती
- प्रत्येक उदयोन्मुख जिल्ह्यात औद्योगिक समूह
- सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी अर्थसहाय्य

### महिला



- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी भरीव तरतूद
- अंगणवाडी सेविकांना आर्थिक नियोजनाबाबत प्रशिक्षण, योजनेतील लाभार्थ्यांना आर्थिक साक्षर करुन लाभाचे व्यवस्थापन, गुंतवणुकीचे मार्गदर्शन करणार.
- **एकल महिला धोरण** : सर्व जिल्ह्यात एकल महिलांचे सर्वेक्षण सुरु असून, अहवालाचे विश्लेषण करुन धोरण आणणार.
- **लखपती दीदी** : राज्यात २७ लाख लखपती दीदी झाल्या.

# वाहन खरेदीदारांना दिलासा



राज्याच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात सामान्य नागरिक आणि वाहन खरेदीदारांसाठी अत्यंत महत्त्वाचे बदल सुचवण्यात आले आहेत. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी जुनी वाहने मोडीत काढणाऱ्यांना कर सवलत जाहीर करण्यात आली आहे, तर दुसरीकडे दस्त नोंदणीत होणारी फसवणूक रोखण्यासाठी दंडाच्या रकमेत मोठी वाढ करण्यात आली आहे.

### जुन्या गाड्या द्या आणि नवीन खरेदीवर कर सवलत मिळवा

वायू प्रदूषण कमी करण्यासाठी सरकारने जुनी वाहने बाद करण्याच्या प्रक्रियेला प्रोत्साहन दिले आहे. बीएस ४ किंवा त्यावरील प्रदूषण मानके असलेली जुनी गाडी देऊन नवीन गाडी खरेदी केल्यास मोटार वाहन करात १६ टक्के सूट मिळेल.



खूप जुनी म्हणजे बीएस ३ किंवा त्यापेक्षा खालची मानके असलेली गाडी बाद करून नवीन गाडी घेतल्यास ३० टक्के सूट दिली जाणार आहे. यामुळे कमी इंधन पिणारी आणि प्रदूषण करणारी जुनी वाहने कमी होऊन हवेची गुणवत्ता सुधारेल.

### जुन्या खासगी गाड्यांना 'ग्रीन टॅक्स'चा फटका

ज्या खासगी गाड्या प्रदूषण जास्त करतात, अशा वाहनांच्या पर्यावरण करात सरकारने दुप्पट वाढ प्रस्तावित केली आहे.

बीएस ४ आणि त्याखालील मानके असलेल्या खासगी गाड्यांना आता पूर्वीपेक्षा दुप्पट कर भरावा लागेल. दुचाकीसाठी कर २ हजार वरून ४ हजार रुपये, हलक्या मोटार वाहनांसाठी ३ हजार वरून ६ हजार रुपये, आणि डिझेल गाड्यांसाठी ३,५०० वरून ७ हजार रुपये प्रस्तावित आहे.

### क्रेन आणि मोठ्या वाहनांसाठी कर मर्यादा

राज्याबाहेर नोंदणी होणाऱ्या मोठ्या क्रेन महाराष्ट्रातच नोंदणी व्हाव्यात यासाठी त्यांच्या कराची कमाल मर्यादा ३० लाख रुपये करण्यात आली आहे. *(तभा वृत्तसेवा)*

# मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी

◆ **बंगळुरू, ६ मार्च**

कर्नाटकने ऑस्ट्रेलियाचे अनुसरण करत १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. ऑस्ट्रेलियाच्या कठोर निर्णयानंतर, कर्नाटक असे पाऊल उचलणारे देशातील पहिले राज्य बनण्याच्या तयारीत आहे. याबाबत मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शुक्रवारी कर्नाटक विधानसभेत अर्थसंकल्प सादर करताना ही घोषणा केली.




कर्नाटकचे आयटी आणि बीटी मंत्री प्रियांक खरगे यांनी ३० जानेवारीला विधानसभेत सांगितले की, तरुणांमध्ये सोशल मीडियाचा वापर वाढत असल्याने सरकार कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि सोशल मीडियाचा जबाबदार वापर सुनिश्चित करण्यासाठी गंभीर पावले उचलण्याचा विचार करत आहे. प्रियांक खर्गे म्हणाले, ही एक गंभीर समस्या आहे. फिनलंडने कारवाई केली आहे. यूकेही अशाच प्रकारच्या पावलांवर विचार करत आहे आणि ऑस्ट्रेलियाने आधीच विशिष्ट वयाखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घातली आहे. सोशल मीडियाच्या अतिरेकी प्रभावापासून मुलांना वाचवण्यासाठी आम्ही तज्ञ आणि भागधारकांशी चर्चा सुरू केली आहे. *(वृत्तसंस्था)*

# राज्यात ४८ लाख कुणबी प्रमाणपत्रांची नोंद

◆ **पुणे, ६ मार्च**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मागील काही वर्षांत झालेल्या आंदोलकांना मोठा दिलासा मिळाला आहे. २०१५ नंतर हा मुद्दा राजकारणाच्या आणि समाजकारणाच्या पटलावर आघाडीवर आला होता. यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण आणि मोर्च्यांसह राज्यभर जोरदार आंदोलने केली. यामुळे महायुती सरकारच्या काळात मुंबईत दोनदा मोठे मोर्चे धडकले.

अलिकडेच मिळालेल्या माहितीनुसार, न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीच्या कामकाजानंतर राज्यात ४८ लाख कुणबी नोंदी आढळल्या असून याआधारे आतापर्यंत एकूण १२ लाखांहून अधिक कुणबी प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. मागील सहा महिन्यात छत्रपती संभाजीनगर विभागात ४९,९५८ प्रमाणपत्रे तर बीड जिल्ह्यात ३४,६९२ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातही कुणबी नोंदी आणि प्रमाणपत्र वितरणाचे काम सुरू असून मनोज जरांगे पाटील यांनी याला गती देण्याची मागणी केली आहे.

मराठा आरक्षण आणि हैदराबाद गॅझेटियरची अंमलबजावणी याविषयी शासनाच्या निर्णयाविरुद्ध दाखल झालेल्या याचिकांचा आढावा घेण्यासाठी स्पेशल कौन्सिलची नियुक्ती करण्यात येणार आहे. सातारा गॅझेटियर लागू करण्यासाठी पुणे विभागीय आयुक्तांना अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय मराठा आरक्षण आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, महावितरण, महापारेषण आणि महानिर्मितीमध्ये नियुक्ती मिळावी, असे निर्देश मराठा उपसमितीने दिले आहेत. *(वृत्तसंस्था)*

# राज्यातील ६० उमेदवारांचा 'यूपीएससी'त डंका


## अनुज अग्निहोत्री देशात तर हृषीकेश आलासे महाराष्ट्रातून पहिला

◆ **नवी दिल्ली. ६ मार्च**

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे ९५८ पदासाठी घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षा -२०२५ चा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. यात राज्यातील ६० हून अधिक उमेदवार उत्तीर्ण झाले. पहिल्या १०० उमेदवारांमध्ये महाराष्ट्रातील पाच उमेदवारांचा समावेश आहे. ऋषीकेश आलासे ६१ व्या क्रमांकासह महाराष्ट्रात पहिला आहे, तसेच आकाश त्रिवेदी ७३, गौरव चोपडा ८३, सायली पगार ८७, तर दीक्षा पाटकर यांनी ८८ वा क्रमांक पटकावला.

केंद्र शासनाच्या विविध सेवांमधील रिक्त जागांसाठी ऑगस्ट २०२५ मध्ये मुख्य परीक्षा घेण्यात आली. डिसेंबर २०२५-फेब्रुवारी २०२६ दरम्यान उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

### अनुज अग्निहोत्री देशात अव्वल



यूपीएससी नागरी सेवा परीक्षेत राजस्थानमधील कोटा येथील अनुज अग्निहोत्री देशात पहिला आला, तर राजेश्वरी सुवे दुसऱ्या, तर एकांश दुल यांनी तिसरे स्थान पटकावले. पहिल्या दहामध्ये राघव झुनझुनवाला, ईशान भटनागर, जिनिया अरोरा, ए. आर. राजा मोहद्दीन, पक्षाल सेक्रेटरी, आस्था जैन आणि तेजस्वी प्रियांक यांचा समावेश आहे.




**नागपूरच्या आठ विद्यार्थ्यांचे दमदार यश**

राज्य सरकारच्यावतीने चालविण्यात येणाऱ्या भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्राच्या नागपूर केंद्रातून आठ विद्यार्थी यूपीएससीच्या नागरी सेवा परीक्षेत उत्तीर्ण झाले.यातील दोन विद्यार्थी मागील वर्षीदेखील उत्तीर्ण झाले होते. नागपूर केंद्रातील ऋतुजा गायकवाड (१०६), रजत वाळके (५१४), भाग्यश्री नैकाले (६४७), चेतन ठाकरे (६६२), प्रज्वल नासरे (६७७), राजश्री देशमुख (७५४), प्रांजली मेश्राम (७६७), हेमकृष्ण पिसाडे (८४९) आणि सुरेश बोरकर (९१२) यांनी यश मिळवले.

**प्रांजलीला दुसऱ्या प्रयत्नात यश**

नागपूरच्या २३ वर्षीय प्रांजली मेश्राम हिने परीक्षेत दुसऱ्या प्रयत्नात यश मिळवत ७६७ वा क्रमांक पटकावला आहे. तिची आई मंगला मेश्राम या खाजगी शाळेत शिक्षिका आहेत, तर वडील प्रवीण मेश्राम हे जिल्हा परिषद शाळेतील निवृत्त शिक्षक आहेत. आई-वडिलांच्या पाठिंब्यामुळेच यश मिळाल्याचे तिने 'तरुण भारत'शी संवाद साधताना सांगितले. *(तभा वृत्तसेवा)*

### किराणा दुकानदाराच्या मुलाची भरारी



**कारंजा (घा.)** : तालुक्यातील ठाणेगाव येथील प्रज्वल धनराज नासरे याने यूपीएससी परीक्षेच्या निकालात भारतातून ६७७ वा क्रमांक मिळवत कारंजा तालुक्याच्या यशात मानाचा तुरा रोवला. त्याचे वडील किराणा दुकानदार आहेत तर आई गृहिणी आहे. प्रज्वलने परीक्षेकरिता कुठेही कोचिंग लावले नाही. घरीच राहून ऑनलाईन कोचिंग करून यश मिळविले. तिसऱ्या प्रयत्नात त्याने परीक्षा उत्तीर्ण केली.

# शिवरस्त्यासाठी शेतकऱ्यांचा आत्मदहनाचा प्रयत्न; तहसीलदारांच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.६ मार्च -**

करमाळा तालुक्यातील कंदर-सातोली येथील बंद पडलेल्या शिवरस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी या मागणीसाठी शुक्रवारी (दि.६ मार्च) शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन करीत अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे मोठा अनर्थ टळला. अखेर तहसीलदारांनी दूरध्वनीवरून रस्ता दुरुस्त करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले. मात्र १० मार्चपर्यंत रस्त्याचे काम सुरू झाले नाही, तर ११ मार्च रोजी पुन्हा आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. कंदर-सातोली हा पारंपरिक शिवरस्ता असून या मार्गावर अनेक शेतकऱ्यांच्या शेतीजमिनी, घरे तसेच शाळा आहेत.

मात्र गेल्या तीन वर्षांपासून हा रस्ता अडवला गेल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या संदर्भात स्थानिक शेतकऱ्यांनी २०२३ पासून प्रांत कार्यालयासह संबंधित प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. शुक्रवारी आंदोलना दरम्यान अजित फरतडे, नागनाथ चव्हाण आणि राजेंद्र जगताप या शेतकऱ्यांनी संतप्त होऊन अंगावर डिझेल ओतून



आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी घटनास्थळी उपस्थित असलेले नायब तहसीलदार विजयकुमार जाधव व विजयकुमार लोकरे यांच्याकडून स्पष्ट भूमिका घेतली जात नसल्याने शेतकरी अधिक आक्रमक झाले.

तहसीलदार प्रत्यक्ष उपस्थित नसल्यानेही आंदोलनकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण झाली. परिस्थिती तणावपूर्ण बनताच पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना समजावून घेतले आणि पुढील अनर्थ टाळला. या वेळी करमाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक टिळेकर तसेच इतर पोलीस अधिकारी, महसूल विभागाचे मंडळ अधिकारी, तलाठी आदी उपस्थित होते. आंदोलनात महिलांसह सुमारे शंभरहून अधिक शेतकरी सहभागी झाले होते.

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, ७ मार्च २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प



प्रत्येकातल्या भारतीयतेला जागृत करून त्यांच्याकडून काम करून घ्यायला हवे. प्रत्येकातील भारतीयता, प्रत्येकातला हिंदू, वेदांती जागृत व्हायला हवा. तुम्ही वरचे आवरण खरवडून पाहा. तुम्हाला दिसेल की, प्रत्येक जण या भूमीचा पुत्र आहे.

**एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ

## शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनाची पूर्ती ● नियमित कर्ज फेडणाऱ्यांना ५० हजारांचे अनुदान

◆ **मुंबई, ६ मार्च**

**विधानसभा निवडणुकीच्या काळात शेतकरी कर्जमाफीचे दिलेले आश्वासन महायुती सरकारने पूर्ण करताना पात्र शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ केल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. तसेच नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांची मदत करण्याचेही त्यांनी जाहीर केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राचा २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प विधानसभेत सादर केला. दिवंगत उपमुख्यमंत्री तथा माजी अर्थमंत्री अजित पवार यांना हा अर्थसंकल्प समर्पित करत असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.**

शेतकरी कर्जमाफीसाठी विशेष समिती गठित करण्यात आली असून तिच्या शिफारशींनुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जाहीर करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ दिले जाईल. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.







### कृषी क्षेत्रासाठीचे महत्त्वपूर्ण मुद्दे

- गोपीनाथ मुंडे अपघात योजनेत शेतमजुरांचा सहभाग.
- पाणंद रस्त्यांना मान्यता.
- ३० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना हवामान, बाजारभाव माहिती दिली जात आहे.
- चारही कृषी विद्यापीठांत एआयची मदत घेतली जात आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे.
- ॲग्रीस्टॅक योजना राबविण्यात येत आहे.
- १ कोटी ३१ लाख फार्मर आयडी फेब्रुवारीपर्यंत झाले आहेत.
- चार वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील.
- आगामी दोन वर्षांत महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात.
- गोपीनाथ मुंडे मंडळात आता शेतमजुरांचाही समावेश
- महिला गोपालक, शेळी पालकांसाठी विशेष योजना राबविण्यात येईल.

## २०४७ पर्यंत महाराष्ट्राची पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था

### महत्त्वाचे निर्णय

#### शेती क्षेत्र

- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना
- पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी
- नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन
- नैसर्गिक शेती अभियानातून ५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली
- कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर

#### पाणी व सिंचन

- ग्रामीण भागात दरडोई ५५ लिटर व शहरी भागात १३५ लिटर पाणी उपलब्धतेचे लक्ष्य
- नदीजोड प्रकल्पांची घोषणा
- शहरांमध्ये सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर प्रकल्प

#### उद्योग व रोजगार

- १८ अतिविशाल औद्योगिक केंद्रे उभारणार
- प्रत्येक जिल्ह्यात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग केंद्र
- ५० लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट
- गडचिरोली येथे स्टील हब प्रकल्प
- मुंबई व पुणे येथे मीडिया-टेक केंद्र

#### पायाभूत सुविधा

- राज्यात १२०० कि. मी. मेट्रो जाळे
- ६ हजार कि. मी. द्रुतगती मार्गांचे जाळे
- वाढवण बंदर, तिसरी मुंबई, नवीन विमानतळ विकास
- जलमार्ग जाळे १२५ कि. मी. वरून ३४० कि. मी.

*(तभा वृत्तसेवा)*



### ठाकरे-शिंदेंचे खांदे एकमेकांना लागता-लागता राहिले; विधानभवनात घडला प्रसंग

**मुंबई** : मुंबईतील विधानभवनात आज एक वेगळाच राजकीय क्षण पाहायला मिळाला. सत्ताधारी शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे व विरोधी बाकावरील ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे दोघेही गर्दीतून आपल्या मार्गाने सरळ चालत असताना अचानक समोरासमोर आले. त्यावेळी सभागृहाच्या परिसरात मोठी गर्दी होती. त्यामुळे या दोन्ही नेत्यांचे खांदे एकमेकांना लागतात की काय? अशी स्थिती निर्माण झाली. पण शेवटच्या क्षणी दोघेही थोडे बाजूला सरकल्याने प्रत्यक्ष धडक टळली. हा क्षण पाहणाऱ्यांसाठी चर्चेचा विषय ठरला.

विकसित महाराष्ट्रासाठी जी थीम तयार केली आहे, त्यावर आधारित हा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प सर्व समावेशक आहे. उत्पादन खर्च २५ टक्क्यांनी कमी आणायचा आणि उत्पादकता वाढवायची, असा हा अर्थसंकल्प आहे. विकसित महाराष्ट्र २०४७ या संकल्पनवरून हा अर्थसंकल्प तयार केला आहे.
**- मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, व्हिजन असलेला व्हिजनरी आणि खंबीर वाटचाल करणारा अर्थसंकल्प आहे. अनेक प्रकल्प घेतले, अनेक योजना बंद होणार असे बोलले जात होते. मात्र, आम्ही अनेक गोष्टी घेतल्या, रस्त्यांचे जाळे निर्माण करणार आहोत.
**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

हा अर्थसंकल्प विकसित महाराष्ट्राच्या दृष्टीने चालना देणारा आहे. दादांनी मांडलेल्या अर्थसंकल्पासोबत सुसंगत अशी मांडणी ह्या अर्थसंकल्पाची दिसून येते. महाराष्ट्राच्या प्रगतीचा वेग अर्थसंकल्पातून करण्यात आला.
**उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार**

राज्याची आर्थिक परिस्थिती ही कशी आहे हे सगळ्यांना माहीत आहे. कर्ज काढून फटाके फोडणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून राज्याचे काही हित सध्या होईल, असे वाटत नाही. सरकारला शेतकऱ्यांचे खरेच काही भले करायचे असेल तर पात्र-अपात्र हा शाब्दिक खेळ न करता ज्याप्रमाणे आम्ही कालबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्त केले होते, तसे त्यांनी करावे.
**-उद्धव ठाकरे,** उबाठा गटाचे प्रमुख

हा अर्थसंकल्प संपूर्ण महाराष्ट्राचा नसून केवळ मुंबई आणि क्षेत्रासाठी असल्यासारखा वाटतो. ग्रामीण भागातील जनतेसाठी, विशेषतः नंदुरबारसारख्या दुर्गम जिल्ह्यांसाठी या बजेटमध्ये कोणतीही ठोस तरतूद नाही.
**- विजय वडेट्टीवार,** काँग्रेस नेते




SIP चे फायदे
मार्केटच्या टाइमिंग पासून स्वातंत्र्य
दीर्घ कालावधीत धनसंचय करण्यासाठी उपयुक्त
शिस्तबद्ध वेल्थ क्रिएशन

बरणी पासून स्वातंत्र्य
HDFC MUTUAL FUND
BHAROSA APNO KA

गुंतवणूकदारांसाठी प्रशिक्षण आणि जागरूकता उपक्रम
SIP - सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेन्ट प्लॅन | म्युच्युअल फंडात गुंतवणूक करण्यासाठी नो युवर कस्टमर (केवायसी) च्या आवश्यकता एकदाच पूर्ण करण्यासंबंधी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी https://www.hdfcfund.com/information/key-know-how येथे भेट द्या. गुंतवणुकदारांनी फक्त नोंदणीकृत म्युच्युअल फंडांसोबत व्यवहार करावा, ज्यांचा तपशील सेबीच्या वेबसाईटवर (www.sebi.gov.in/intermediaries.html) तपासून पाहता येईल. कोणत्याही प्रकारची चौकशी, तक्रार असल्यास किंवा तक्रार निवारणासाठी गुंतवणुकदार एएमसीज आणि/किंवा इन्व्हेस्टर रिलेशन्स अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकतात. त्याचबरोबर, गुंतवणूकदार एएमसीजकडे थेट तक्रारी नोंदवू शकतात, एएमसीज कडून देण्यात आलेल्या उत्तराने त्यांचे समाधान झाले नाही तर https://scores.sebi.gov.in/ वरील स्कोअर्स पोर्टलद्वारे ते तक्रार करू शकतात. स्कोअर्स पोर्टल द्वारा गुंतवणूकदारांना सेबी कडे ऑनलाईन तक्रार नोंदविण्याची आणि नंतर त्याची स्थिती तपासून पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे. जर एएमसीजकडे थेट केलेल्या अथवा स्कोअर्स पोर्टलद्वारे केलेल्या तक्रारीवर मिळालेल्या प्रतिसादाने गुंतवणूकदारांचे समाधान झाले नाही तर ते https://smartodr.in/login वरील स्मार्ट ओडीआर वर कोणतीही तक्रार नोंदवू शकतात.
अधिक माहितीसाठी एमएफडी/आरआयए यांच्याशी संपर्क साधा | एसआयपीजची माहिती करून घ्या: hdfcfund.com/sip
म्युचुअल फंडातील गुंतवणूक बाजारातील जोखमींच्या अधीन असते, योजनेशी संबंधित सर्व दस्तावेज काळजीपूर्वक वाचावेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# दूरदृष्टीचा अर्थसंकल्प

सध्याची जागतिक परिस्थिती अस्थिर आहे. कितीही नाही म्हटले तरी जगातील प्रत्येक आर्थिक आणि सामाजिक घडामोडीचा परिणाम सामान्यांवर होतोच; मग ते त्या देशातील निवासी असोत वा नसोत. वर्तमानात जगभर अनेक संघर्ष सुरू आहेत. इस्रायल विरुद्ध हमास, रशिया विरुद्ध युक्रेन आणि यांत भर म्हणून इराण-अमेरिका-इस्रायल असा संघर्ष सुरू झाला आहे. आखाती देश त्यात प्रत्यक्ष होरपळत आहेत. त्याची अप्रत्यक्ष झळ भारतालाही बसते आहे. पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने इंधन महागण्याची चिन्हे दिसत आहेत. इंधन महागले की सारेच महागते. संघर्ष लवकर संपले नाहीत तर वाढत्या उष्णतामानासोबत महागाईच्या झळा आपल्या साऱ्यांना पोहोचू लागतील, याचा अंदाज आताच करता येतो. या पृष्ठभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला महाराष्ट्राचा अर्थसंकल्प बराच दिलासा देणारा आणि त्यातही शेतकऱ्यांसाठी फार आशादायक म्हणावा लागेल. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या विचारांचा पल्ला किती मोठा आहे, हेही या अर्थसंकल्पातून दिसून येते.

कोणताही अर्थसंकल्प आणि कोणतेही सरकार सर्वांचे समाधान एका बजेटमध्ये करू शकत नाही. विकास ही जशी सतत चालणारी प्रक्रिया असते, तसेच अर्थसंकल्पाचे असते. भूतकाळाचा आढावा घेऊन पुढील वर्षभर कोणत्या दिशेने जायचे, कोणत्या कामावर किती खर्च करायचा, कशावर भर द्यायचा, कोणत्या कामांना वेग द्यायचा हे अर्थसंकल्पाद्वारे ठरविले जाते. त्या दृष्टीने पाहिले तर शेतकरी-शेती ते स्टार्ट अप्स अशा मोठ्या 'रेंज'मध्ये अनेकानेक विषय कवेत घेणारा आणि त्यातही शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा हा अर्थसंकल्प आहे. कर्जमाफी हा बहुप्रतीक्षित आणि मोठा दिलासा आहेच. महागाईची चाहुल पाहता ही घोषणा फार महत्त्वाची ठरते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर झाली आहे. त्यानुसार ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकित असलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी आणि नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन राशी, असे या कर्जमाफी योजनेचे स्वरूप असेल. त्यासोबतच बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यावर लक्ष दिले जाणार असून समितीच्या शिफारसींनुसार शेतकऱ्यांना कायमस्वरूपी कर्जमुक्त करण्यासाठी पावले उचलण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे. याशिवाय, पिकांची मूल्यसाखळी तयार करून शेतमालाला जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याचे प्रयत्न, ॲग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी आदी प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून एकात्मिक व्यवस्थेची उभारणी, कृषी क्षेत्रात एआयचा वापर, एआय क्षमता आणि कृषी स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विद्यापीठांना जबाबदारी, प्राकृतिक शेती अभियान, बळीराजा मोफत वीज योजना सुरू ठेवण्याचा निर्णय अशा इतरही तरतुदी या अर्थसंकल्पात आहेत आणि त्या शेतकऱ्यांचे भले पाहण्यासाठी आहेत. महाराष्ट्राचे शहरीकरण वेगाने होत आहे. महाराष्ट्राची साधारणतः ६० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शहरांमध्ये किंवा शहरांच्या भोवती असलेल्या उपनगरी वसाहतींमध्ये राहते. अशा राज्यात केवळ शहरांसाठी काम करून भागत नसते. कारण ग्रामीण भागात राहणाऱ्यांची संख्या अजूनही ४० टक्क्यांच्या आसपास आहे आणि त्यांच्या जगण्या-मरण्याचे प्रश्न हे शेतीशी संबंधित आहेत. हे ओळखून शेती व शेतकऱ्यांसाठी भरीव तरतुदी आणि योजना आणल्याबद्दल महाराष्ट्र सरकारचे अभिनंदन केले पाहिजे.

२०४७ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्सची करणार, असे आश्वासन सरकारतर्फे देतानाच शेतीचा जीडीपी ९ ते १० पट वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले आहे आणि त्यासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत, हे या अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य. हा अर्थसंकल्प एकूण चार स्तंभांवर आधारित असल्याचे सरकारने सांगितले. प्रगतिशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासनाभिमुख असा हा अर्थसंकल्प असल्याची ग्वाही दिली गेली. प्रत्येक स्तंभात ४ उपक्षेत्रे गृहीत धरून एकूण १६ उपक्षेत्रांच्या भोवती या अर्थसंकल्पाच्या तरतुदी फिरतात. शेतीला जोडून सिंचन आणि पाणी या दोन विषयांबद्दल भविष्यवेधी दृष्टिकोनाचा अंगीकार या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. २०४७ सालातील विकसित भारताच्या उद्दिष्टाशी समांतर विकासाची दिशा म्हणून ग्रामीण भागात प्रतिदिन दरडोई ५५ लिटर्स आणि शहरांत दरडोई १३५ लिटर पाण्याच्या उपलब्धतेचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. शेतीच्या सिंचनासाठीही वेगवेगळ्या योजना घोषित करण्यात आल्या आहेत. लाडकी बहीण योजनेसाठी भरीव तरतूद, एकल महिलांचे सर्वेक्षण, लखपती दीदी, महिला बचत गटाच्या वस्तूंच्या विक्रीसाठी उमेद मॉल या तरतुदी भगिनींसाठी महत्त्वाच्या आहेत. युवक, शिक्षण आणि क्रीडा क्षेत्राकडेही सरकारने लक्ष दिले आहे. नवी मुंबईत सहा देशांची विद्यापीठे याचवर्षी सुरू होणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण करण्यासाठी 'विज्ञान वारी' योजनेंतर्गत इस्रो आणि नासा या संस्थांना भेट देण्याची संधी, महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी अँड ॲडव्हान्समेंट (महिमा) या संस्थेची स्थापना करून परदेशी नोकऱ्यांसाठी आवश्यक भाषा, कौशल्य प्रशिक्षण व आर्थिक मार्गदर्शन या भविष्यवेधी योजना म्हणता येतील. विविध प्रकारच्या खेळांमध्ये नैपुण्य प्राप्त करता यावे यासाठी विशेष केंद्रांची उभारणी, विभागीय स्तरावर क्रीडा उत्कृष्टता केंद्रे आणि जिल्हा स्तरावर क्रीडा गुणवत्ता विकास केंद्रे यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचा वारसा जतन करण्यासाठी उपाय, महाराजांचे आग्रा येथील स्मारक, संभाजी महाराजांच्या स्मारकाचे काम, महाराणी ताराबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधिस्थळांचे संवर्धन, महात्मा जोतिबा फुले यांची २०० वी जयंती व त्यानिमित्त त्यांचे स्मारक, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मारक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार स्थळे सत्याग्रहाच्या शताब्दीनिमित्त पायाभूत सोयीसुविधांचा विकास आराखडा, संत गाडगेबाबा यांचे १५० वे जयंतीवर्ष असल्याने तीर्थक्षेत्र सर्किट, संत गाडगेबाबा ग्राम समृद्धी अभियान अशा विविध घोषणा करतानाच महात्मा फुले, संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींचे विशेष वर्ष म्हणून २०२६-२७ हे 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरे करण्याची घोषणा सरकारने केली आहे. नैतिक स्वरूपाच्या भौतिक विकासाला इतिहास-संस्कृती आणि वारशाचे पाठबळ लागते असे म्हणतात. त्याचे हे उदाहरण. जगद्गुरू तुकाराम महाराजांचे देहू येथील जीर्ण घर आणि जन्मस्थानाच्या संवर्धनासाठी आराखडा, नाशिक-त्र्यंबक कुंभमेळ्यासाठी भरीव तरतूद, मराठी भाषेतील साहित्य व ग्रंथ अन्य भाषांमध्ये तसेच अन्य भाषांमधील दर्जेदार साहित्य मराठीत अनुवादित करण्यासाठी 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद अकादमी'ची स्थापना हे मुद्दे देखील आपल्या वारशाप्रति फडणवीस सरकार सजग असल्याचे दर्शवितात. मुंबई ते गडचिरोलीचा स्टील हब, शेती ते स्टार्ट अप्स अशा असंख्य मुद्यांवर-विषयांवर तरतुदी आहेतच. शहरी विकास, जलवाहतूक, बुलेट ट्रेन, छोट्या विमानतळांचा विस्तार, औद्योगिक केंद्रांचा विकास, ३०० कोटी वृक्ष लागवड मोहीम ही आणखी काही दूरदृष्टीची उदाहरणे सांगता येतील. या सर्व तरतुदी व योजना चांगल्या आहेत, यात वाद नाही. तरीही एक म्हणावेसे वाटते की, अर्थसंकल्पातील घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यातील अंतर दशकानुदशके तसेच राहिले आहे. सुशासन-गतिमानता हे जे मुद्दे यंदाच्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केले गेले आहेत, त्यात या न्यूनाची उत्तरे सापडू शकतात, हे सरकारने लक्षात घेतले पाहिजे. नागरिकांना सेवा देणे आणि विविध योजनांची अंमलबजावणी करणे अशी दुहेरी जबाबदारी अनेक सरकारी विभाग तसेच कार्यालयांमध्ये सांभाळली जाते. अनेकदा असा अनुभव येतो की, एकही गोष्ट धड झालेली नाही. 'सरकारी काम आणि सहा महिने थांब' ही म्हण आता तरी खोटी ठरली पाहिजे. पैसा तर खर्च होणारच आहे; तो सत्कारणी लागला पाहिजे आणि काम वेगाने झाले पाहिजे. सामान्यांना सहज सोप्या शब्दांत अर्थसंकल्प समजावून सांगणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या या दूरदृष्टीच्या अर्थसंकल्पातील दृष्टी प्रत्यक्ष अवतरायची असेल तर 'सुशासना'ला गतिमानतेची चाके हवीच!

## स्मरण

# धाडसी महिला राणी गाईदिनल्यू

**दुर्गा मडावी**

**भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील एक अत्यंत तेजस्वी आणि धाडसी महिला राणी गाईदिनल्यू या नागालँडच्या 'झाशीच्या राणी.' उद्या जागतिक महिला दिन. त्यानिमित्ताने त्यांचे स्मरण...**

मणिपूर राज्यातील न्गुआओ या गावात राणी गाईदिनल्यू यांचा जन्म २६ जानेवारी १९१५ रोजी झाला. 'रोंगमेई' नागा जमातीच्या राणी मां केवळ १३ वर्षांच्या असताना आपल्या चुलत भावाच्या- हैपौ जदोनांग यांच्या 'हेरका' चळवळीत सहभागी झाल्या. ब्रिटिश राजवटीविरुद्ध आणि ख्रिश्चन धर्मांतराविरुद्धची ही चळवळ होती. जदोनांग यांना ब्रिटिशांनी फाशी दिल्यानंतर गाईदिनल्यू यांनी चळवळीचे नेतृत्व स्वीकारले. त्यांनी नागा लोकांमध्ये राष्ट्रवादाची ज्योत पेटवली. त्याअंतर्गत त्यांनी ब्रिटिशांना कर न देण्याचे आवाहन केले आणि गनिमी काव्याने त्यांच्याविरुद्ध लढा दिला. ब्रिटिशांनी त्यांना पकडण्यासाठी मोठे बक्षीस ठेवले होते. अखेर १९३२ मध्ये, वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी त्यांना अटक करण्यात आली आणि जन्मठेपेची शिक्षा झाली.

१९३७ मध्ये शिलाँग तुरुंगात असताना पंडित जवाहरलाल नेहरू त्यांची भेट घ्यायला गेले होते. त्यांचे धैर्य पाहून नेहरूंनी त्यांचे वर्णन 'डोंगरांची मुलगी' (डॉटर ऑफ द हिल्स) असे केले अन् त्यांना 'राणी' ही पदवी बहाल केली. तेव्हापासून त्या राणी गाईदिनल्यू म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यावरच त्यांची तुरुंगातून सुटका झाली. त्यानंतर आयुष्यभर नागा संस्कृतीचे जतन आणि समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी कार्य केले. भारत सरकारने त्यांना १९८२ मध्ये 'पद्मभूषण' देऊन सन्मानित केले.

राणी गाईदिनल्यू यांचे आयुष्य हे केवळ संघर्षाची कहाणीच ठरले. त्यांनी चालवलेली हेरका चळवळ आणि त्यांचा तुरुंगवास हे दोन्ही कालखंड त्यांच्या संघर्षाचे सर्वात महत्त्वाचे पैलू आहेत. हेरका चळवळ केवळ राजकीय नव्हती तर ती धार्मिक आणि सांस्कृतिक चळवळ होती. नागा जमातीच्या पारंपरिक धार्मिक प्रथांचे रक्षण करणे आणि ब्रिटिशांच्या मदतीने होणाऱ्या सक्तीच्या धर्मांतराला विरोध करणे हा या चळवळीचा मुख्य उद्देश होता. 'हेरका' या शब्दाचा अर्थ 'शुद्ध' असा होतो. प्रारंभीच्या काळात ही चळवळ हैपौ जदोनांग यांनी सुरू केली. 'नागाराज' स्थापन करण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले होते. या भागात शाळा नसल्यामुळे गाईदिन्ल्यूचे शिक्षण होऊ शकले नाही. ब्रिटिश अधिसत्तेच्या या कालखंडात भारतभर ब्रिटिशविरोधी लढे सुरू होते. गाईदिन्ल्यूचा चुलतभाऊ हैपोऊ जादोनांग याने



हेरका नावाचे धार्मिक आंदोलन सुरू केले. विशेषतः नागा लोकांच्या ख्रिश्चनीकरणास त्यांनी विरोध केला. हळूहळू हे आंदोलन सशस्त्र बनले. झेलियनग्रोंग जमातीतील लोक या आंदोलनाकडे आकर्षित झाले. वयाच्या तेराव्या वर्षी गाइदिन्ल्यू या आंदोलनात सहभागी झाली. चळवळीशी जोडल्या गेल्या. त्यांनी महिलांची एक संघटना बांधली आणि ब्रिटिशांविरुद्ध गनिमी काव्याने लढण्याचे प्रशिक्षण दिले.

जदोनांग यांच्या अटकेनंतर त्यांनी विखुरलेल्या सैन्याला एकत्र केले आणि ब्रिटिशांविरुद्ध लढा अधिक तीव्र केला. ब्रिटिश सरकार राणी गाईदिनल्यू यांना इतके घाबरले होते की, त्यांना पकडण्यासाठी संपूर्ण आसाम रायफल्सला कामाला लावले होते. एका मोठ्या लष्करी कारवाईनंतर त्यांना पोखरांग गावातून अटक करण्यात आली. वयाच्या केवळ १६ व्या वर्षी म्हणजे १९३२ साली ब्रिटिश सरकारने ही कारवाई केली. इतकेच नव्हे, त्यांच्यावर हत्येचा प्रयत्न आणि देशद्रोहाचे आरोप लावून जन्मठेपेची शिक्षाही सुनावली. त्यांना एका तुरुंगात न ठेवता गुवाहाटी, शिलाँग, ऐझॉल आणि तुरा अशा वेगवेगळ्या तुरुंगांत हलवण्यात आले. याचे कारण असे की, त्या जिथे जात तिथे लोक त्यांचे दर्शन घेण्यासाठी गर्दी करत आणि पुन्हा उठाव होण्याची भीती ब्रिटिशांना वाटत असे. गनिमी काव्यात, शस्त्र चालविण्यात तरबेज असलेल्या गाईदिन्ल्यूबरोबर सुमारे चार हजार क्रांतिकारी लोकांचे संघटन होते. जादोनांगला फाशी दिल्यानंतर नागा लोकांत असंतोष पसरला होता. त्याला ब्रिटिश विरोधाकडे वळविण्यात तिला यश मिळाले. दरम्यान, वयाच्या १६ व्या वर्षी तुरुंगात गेलेल्या गाईदिनल्यू थेट १९४७ मध्ये वयाच्या ३१ व्या वर्षी बाहेर आल्या. त्यांच्या तारुण्याचा सुवर्णकाळ त्यांनी देशासाठी तुरुंगात व्यतीत केला.

१९३७ मध्ये जेव्हा जवाहरलाल नेहरू आसामच्या दौऱ्यावर होते, तेव्हा त्यांना या तरुण मुलीच्या साहसाची माहिती मिळाली. त्यांनी राणी गाईदिनल्यू यांची तुरुंगात भेट घेतली आणि त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरू केले. ब्रिटिश सरकारला पत्र लिहून सुटकेची मागणीही केली; परंतु गाईदिनल्यू बाहेर आल्यास पुन्हा विद्रोह होईल, या भीतीने ब्रिटिशांनी त्यांना सोडण्यास नकार दिला होता. अखेर १९४७ मध्ये जेव्हा भारत स्वतंत्र झाला, तेव्हाच त्यांची सुटका झाली. राणी गाईदिनल्यू यांनी स्वतंत्र भारतातही नागा लोकांच्या हक्कासाठी लढा सुरूच ठेवला होता. त्या ईशान्य भारताच्या प्रबळ इच्छाशक्तीचे प्रतीक आहेत. अशा या राणी गाईदिनल्यु मां यांचा १७ फेब्रुवारी १९९३ रोजी त्यांच्या लुंकाऊ या जन्मगावी देहान्त झाला. त्यांना कोटी कोटी वंदन.

(लेखिका चंद्रपूर जिल्ह्यातील बोर्डा शासकीय आश्रमशाळेच्या शिक्षिका आहेत.)

## वेध

# समाजाला हवेत अपघातग्रस्त रक्षक!

**अनिल उमाकांत फेकरीकर**

कठीण समय येता, कोण कामास येतो, असा वाक्प्रचार आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. पण कठीण समय येता मी कामास येणार, असे ठासून म्हणणारे समाजात निर्माण होण्याचे प्रमाण कमी आहे. तसे पाहता मदत करणे हा मानवाचा स्थायी स्वभाव हवा. मात्र तसे न घडता एखाद्यावर वाईट प्रसंग उद्‌भवल्यास तमाशा पाहणारेच सभोवताल गोळा होतात. मदतीसाठी एखादाच धावतो. गुरुवार ५ मार्च २०२६ रोजी नागपूर जिल्ह्यातील कोराडी-खापरखेडा भागात पती-पत्नीने मिळून एका व्यक्तीची खुलेआम हत्या केली. ही हत्या होत असताना जाणाऱ्या-येणाऱ्यांनी तिथे थांबून त्याचे व्हिडीओ शूटिंग केले, पण मदतीसाठी एकही व्यक्ती धावली नाही. व्हिडीओ तयार करण्यासाठी लोकांजवळ वेळ होता; मग मदतीसाठी का नाही, असा प्रश्न मनात आला. समजा लोक धावले असते तर कदाचित पती-पत्नीच्या हातून घडणारा गुन्हा टाळणे शक्य होते. अशाच स्वरूपात लोक अपघातानंतर व्हिडीओ बनवितात आणि जखमींना सोडून रणछोडदास बनण्यात धन्यता मानतात.

याला माणुसकी म्हणत नाही. आपल्या समाजाला अपघातग्रस्त रक्षकांची गरज आहे. जेव्हा केव्हा अपघातग्रस्त रक्षकांची फौज तयार होईल, तेव्हा या देशात कुठलीही व्यक्ती रस्त्यावर तडफडून मरणार नाही. कुठलेही गुन्हेगार खुलेआम सामान्यांवर हात उगारणार नाहीत. पण तो दिवस खरोखरच या देशात येऊ शकतो का? याचे उत्तर होय असेच देता येईल. याकरिता आपल्याला मुला-मुलींवर लहानपणापासून मदतीचा भाव बिंबवावा लागेल. मदत केल्याने काय आत्मिक समाधान प्राप्त होते, हे त्यांना पटवून द्यावे लागेल. कदाचित पहिल्या वर्गापासूनच सामाजिक कार्य हा विषय त्यांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करावा लागेल. त्यात मुलांना गुण देण्याची पद्धत स्वीकारावी लागेल. गुणांच्या लोभापायी का असेना मुले मदतीसाठी पुढे येतील. कोरोना काळात डॉक्टर, पोलिस, दानशूर लोक, व्यापारी, पत्रकार, राजकीय नेते समाजातील पीडितांसाठी देवदूत म्हणून धावत आले. त्यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता पीडितांना मदतीचा हात दिला. परिणामी आपण चीननिर्मित कोरोनाला हद्दपार करण्यात यश मिळविले. तसे पाहता समाजात एकता असल्यास कुठलाही गुन्हेगार गुन्हा करण्यापूर्वी शंभरवेळा विचार करतो. एवढा धाक समाजाकडून निर्माण होऊ शकतो. पण समाज एकवटण्यास तयारच नाही. समाजात केवळ २ टक्के लोक दुर्जन आहेत तर उर्वरित ९८ टक्के सज्जन आहेत. दुर्दैवाने दुर्जन एकमेकांच्या मदतीला पटकन जातात. सज्जन मात्र स्वतःला अलिप्त ठेवतात. परिणामी अपघातग्रस्तांना आणि गुन्हेगारांनी केलेल्या हल्ल्यातील पीडितांना मदत मिळत नाही. नंतर मात्र हेच लोक पोलिसांच्या नावाने शिमगा करतात. तसे पाहता जी व्यक्ती स्वतःहून कुणाला मदत करीत नाही, त्यांना कुणावरही ताशेरे ओढण्याचा अधिकार नाही. जी कर्तव्याची पूर्तता करेल तिनेच इतरांकडून अपेक्षा ठेवावी, असाच सृष्टीचा नियम सांगतो. पण अपघातग्रस्त रक्षकांची उणीव सतत राहण्यासाठी जेवढा समाज कारणीभूत आहे, तेवढेच आपल्याकडील कायदे व प्रशासन जबाबदार आहे. वाईट काम केल्यास गावभर बदनामी करणारे जागोजागी आहेत. पण चांगले काम करणाऱ्यांचे कौतुक करणारे हाती दिवा घेऊनही सापडत नाहीत. जेव्हा चांगले काम करणाऱ्यांना तत्काळ त्याचे फळ मिळेल त्या दिवसांपासून त्यांची संख्या वाढेल, असा माझा दावा आहे. नागपुरात रोडमार्क फाऊंडेशनचे संस्थापक राजू वाघ यांनी अपघातग्रस्त रक्षक तयार व्हावेत याकरिता खास उपक्रमच हाती घेतला आहे. तर सावनेर तालुक्यात कुठेही अपघात घडो, त्यातील जखमींना तातडीने वैद्यकीय उपचार मिळावेत म्हणून हितेश बनसोड आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी हजर राहतात. राजू वाघ असो किंवा हितेश बनसोड दोघांनी सुरू केलेली समाजसेवा हटकेच म्हणावी लागेल. पण मग त्यांचे पाहून इतर मंडळी केवळ तमाशा का पाहतात? हत्या होत असताना व्हिडीओ तयार करणाऱ्यांनी पीडिताला वाचविण्याचा प्रयत्न का केला नाही. आता ते म्हणतील, आम्हाला आमच्या जिवाची भीती होती. मग व्हिडीओ तयार करताना ती भीती कुठे गेली होती, याविषयी आत्मचिंतन व्हावे. असाच प्रकार डॉक्टरांनी, पोलिसांनी कर्तव्यपूर्तीच्या पूर्वी केला तर आपल्याला आवडणार आहे का? मग ज्या समाजात आपण राहतो, त्यांच्या प्रती आपले काहीच कर्तव्य नाही का? ही बाब समजून घ्यावीच लागेल. शेवटी, तो खूप चांगला होता, हा समाजाकडून मिळणारा पुरस्कार माणसाला मेल्याशिवाय भेटत नाही. ही प्राचीन पद्धत समाजाने बदलली तर नक्कीच आपल्याकडेही अपघातग्रस्त रक्षक वाढतील, नाही का?

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

# निमित्त धर्म स्वातंत्र्य अधिनियमाचे

**नागेश दाचेवार**

भारतीय राज्य घटनेने प्रत्येक नागरिकाला धर्म स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार दिला आहे. राज्य घटनेच्या कलम २५ ते २८ अंतर्गत नागरिकांना आपल्या श्रद्धेनुसार धर्म स्वीकारण्याचा, आचरण करण्याचा आणि प्रसार करण्याचा अधिकार आहे. मात्र, या अधिकाराचा गैरवापर होऊ नये, जबरदस्ती, प्रलोभन किंवा फसवणुकीच्या माध्यमातून धर्मांतर घडवून आणले जाऊ नये, यासाठी विविध राज्यांनी वेळोवेळी कायदे केले आहेत. त्याच पृष्ठभूमीवर धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ हा कायदा तयार झाला असून आता लवकरच त्याला मूर्त रुप मिळेल. आता लव्ह जिहाद, बळजबरी धर्मांतरण यांसारख्या घटनांना लगाम बसेल. मिशनऱ्यांच्या माध्यमातून होणाऱ्या सामूहिक धर्मांतरणासारख्या कूप्रकारांना आळा बसेल, अशी आशा आहे. त्यामुळे फडणवीस सरकारचं, महायुती सरकारचं अर्थात एकूणच महाराष्ट्र सरकारचं अभिनंदन...

धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ चा मुख्य उद्देश म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या धर्म स्वातंत्र्याचा आदर राखत असताना जबरदस्तीने, फसवणूक करून किंवा प्रलोभनं देऊन घडवून आणल्या जाणाऱ्या धर्मांतरांवर नियंत्रण ठेवणे हा आहे. समाजात धार्मिक सलोखा टिकविणे, सामाजिक तणाव टाळणे हे या कायद्यामागील प्रमुख हेतू आहेत. यापूर्वी सदर प्रकारचे कायदे उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, ओडिशा, छत्तीसगड, झारखंड, हिमाचल प्रदेश, अरुणाचल प्रदेश, हरयाणा आणि उत्तराखंड या राज्यांमध्ये अशा प्रकारचा कायदा अस्तित्वात आहे. सगळ्यात पहिले हा कायदा ओडिशा राज्यात १९६७ मध्ये झाला. तर, आत्ता अलिकडे २०२१ मध्ये गुजरात व मध्यप्रदेश आणि २०२२ मध्ये हरयाणा आणि हिमाचल प्रदेशात हा कायदा झाला आहे. महाराष्ट्रानेही आता हा कायदा आणण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकलेलं आहे.

**जबरदस्ती, फसवणूक आणि प्रलोभनाला प्रतिबंध** : या कायद्यानुसार, कोणत्याही व्यक्तीला स्वतःच्या इच्छेनुसार धर्म स्वीकारण्याचा अधिकार कायम आहे. मात्र, त्यासाठी वेगवेगळ्या वापरल्या जाणाऱ्या क्लृप्त्यांवर आता जरब बसविल्या जाणार आहे. या कायद्यातील सर्वात महत्त्वाची तरतूद म्हणजे जबरदस्ती, फसवणूक, दबाव किंवा



आर्थिक प्रलोभन देऊन धर्मांतरण करणाऱ्यांना थेट तुरुंगात जावे लागणार असून जामीन मिळणेदेखील कठीण झाले आहे. या सगळ्यावर सरकारचे बारकाईने लक्ष असणार आहे. प्रलोभनाच्या संकल्पनेत पैसे, नोकरीचे आश्वासन, विवाहाचे आमिष, चांगले शिक्षण किंवा वैद्यकीय सुविधा देण्यासारख्या मदतीचा आव आणून विश्वास संपादन करून एखाद्या व्यक्तीला धर्मांतरासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न गुन्हा ठरणार आहे. धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ अंतर्गत गुन्ह्याच्या स्वरूपानुसार शिक्षेची मुदत वेगवेगळी असू शकते.

विशेषतः जबरदस्ती किंवा फसवणुकीच्या माध्यमातून धर्मांतर घडवून आणल्यास कठोर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे तसेच अशा प्रकारच्या धर्मांतरात सामील असलेल्या व्यक्तीचे नव्हे तर सामाजिक, शैक्षणिक संस्थांवरही कायदेशीर कारवाई होऊ शकते. या कायद्यात काही विशेष वर्गांच्या संरक्षणासाठी अधिक कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. महिला, अल्पवयीन, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील व्यक्तींचे धर्मांतरण जबरदस्तीने किंवा फसवणुकीने घडवून आणल्यास त्यासाठी अधिक कठोर शिक्षा ठेवण्यात आली आहे. कारण या घटकांना समाजात तुलनेने अधिक असुरक्षित मानले जाते. त्यामुळे त्यांच्या बाबतीत धर्मांतराचा प्रश्न अधिक संवेदनशील मानून कायद्यात कठोरता दाखविण्यात आली आहे. दुर्बल घटकांच्या हक्कांचे संरक्षण करणे या कायद्यामुळे शक्य होणार आहे.

**विवाह आणि धर्मांतर** : युती सरकारने डिसेंबर २०२२ मध्ये महिला व बाल विकास विभागांतर्गत 'आंतरधर्मीय विवाह परिवार समन्वय समिती' स्थापन केली होती. मात्र, याला फार काही यश प्राप्त होऊ शकले नाही. कारण त्याला कायद्याचा आधार नव्हता, तक्रार आल्यास ही समिती चौकशी करणार होती. आता जेथे जबरदस्ती केली जात आहे, तेथे तक्रार करायला कोण धजावेल? त्यामुळे याचा काही फार उपयोग या प्रकारावर आळा बसविण्यासाठी होऊ शकला नाही. आता मात्र धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ मध्ये विवाहाच्या माध्यमातून होणाऱ्या धर्मांतरांबाबतही काही तरतुदी करण्यात आल्या आहेत. स्वेच्छेने आणि परस्पर संमतीने केलेल्या विवाहांवर कोणताही निर्बंध असणार नाही. मात्र, एखाद्या विवाहाचा उद्देश केवळ धर्मांतर घडवून आणणे हा असेल, तर अशा विवाहांची चौकशी करण्याची तरतूद या कायद्यात आहे.

**कायद्यावरील चर्चा आणि टीका** : धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ हा कायदा लागू करताना त्यावर विविध स्तरांवर चर्चा आणि वादही झाले आहेत. काहींच्या मते हा कायदा जबरदस्तीच्या धर्मांतराला आळा घालण्यासाठी आवश्यक आहे तर काही सामाजिक आणि मानवाधिकार कार्यकर्त्यांच्या मते, या कायद्यामुळे वैयक्तिक स्वातंत्र्यावर परिणाम होऊ शकतो. विशिष्ट समुदायावर अन्याय करणारा ठरू शकतो. अशा अनेक चर्चा, टीका केल्या गेल्या. एकूणच धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ या कायद्यातील तरतुदी समाजात धार्मिक समतोल राखण्यासाठी आणि व्यक्तींच्या स्वेच्छेचा आदर करण्यासाठी करण्यात आल्या आहेत. मात्र, धर्म हा अत्यंत संवेदनशील विषय असल्याने अशा प्रकारच्या टीकांकडे दुर्लक्ष करीत कायद्यांचं आसूड उगारलं गेलं आहे. कोणीही कोणाच्या धार्मिक बाबींमध्ये ढवळाढवळ केली नाही तर हा कायदा समाजात धार्मिक सलोखा राखण्यास मदत करू शकतो. परंतु, कोणी जर सामाजिक तणाव वाढण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याला सोडले जाणार नाही, सरकार, पोलिस त्याच्यासोबत न्याय केल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे खऱ्या अर्थाने 'अब होगा न्याय' म्हणायला हरकत नाही.

९२७०३३३८८६

### 'आमचं पुणं' बहरणार

खूप वर्षांनी 'तरुण भारत' वाचण्याचा आनंद मिळाला. योग्य विचारांनी दिशादर्शन करणारे दैनिक पुण्यात हवेच होते. पहिल्याच पानावर विचारपुष्प, आतील पानावर संघगीत, संघ नोंदी वाचून समाधान वाटले. कै. रामभाऊ म्हाळगी यांचे स्मरण वाचून तरुण भारत परिवारात आल्याबद्दल धन्यता वाटली. 'आमचं पुणं' हळूहळू बहरत जाणार, ही खात्री आहेच. 'धर्म अध्यात्म'मधील लेख उत्तम! कला, क्रीडा, अध्यात्म, अर्थकारण, राजनीती या सर्व क्षेत्रांचा रोज परिचय करून देणारा 'तरुण भारत' आयुष्याचा अविभाज्य भाग बनणार, हे नक्की! खूप शुभेच्छा!

**प्रशांत दिवेकर** /तळेगाव दाभाडे, पुणे

### तरुण भारत पुणेचे स्वागत

साधारण ४०-४२ वर्षांपूर्वी पुणे तरुण भारत बंद झाला. तरुण भारतबरोबर विदर्भात असताना चांगला संबंध होता. रोज तरुण भारत वाचायला मिळायचा. १९७६ मध्ये पुण्यात आलो. त्यानंतर खंडित झालेला तो आपुलकीचा संबंध आता पुन:प्रस्थापित झाला, याचा मनस्वी आनंद होत आहे. मला आठवते की, १९५७-५८ ला वर्धा येथे तरुण भारत वाचायला सुरुवात झाली. मधील काही वर्षे मध्यप्रदेशात गेल्याने खंड पडला. तो पुढे यवतमाळ येथे आल्यावर सुरू झाला तो थेट १९७६ पर्यंत. आणिबाणी लागली त्याचे दुसऱ्या दिवशीचा पेपर अजूनही आठवतो. त्या काळात नरकेसरी प्रकाशनने अद्ययावत यंत्रणा आणली होती. आता तरुण भारताची पुणे आवृत्ती सुरू झाली आहे. जाहिरातविरहित वृत्तपत्र वाचताना छान वाटले, पण जाहिराती हा वृत्तपत्राचा आर्थिक कणा आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

**प्रदीप महाबळे**/पाषाण, पुणे

### भारताचे संकटमोचक

यावर्षीच्या टी-२० पुरुष विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आपल्या टीम इंडियाचा प्रवास अडखळत सुरू आहे. सुदैवाने

## वाचक पत्रे

प्रत्येक सामन्यात एखादा फलंदाज आपल्या टीमला संकटातून बाहेर काढतो. पहिल्या अमेरिकेसोबतच्या सामन्यात सूर्य तळपला नसता तर आपला पराभव अटळ होता. दुसऱ्या सामन्यात नामिबियासमोर ईशान-हार्दिक वगळता आपली फलंदाजी बहरली नाही. अडीचशेही करू शकलो नाही. पाकिस्तानला आपल्या गोलंदाजांनी १८ षटकांत ११४ धावांवर रोखल्यामुळे आपण विजय साजरा करू शकलो. नेदरलँडसविरुद्ध खेळताना शिवम दुबेची तडाखेबंद खेळी विजयी करून गेली. गटातील चारही टीमसोबत मिळालेला विजय लौकिकास साजेसा नव्हता. सुपर आठच्या पहिल्याच सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं आपला दारुण पराभव केला. आपला पूर्ण संघ केवळ १११ धावा करू शकला. सुपर आठच्या दुसऱ्या सामन्यात झिम्बाब्वेच्या गोलंदाजांना आपण हिमतीनं सामोरे गेलो आणि प्रथमच अडीचशे धावा करून विजय मिळविला. बलाढ्य वेस्ट इंडीजला १५५ धावांवर रोखल्यानंतर आपली फलंदाजी परत एकदा ढेपाळली. संजू सॅमसनच्या जबाबदार खेळीने उपांत्य फेरी गाठता आली.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

### मनालाही पटत नाही आणि जनतेलाही; तरीसुद्धा.!

पक्षश्रेष्ठी जनतेला न पटणारे निर्णय का घेतात, हे कळले नाही. आता हेच बघा ना, राज्यसभेच्या निवडणुकीत पुन:पुन्हा त्याच त्या नेत्यांची वर्णी लागावी. काय म्हणावं याला? पक्षांकडे तरुण, तडफदार,अभ्यासू नेतृत्वाचा दुष्काळ पडला आहे काय? जे उत्तम प्रकारे राज्यसभा गाजवू शकतात, सर्व क्षेत्रातील समस्या राज्यसभेत मांडून त्या सोडविण्याचं सामर्थ्य आहे अशा सामर्थ्यवान नेतृत्वाला पक्षाकडून नारळ आणि जनतेला ज्या नेतृत्वात मुळीच रस नाही अशांना पक्षाची कवच कुंडले! ज्या कवच कुंडलांचे ते स्वतंत्रपणे रक्षणही करू शकत नाही आणि पावित्र्यही राखू शकत नाही. अशा नेत्यांना राज्यसभा. पात्र असलेल्या दावेदार नेत्यांना ग्रामसभा.आहे.

**विजय इंगोले**/बडनेरा

### 'हे आव्हान सोपे नाही'

'रोखठोक'मधील दिनेश गुणे यांचा 'हे आव्हान सोपे नाही' लेख आशयघन असून सर्वांना जागे करणारा आहे. ७० च्या दशकांपासून या अमली पदार्थांच्या व्यसनाची चर्चा सुरू झाली. सर्व प्रकारचे अमली पदार्थ येथे सहजगत्या उपलब्ध होतात. कारण त्यांची साखळी असते. आपल्या देशातील तरुण पिढीचा असा सत्यानाश करायला लावतात तेव्हा ते किती जाड कातडीचे असतात, हे लक्षात येते. सातत्याने अमली पदार्थ पकडल्याच्या बातम्या येतात. तरीही अमली पदार्थांची विक्री चालूच आहे हे वास्तव आहे. त्यामुळेच अमली पदार्थ मिळू नयेत यासाठी अनेक स्तरावरून प्रयत्न व्हायला हवेत. त्यासाठी राजकीय व प्रशासकीय कणखर इच्छाशक्ती हवी. हे आव्हान सोपे नाहीच, पण अशक्यही नाही.

**माया हेमंत भाटकर** /पुणे-९८६९०७४४९९

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# सोलापूरचा पारा ४० अंशाकडे



## शुक्रवारची सविस्तर स्थिती

हवामान कार्यालय सोलापूर यांनी दिलेल्या आकडेवारीनुसार शुक्रवारी कमाल तापमान ३९.५ से. (१०३.१ फॅ.) नोंदवले गेले. तर किमान तापमान १९.५ से. (६७.१ फॅ.) इतके होते. हवेतील आर्द्रता घटून २८% वर आल्यामुळे वातावरणात कोरडेपणा वाढला आहे, परिणामी उन्हाच्या झळा अधिक तीव्रतेने टोचत आहेत.

### सलग तिसऱ्या दिवशी तापमानात वाढ

### उन्हाचा चटका तीव्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ६ -**

सोलापूर शहरात उन्हाचा कडाका दिवसेंदिवस वाढत चालला असून आज तापमानाने ३९.५ सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. विशेष म्हणजे, गेल्या ७२ तासांत तापमानाचा आलेख सातत्याने वर जात असल्याने सोलापूरकर उन्हाने हैराण झाले आहेत.

**दुपारी कर्फ्यूसदृश स्थिती**

गेल्या दोन दिवसांच्या तुलनेत आज उन्हाचा तडाखा जास्त असल्याने दुपारी १२ ते ४ या दरम्यान शहरातील मुख्य बाजारपेठा आणि रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळाला. वाढत्या उष्णतेमुळे शीतपेये, शहाळी आणि रसवंती गृहांवर नागरिकांची गर्दी वाढत आहे.

**हवामान विभागाचा अंदाज:** येणाऱ्या २-३ दिवसांत तापमानाचा हा पारा ४० सेल्सिअसचा टप्पा ओलांडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी दुपारच्या वेळी कामाशिवाय बाहेर पडू नये.

**गेल्या ३ दिवसांतील तापमानाचा तुलनात्मक तक्ता**

| तारीख | कमाल | किमान | तपमान नोंद |
|---|---|---|---|
| ०४ मार्च २०२६ | ३८.४ से. | २०.० से. | उन्हाची चाहूल |
| ०५ मार्च २०२६ | ३८.८ से. | २०.७ से. | उष्णतेत वाढ |
| ०६ मार्च २०२६ | ३९.५ से. | १९.५ से. | मोठी वाढ |

# कौशल्यपूर्ण शिक्षण हीच यशाची गुरुकिल्ली

### पोलिस उपायुक्त गौहर हसन यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

आजचे युग वेगाने बदलणारे आणि सतत शिकत राहण्याची प्रेरणा देणारे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्यपूर्ण शिक्षण आत्मसात करणे अत्यावश्यक आहे. जिज्ञासू वृत्ती, चिकित्सक दृष्टी आणि नवीन गोष्टी शिकण्याची तयारी या गुणांमुळेच युवक भविष्यात मोठे यश संपादन करू शकतात. जीवनातील आव्हानांना धैर्याने सामोरे जाताना अपयश आले तरी खचून न जाता त्यातून शिकण्याची वृत्ती ठेवावी. समाजातील प्रत्येक घटकाबद्दल दयाभाव, संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव ठेवणे हेही यशस्वी नागरिकत्वाचे महत्त्वाचे लक्षण असल्याचे प्रतिपादन पोलीस उपायुक्त गौहर हसन यांनी केले.

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेला ५२ वा वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सत्यजित शहा होते. यावेळी व्यवस्थापन विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. प्रीतम कोठारी, प्राचार्य डॉ. संतोष कोटी, प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे आदी उपस्थित होते. पारितोषिकांचे वाचन प्रा. डॉ. सीए सुनील इंगळे, प्रा. डॉ. रजनी क्षीरसागर, प्रा. शिरीषाराणी कुडल आणि प्रा. डॉ. किरण चौगुले यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनी पूर्वा देशमुख हिच्या मंगलमय गणेश वंदनाने झाली. प्रा. डॉ. शिवकुमार बिराजदार यांनी स्वागत व प्रास्ताविक करत कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. प्रा. ऋजुता शहा यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर प्राचार्य डॉ. सत्यजित शहा यांनी वार्षिक अहवाल सादर करत शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला. सूत्रसंचालन प्रा. भीमगोंडा पाटील व प्रा. मनाली म्हेत्रे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अनिता सद्दलगी यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता प्रा. ऋजुता शहा यांच्या पसायदानाने झाली.



### आर्या शिंदे, तन्वी पाटील सुवर्णपदकाने सन्मानित

बी.कॉम. परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना माजी प्राचार्य हिराचंद माणिकशेटे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले. सन २०२३-२४ साठी आर्या शिंदे आणि सन २०२४-२५ साठी तन्वी पाटील यांना हा मान मिळाला. तसेच आदर्श विद्यार्थी म्हणून कनिष्ठ विभागातून धनश्री कोल्हापुरे आणि खुशी गुदलानी, पदवी विभागातून कविता चारगुंडी, तर पदव्युत्तर विभागातून जानसी बंडा यांचा गौरव करण्यात आला.

## पोलिसांचा खबरी आहे, असे म्हणत मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

तू आमच्या विरुद्ध पोलिसात टीप देतो, तो पोलिसांचा खबरी आहे असे म्हणून शिवीगाळ करून हॉकी स्टिकने, लाथा बुक्क्यांनी तिघांनी मिळून मारहाण करून बघून घेण्याची धमकी दिली. याबाबत दि. ५ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला. याबाबत हकीकत अशी की, दि. २ मार्च रोजी डेंटल चौक येथे सोहेब शेख, आयान, साकीब सर्व राहणार शास्त्रीनगर यांनी सोहेल इकबाल शेख राहणार व्यंकटेश नगर याला तू आमच्या विरुद्ध पोलिसात टीप देतो, तो पोलिसांचा खबरी आहे असे म्हणून शिवीगाळ करून सोहेब याने त्याच्या हातातील हॉकी स्टिकने सोहेलच्या पाठीवर व बरगडीवर मारले. इतरांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण करून बघून घेण्याची धमकी दिली. याबाबत जेलरोड पोलीस ठाण्यात दि. ५ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला. पुढील तपास कांबळे करीत आहेत.

## घरी कोणी नसताना साडेपाच लाखांची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

राहत्या घरी कोणी नसताना अज्ञात चोरट्याने मुख्य दरवाजाचे लॉक तोडून, कपाटाचा दरवाजा उचकटून त्यामधून ५ लाख ५५ हजार ५०० रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेले आहे. याबाबत अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

या हकीकत अशी की, दि. ४ मार्च रोजी राजीव उत्तमराव खपाले (रा. अ विंग प्लॉट नंबर ६०१ सोनी सिटी, लक्ष्मी पेठ, सोलापूर) येथे पत्नी व मुलगा असे घरात नसताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे लॉक तोडून बेडरूम मध्ये प्रवेश करून लाकडी कपाटाचा दरवाजा उचकटून त्यामधील ५ लाख ५५ हजार ५०० रुपयांचे यामध्ये साडेचार तळ्यात सोन्याचे गंठण, १८.५ ग्रॅम चे सोन्याचे मिनी गंठण, पाच ग्रॅम सोन्याचे कानातील टॉप्स, रेडमी नोट ७ एस, काळे रंगाचे स्मार्ट वॉच, रोख रक्कम असे चोरून नेल्याचा गुन्हा दि. ५ मार्च रोजी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. पुढील तपास पाटोळे करत आहेत.

# नागरिकांच्या तक्रारी प्रलंबित : १०० अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई

### ३७ हजार ७०० रुपये दंडाची आकारणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मार्च-**

नागरिकांनी नोंदवलेल्या अधिसूचित सेवा वेळेत न निकाली काढणाऱ्या आणि तक्रारी प्रलंबित ठेवणाऱ्या महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेने एकूण १०० अधिकारी-कर्मचाऱ्यांवर आर्थिक दंड ठोठावला असून एकूण ३७ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल करण्याचे आदेश उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिले आहेत.



महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभाग, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, बांधकाम परवाना, विविध झोन कार्यालय, आरोग्य विभाग, इतर संबंधित विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विविध सेवा विहित कालावधीत न दिल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकरणात नागरिकांच्या तक्रारी अद्याप प्रलंबित असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार विविध विभागातील कर्मचाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे. दि. २ मार्च २०२६ रोजी ३५ कर्मचाऱ्यांना ८ हजार १०० रुपये, ४ मार्च रोजी १४ कर्मचाऱ्यांना १२ हजार १०० तर ६ मार्च २०२६ रोजी एकूण ५१ कर्मचाऱ्यांना १७ हजार ५०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. हा दंड त्यांच्या मार्च २०२६ पेड इन एप्रिलच्या वेतनातून वसूल केला जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## निधन वृत्त...

### कलावती गालपल्ली



**सोलापूर दि.६ मार्च-**

गीतानगर येथील रहिवासी कलावती दत्तात्रय गालपल्ली (वय ७३) यांचे शुक्रवार दि. ६ मार्च २ रोजी पहाटे ५ वाजता हृदयविकाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पती, ४ मुले, सुना, नातु-नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा राहत्या घरातून (गीतानगर वालचंद कॉलेज रोड) रविवार ८ मार्च रोजी सकाळी १० वाजता निघणार आहे.

### पांडूरंग चव्हाण



**सोलापूर,दि.६ मार्च-**

नांदगाव, तालुका मोहोळ येथील शेतकरी पांडुरंग जालींदर चव्हाण (वय ५४) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झालें. त्यांच्या पश्चात, आई वडील, पत्नी, २ मुली, १ मुलगा असा परिवार आहे.

### रुपाली मंगलपल्ली



**सोलापूर, दि.६ मार्च-**

येथील रुपाली मंगलपल्ली यांचे गुरुवारी (दि.५) दीर्घ आजारामुळे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे पती, १ मुलगा व १ मुलगी असा परिवार आहे. जिल्हा ग्रंथालय अधिकारी सातारा श्रीनिवास मंगलपल्ली यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पार्थिवावर अक्कलकोट रोडवरील पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### 'आरटीओ'चे निवृत्त हेडक्लार्क हरवाळकर यांचा अपघातात मृत्यू

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

येथील आरटीओ कार्यालयात निवृत्त हेड क्लार्क शिवशरण हरवाळकर यांचे गुरुवारी सायंकाळी अपघाती निधन झाले. मूळचे अक्कलकोटचे शिवशरण हरवाळकर यांनी सोलापूर, अकलूज व पुणे आरटीओ कार्यालयात लिपिक म्हणून सेवा बजावली. निवृत्तीनंतर त्यानी आपल्या शेतीकामात लक्ष घातले. मनमिळावू स्वभाव व गरजू लोकांना मदत करण्याच्या वृत्तीमुळे ते लोकप्रिय होते. गुरुवार ५ मार्च रोजी सायंकाळी ते मदरे येथील शेतावरून सोलापूरकडे आपल्या दुचाकीवरून परत निघाले होते. मद्रे येथील चौकाजवळ समोरून दुचाकीवरून वेगाने आलेल्या स्वाराने त्यांना धडक दिली. यात खाली पडून ते गंभीर जखमी झाले. डोक्याला मार लागल्यामुळे उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाल्याचे सांगण्यात आले.



**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर येथील नागरीकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील पुर्व मंगळवार पेठ येथील म्यु.पल घर नं. ९१, सिटी सर्व्हे नं. ३१६५ याचे एकूण क्षेत्र ९७.८ चौ.मी पैकी पुर्वमुखी दक्षिण बाजूकडील असलेली खुली जागा त्याचे एकूण क्षेत्र ६५.२ चौ.मी. यांसी चतुःसिमा :- पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - सि.स.नं. ३१६६ वेर्णेकर यांची जागा, दक्षिणेस बोळ व सि.स.नं. ३१६६ वेर्णेकर यांची वहिवाटीचा रस्ता, उत्तरेस - सि.स.नं. ३१६५ पैकी कविता पाटील यांची घरजागा व ३१६४ पैकी चिडगुंपी यांची समाईक भिंतीची घरजागा.

वर नमुद मिळकत ही श्री. सुरेश रामचंद्र घुगे व श्री. शशिकांत रामचंद्र घुगे दोघे रा. विनायक रेसीडेन्सी, मोदी, सोलापूर यांच्या समाईक हिश्याची व मालकीची असून ती त्यानी आमचे अशिलास खुषखरेदीने देण्याचे मान्य व कबुल करून आमचे अशिलाकडून इसारा रक्कम घेऊन नमुद मिळकत निर्वेध निजोखमी असल्याचे खात्री दिलेली असून ठरल्याप्रमाणे आमचे अशिल खरेदीचा व्यवहार करणार आहेत.

तरी वरील नमुद मिळकतीबाबत ज्या कोणाचा काहीही वारसा हक्क, हितसंबंध, मालकी, कब्जा, वहिवाट, दान, टाच, खरेदी, बक्षीसपत्र, बँक बोजा, खाजगी सावकार, साठेखत वगैरे अन्य प्रकारचे करार व मदार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाच्या मुदतीत आमचे अशिलांशी खालील नमुद पत्यावर खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही काहीही तक्रार अगर हरकत न आलेस नमुद मिळकत निजोखमी असल्याचे ग्राहय धरून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मग त्यानंतर कोणाचीही काहीही तक्रार मुळीच चालणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली ता. ०६/०३/२०२६

सही/-
ॲड. सुनिल सी. हळ्ळी
एम कॉम. एलएलबी.
रा. ५/३, भवानी पेठ, सोलापूर.
मो.नं. ९४२२४६१९०४
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज ४७/२०२६
नि.७

**सोलापूर येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे समोर**

**श्री. तुळसीदास प्रभाकर जाधव**
वय ५४ वर्षे, व्यवसाय - व्यापार,
रा. अ-२८३/८४, न्यु आदित्य नगर,
आर.टी.ओ. ऑफिसजवळ, विजापूर रोड,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर- ४१३००४. — **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही** — **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी सोलापूर येथील मे. अतिरिक्त जिल्हा न्यायालयात चि. सोहम सुरेश पवार अज्ञान पालक म्हणून नेमणुक करिता अर्ज केलेला आहे. कै. सुरेश सोमा पवार यांचे दि. १५/०९/२०२१ रोजी निधन झाले त्यांचा मुलगा अज्ञान सोहम सुरेश पवार हा अर्जदार यांची बहिण कै. देविना सुरेश पवार यांचा मुलगा आहे. त्यांचे दि. १९/१२/२०२५ रोजी मुंबई येथे घरगुती गॅस सिलेंडर स्फोटात निधन झाले व त्यांचा आणखी एक मुलगा नामे सिध्दार्थ सुरेश पवार ही त्याच गॅस सिलेंडर स्फोटात जखमी होऊन दि. २०/१२/२०२५ रोजी मयत झाला. अज्ञान सोहम सुरेश पवार यास अर्जदार व्यतिरिक्त अन्य कोणीही अन्न, वस्त्र, निवार व शैक्षिणीक मदत करणर असे कार्यक्षम नाहीत. करीता त्यांचे पालन कर्ता म्हणून अर्जदार यास नियुक्ती करण्याबाबत विनंती केलेली आहे.

त्याअर्थी तमाम लोकांनां या जाहिर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येत की, पालनकर्ता म्हणून नियुक्त करण्यासाठी परवानगी देण्याबाबत कोणाची कसली हरकत असल्यास त्यांनी हे जाहिर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर नेमलेली तारीख ३०/०३/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय योग्य तो हुकुम करतील याची नोंद घ्यावी.

हे जाहीर प्रकटीकरण माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. ता. २६/०२/२०२६.

सही/- लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही/- अधीक्षक, जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर

**जाहीर प्रसिध्दीकरण**

सिव्हील एम. ए. नं. ८/२०२६

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डी. यांचे कोर्टात**

१) **श्री. चिदानंद म्हाळप्पा व्हनमाने**
रा. हन्नूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
२) **श्री. भिमाशंकर म्हाळप्पा व्हनमाने**
रा. हन्नूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
३) **श्रीमती सविता सिध्दलिंग व्हनमाने**
रा. हन्नूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
४) **श्री. विक्रम सिध्दलिंग व्हनमाने**
रा. हन्नूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही** — **सामनेवाले**

ज्याअर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८/२०२६ हा दि. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे दाखल केला असून अर्जदार नं. १ व २ चे वडील, अर्जदार नं. ३ चे सासरे व अर्जदार नं. ४ चे आजोबा म्हाळप्पा मलकप्पा व्हनमाने हे दि. २३/०४/२०२४ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांना शासकीय कामाकरीता अर्जदार हे म्हाळप्पा मलकप्पा व्हनमाने यांचे वारस असलेने अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र मिळावे याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत कै. म्हाळप्पा मलकप्पा व्हनमाने यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हा जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक १५/०४/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिध्द केले, ता. ०६/०३/२०२६

कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. आधक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट

**मध्य रेल्वे**
सोलापुर मंडळ
**जाहीर लिलाव**

भारताच्या राष्ट्रपतीच्या वतीने सोलापुर रेल्वे स्टेशन मालधक्का व पार्सल ऑफीस मधे डिलीवरी न घेतलेले, मालकी हक्क न सांगितलेले व रेल्वे स्टेशन हद्दीमध्ये मिळालेले असंबंध मालाची दिनांक 18.03.2026 रोजी दुपारी 2:30 वाजता भारतीय रेल्वेच्या अधिनियम कलम 83 व 84 प्रमाणे जाहिर लिलाव पध्दतीने विक्रि केली जाणार आहे. ज्या वस्तू प्रशसनाने ठरविलेल्या आरक्षित किमतीत विकल्या जाणार नाही, अशा सर्व वस्तू आरक्षित किमतीत विक्रीसाठी खुल्या केल्या जातील. प्रशासनाने लिलावात ठेवलेल्या वस्तूचे पूर्ण तपशील, दर्जा व संख्या इत्यादीबाबत जबाबदार राहणार नाही व कोणत्याही वस्तूचा लिलाव कारण न देता राखून ठेवण्याचा अधिकार प्रशासनास आहे.

14 | मंडल रेल प्रबंधक का कार्यालय, वाणिज्य शाखा / सोलापुर

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी**
ता. बार्शी, जि. सोलापूर
E-mail :- am_barshi@msamb.com
फोन. - ०२१८४-२२२९७६

**छपाई व लेखन साहित्य टेंडर सूचना**

उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शी, जि. सोलापूर या संस्थेस सन २०२६-२०२७ करीता छपाई व लेखन साहित्य घ्यावयाचे आहे. छपाई करुन देऊ इच्छिणाऱ्या मुद्रकांनी व लेखन साहित्य देऊ इच्छिणाऱ्यांनी आपल्या लेटरहेडवर सिलबंद पाकीट दि. १४/०३/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावीत. टेंडर पाकीटावर बाजार वर्ष २०२६-२०२७ च्या छपाई/स्टेशनरी टेंडर असे नमूद करावे निविदा देतेवेळी ऑफिसमधील छपाई नमुने व स्टेशनरी साहित्याचे नावे व नग पाहूनच निविदा द्याव्यात ही माहिती कार्यालयीन वेळेत मिळू शकेल.

सही/-
सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी

**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
SJSB Multi-State Scheduled Coop.Bank
मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com वेबसाईट : www.sjsbbank.com

(नमुना झेड)
**महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम १०७ ११ ( ड-१) नुसार**

**स्थावर मालमत्तेची ताबा नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेले वसुली व विक्री अधिकारी **सोलापूर जनता सहकारी बँक लि.** (मल्टी स्टेट शेड्युल्ड को-ऑफ बँक) यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये अधिकार प्राप्त असून, त्यांनी दि.०१/०७/२०१६ रोजी मागणी नोटीस थकबाकीदार-अर्पण सारीज, भागीदार १) श्री. अर्जुन मुरलीधर रोहरा व इतर ६ जण व जामीनदार यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम **रु. १६,७७,६२,३५८/- (अक्षरी रुपये सोळा कोटी सत्याहत्तर लाख बासष्ट हजार तीनशे अठ्ठावन्न रुपये मात्र)** आणि त्यावरील दि.०१/०१/२०२६ पासूनचे द.शा.द.शे. १५% व्याज येणे आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून कर्जदाराने संपूर्ण थकीत कर्ज रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे, खाली सही करणाऱ्याने दि. **०८/०१/२०२६** रोजी जप्तीची नोटीस दिली आहे.

कर्जदाराने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, कर्जदाराला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने **महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ ११(ड-१) अन्वये** दिलेल्या अधिकारानुसार **दि.०५/०३/२०२६** रोजी ताबा घेतला आहे.

विशेषकरून कर्जदार व जामीनदार यांचे आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास कर्जदार यांची दि. ३१/१२/२०२५ अखेरची व्याजासह एकूण येणेबाकी **रक्कम रु. १६,७७,६२,३५८/- (अक्षरी रुपये सोळा कोटी सत्याहत्तर लाख बासष्ट हजार तीनशे अठ्ठावन्न रुपये मात्र) आणि त्यावरील दि. ०१/०१/२०२६** पासूनचे होणारे व्याज याला अधीन राहावे लागेल.

**ताबा - स्थावर मालमत्तेचे वर्णन**

कर्जदार व जामीनदार-१) मे. अर्पण सारीज भागीदार श्री. अर्जुन मुरलीधर रोहरा व इतर ६ जण व जामीनदार चंद्रकांत अंबरप्पा अंबरशेट्टी (मयत) वारसदार - विजया च. अंबरशेट्टी (मयत) वारसदार - उमाकांत च. अंबरशेट्टी (मयत) वारसदार- अ.) जयश्री उ.अंबरशेट्टी (मयत) ब.) रक्षंदा उ.अंबरशेट्टी व २. विक्रांत च. अंबरशेट्टी (मयत) वारसदार- अ.) माणिक वि.अंबरशेट्टी ब.) रुचिता वि. अंबरशेट्टी ३.) राजश्री ज्ञानेश्वर रुकारी यांचे मालकीची मौजे. हिरज ता- उत्तर सोलापूर, येथील गट क्र./ उपविभाग क्र.९५/१ याचे क्षेत्रे १७.९७ आर.

**दिनांक : ०७/०३/२०२६**
**ठिकाण : सोलापूर**

शिक्का

सही/-
**वसुली व विक्री अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टीस्टेट शेड्युल्ड को-ऑप. बँक)**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील तमाम लोकांना आमच्या अशिलानी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका शहर हद्दीतील पेठ बापुजी नगर, उत्तर सदर बझार, सोलापूर या नावाने ओळखले जाणारे नगरातील ब्लॉक नं.४६ व रुम नं.२९६ ही मिळकत घरजागा आमचे अशिल श्रीमती कावेरी भिमराव कुलकर्णी यांचे पती कै. भिमराव बळवंत कुलकर्णी यांचे नांवावर असून यांचे दि. ०३/०७/१९९१ रोजी निधन झाले आहे. ब्लॉक नं.४६ व रुम नं.१९६ यांसी म.न.पा. मिळकत क्र. १७४४७५ असे आहे. सदर ठिकाणी १० X १२ फुटाची एक खोली व १० X १० फुटाची एक खोली अशा मापाच्या दोन खोल्या लोड बेअरींग बांधकाम करुन वरती स्लॅब घातलेले आहे. यात संडास, बाथरुम, लाईट व नळ कनेक्शनची सुविधा आहे.

अशा वर्णनाची घरजागेत आमचे अशिल श्रीमंती कावेरी भिमराव कुलकर्णी हे त्यांचे पतीचे हयातीपासूनच राहणेस असून सदरची मिळकत घरजागा आमचे अशिलांचे मयत पती कै. भिमराव बळवंत कुलकर्णी यांचे स्वकष्टार्जित मिळकत असून त्यांचे दि.०३/०७/१९९१ रोजी मृत्यु झालेला आहे. त्यांचे मृत्युपश्चात आमचे अशिल श्रीमती कावेरी भिमराव कुलकर्णी हे त्यांचे एकमेव धर्मपत्नी व कुटुंबकर्ती या नात्याने मुख्य वारस आहोत. तरी सदरहू बापूजी नगर, उत्तर सदर बझार येथील ब्लॉक नं. ४६ व रुम नं. २९६ या मिळकतीवर त्यांचे नांवाची वारस नोंद होवून त्यांचे नांवे करपावती मिळावे व बापूजी नगर सहकारी गृहनिर्माण संस्था, उत्तर सदर बझार या संस्थेच्या दप्तरी त्यांचे नांवाची वारस नोंद होवून संस्थेकडून वारस दाखला मिळण्याकरिता आमचे अशिल म.न.पा.कडे व गृहनिर्माण संस्थेकडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आंत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नांवाची वारस नोंद सो.म.पा.चे कर आकारणी विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख- ०६/०३/२०२६

सही/-
ॲड. ढेकणे एस.एम.
रा. १२६-अे, वाणी गल्ली बाळे,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
अशिलातर्फे ॲडव्होकेट

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# रोजगार निर्मितीची संधी... शेतकऱ्यांची कर्जमाफी...

**रोजगार निर्मितीच्या दृष्टीने राज्यात मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय युवकांसाठी संधी निर्माण करणारा आहे. मोठमोठ्या घोषणा करून जनतेची दिशाभूल करण्याचा हा प्रयत्न आहे. उद्योगवाढ आणि गुंतवणूक वाढवण्याच्या दृष्टीने सकारात्मक वाटतो. शेतकऱ्यांना अल्प कर्जमाफी करून त्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे, अशा संमिश्र प्रतिक्रिया राज्याच्या अर्थसंकल्पाविषयी सोलापूरकरांनी व्यक्त केल्या.**

## राज्याच्या चौफेर विकासाचा अर्थसंकल्प



अर्थसंकल्प सर्वसामान्य, शेतकरी व युवकांना दिलासा देणारा सर्वसमावेशक असाच आहे. पीक कर्जमाफीसाठी करण्यात आलेली तरतूद, वेळेवर कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर ५० हजारांचा लाभ तसेच सौर ऊर्जा योजनेमुळे दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. तसेच रोजगार निर्मितीच्या दृष्टीने राज्यात मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय युवकांसाठी संधी निर्माण करणारा आहे. याचबरोबर उद्योगाबाबतही अनेक निर्णय घेण्यात आल्याने सोलापूरकरांना याचा फायदा होणार आहे. एकंदरीत, सर्वसमावेशक दृष्टीकोनातून हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला.

**- सुभाष देशमुख, आमदार**

## अर्थसंकल्पाचे स्वागत



मागील काही वर्षांपासून ज्या योजना आहे त्या मुळे विकास प्रकल्प पुढे नेत असताना बजेट सादर केला आव्हान पेलले आहे. सर्व समावेश विकसित असा बजेट आहे. शेती केंद्र स्थानी ठेवून बजेट सादर केला आहे. अनेक विकास प्रकल्प मेट्रो रेल्वे मोनोरेल विमान राज्यातील रस्ते महामार्ग चांगले रस्ते आहेत. महिलांना विविध प्राधान्य उद्योग क्षेत्र विकास प्रकल्प पुढे नेत असताना रोजगार आधुनिक तंत्रज्ञान विकसित करणार आहे. तरतूद समाधानकारक आहे.

**- श्रीकांत मोरे, अर्थतज्ज्ञ, मनोरमा बॅंक, सोलापूर**

## शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या



राज्य सरकारने दोन लाखापर्यंत थकीत कर्जदार शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन दिलासा दिला आहे. त्या यामुळे शेतकर्यांना फायदा होणार आहे . मात्र जे शेतकरी नियमित कर्ज भरून बँकेत स्वतःची पत निर्माण करतात, त्या शेतकऱ्यांना सरकारकडून फक्त ५० हजार रुपये अनुदान देऊन त्यांची बोळवण करण्यात आली आहे. नियमित कर्ज भरणे शेतकऱ्यांना हानिकारक ठरत आहे, कारण थकीत कर्जदारांची कर्जमाफी होत आहे. तर नियमित्त कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपये अनुदान मिळणेही कठीण होत आहे. त्यामुळे सरकारने सर्व शेतकऱ्यांचे सरसकट कर्जमाफी करावे.

**-श्रीकांत भरले, प्रगतशील शेतकरी, हत्तुर**

## शेतकरी पुन्हा कर्जबाजारी होणार



शेतकऱ्यांना दोन लाखापर्यंत कर्जमाफीचा निर्णय स्वागताचा निश्चितच आहे. मात्र त्यात अटी शर्ती न टाकता सरसकट कर्जमाफी केली पाहिजे. सर्वच बँकातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले पाहिजे. कर्जमाफीचा मुद्दा सोडला तर शेतकऱ्यांसाठी हितावह अशी अन्य कोणतीही बाब या अर्थसंकल्पात नाही. शेतकरी पुन्हा कर्जबाजारी होणार नाही अशी व्यवस्था निर्माण करण्याबाबत कोणतीही तरतूद केलेली नाही. परिणामी हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांच्या दुःखावर एक तात्पुरती मलमपट्टी आहे.

**-विजय रणदिवे, जिल्हाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना**

## दूरदृष्टी दर्शविणारा प्रेरणादायक अर्थसंकल्प.



यंदा महायुती सरकारकडून सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प निर्णायक तसेच आशादायक वातावरण निर्माण करणारा आहे. कृषीक्षेत्रात भांडवली गुंतवणूक, मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद योजनेंतर्गत रस्ते बांधणे, १५ पीकांची एकत्रित मूल्य साखळी बनविणे, मत्स्य संवर्धनासाठी १२४० कोटी रुपये निधी हे शेतकऱ्यांना फायदेशीर ठरेल. उद्योगांना चालना देणारे निर्णय घेण्यात आलेले आहेत. आवास योजनेंतर्गत घरांवर सौरउर्जा यंत्रे, मुंबई ते पुणे हायस्पीड रेल्वेमार्गासाठी मोठी तरतूद, गडचिरोली 'स्टील हब' व त्यातून ७०,००० नवीन रोजगार उपलब्ध होणार. १० लाख परवडणारी घरे बांधणार. तिसरी मुंबई आणि वाढवण बंदर परिसरात चौथी मुंबई विकसित करणे अशा अनेकविध नाविन्यपूर्ण गोष्टींमुळेच हा अर्थसंकल्प महाराष्ट्रातील जनतेसाठी उत्साहवर्धक आणि सुखावह आहे.

**- प्रीतम सावळे, माढा महातपूर (नॅशनल फिल्ड मार्केटिंग मॅनेजर, बीएएसएफ इंडिया लिमिटेड, मुंबई)**

## विकसित महाराष्ट्राची चिंता वाढवणारा अर्थसंकल्प



अर्थसंकल्प मांडताना पायाभूत सुविधा व सुधारणाकडे दुर्लक्ष केले आहे. निवडणूक काळात संपूर्ण सातबारा कोरा करू म्हणणाऱ्या सरकारने पुन्हा शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. महिलाना पुन्हा लखपती दिदीची भूलथाप दिली आहे. आश्वासनाची खैरात दिली आहे. शेतमालावरील प्रक्रिया उद्योग, शेतीमालाला हामी भाव, नविन उद्योग निर्मिती, रोजगाराची संधी, महिलांची सुरक्षा याविषयी ठोस कसलीही तरतूद अर्थसंकल्पात केली नाही.यामुळे स्वाभीमानी महाराष्ट्र निर्मितीचे स्वप्न पुन्हा धुळीला मिळाले आहे.

**-अस्मिता गायकवाड, शिवसेना उबाठा उपनेत्या**

## औद्योगिक विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प



राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प राज्याचे मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत मांडला आहे. सोलापूर शहराच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची बाब म्हणजे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मंजूर झाले आहे. तसेच कृषी क्षेत्रातील विविध योजना आणि महत्त्वाचे म्हणजे शेतकरी कर्जमाफी जाहीर केल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे.

**- विनोद भोसले, नगरसेवक तथा सी.ए.**

## वचनपूर्ती करणारा अर्थसंकल्प



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी मांडलेला अर्थसंकल्प राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचे दिलेले वचन पूर्ण करणारा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पातून राज्यातील प्रत्येक क्षेत्राच्या विकासासाठी चालना मिळणार आहे. उद्योग अर्थव्यवस्था १२ पटींनी वाढवण्याचे उद्दिष्ट, महाराष्ट्राला जागतिक उत्पादनाचे केंद्र बनविण्याचे ध्येय यातून महाराष्ट्रातील शहरे आणि ग्रामीण भाग अर्थसक्षम होणार आहेत.

**- देवेंद्र कोठे, आमदार**

## शेतकरी, शेतमजूर, व्यापारी विचार करणारा



हा अर्थसंकल्प शेतकरी शेतमजूर व्यापारी आणि समाजातील सर्व घटकांचे विचार करणारा आहे. माझ्या मतदारसंघातील खराब झालेल्या ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी राज्यची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन ३० कोटी रुपये मंजूर करण्यात आले. ग्रामीण भागातील रस्ते ही एक प्रकारे अर्थवाहिनी आणि रक्तवाहिनीच असते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला जवळच्या बाजारपेठेत जाण्यासाठी, मुलांना शाळेत जाण्यासाठी, आजारी लोकांना दवाखान्यात जाण्यासाठी सोय होते अशा सर्व लोकांचा विचार करून हा अर्थसंकल्प मांडला आहे.

**- राजू खरे, आमदार**

## समाजाच्या सर्व घटकांना न्याय देणारा



राज्यातील सध्या सुरू असलेल्या कोणत्याही योजना बंद न करतां छोट्या शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजने अंतर्गत २ लाखापर्यंतची कर्जमाफी आणी नियमित कर्ज परतफेड करणारे शेतकरी याना ५ हजार रुपयांची मदत करत शेतकरी हिताचे निर्णय करणारे हे महायुती सरकार आहे हे सिद्ध केले. हा अर्थसंकल्प समाजाच्या सर्व घटकांना न्याय देणारा असेल अशी भूमिका राज्याचे मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. याशिवाय ख यासारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीचे उत्पादन वाढ खर्चात बचत आणि चांगले आणि उत्पादन कसे होईल यासाठी केलेले तरतूद ही भावी पिढ्या बळकट करणारी बाब आहे. *यामुळे जय जवान जय किसान जय विज्ञान जय तंत्रज्ञान हा नवा नाराच त्यांनी दिला असल्याचे दिसत आहे. त्यामुळे अर्थमंत्री व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळाचे अभिनंदन करत आहे.

**- शंकरराव वाघमारे माजी जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश उपाध्यक्ष भाजपा महाराष्ट्र**

## प्राथमिक शिक्षणावर निधीची तरतूद करणे अपेक्षित



राज्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांचा भौतिक विकास करण्यासाठी व गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यासाठी ज्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याची गरज होती त्याची तरतूद या अर्थसंकल्पात झाली नाही. त्यामुळे मराठी शाळांचा पट भविष्यात देखील कमी होत जाईल व समाजाला मुलांच्या शिक्षणासाठी खाजगी शाळांना भरमसाठ फी भरावी लागेल. बालकांच्या शिक्षण हक्क कायद्याच्या रक्षणासाठी व मोफत शिक्षण देण्याच्या राज्याच्या कर्तव्यासाठी शासनाने या अर्थसंकल्पात प्राथमिक शिक्षणावर भर देण्यासाठी निधीची तरतूद करणे अपेक्षित होते. शेवटी मराठी शाळा वाचवण्यासाठी जनतेलाच प्रयत्न करावे लागतील.

**- विजयकुमार गुंड, जिल्हा प्रवक्ता, शिक्षक भारती, सोलापूर**

## महिलांना न्याय देणारा



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे दरवेळी राज्याचा अर्थसंकल्प सादर करायचे. अजित दादांना ग्रामीण भागाची जाण असल्याने त्यामध्ये ग्रामीण भागाचे प्रतिबिंब दिसायचे. त्याच धर्तीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी ग्रामीण भागाला, शेतकरी आणि महिलांना न्याय देणारा सर्वसामान्य जनतेची आर्थिक बाजू भक्कम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व तरतुदी केलेला अर्थसंकल्प सादर करून राज्याला दोन वर्षे पुढे नेण्याची भूमिका या अर्थसंकल्पातून घेतल्याचे दिसून येते. आणि हा अर्थसंकल्प अजितदादांना समर्पित केल्याची घोषणा केली त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन आणि आभार.

**- कल्पना निकंबे-(क्षीरसागर), माजी समाज कल्याण सभापती**

## विकासाला चालना देणारा



ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना देणारा रस्ते विकास हा या वर्षीच्या अर्थ संकल्पातील महत्वाचा मुद्दा आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून राज्यात मोठ्या प्रमाणावर रस्ते विकासाची कामे सुरू आहेत. हजारो किलोमीटर रस्त्यांचे बांधकाम व मजबुतीकरण करून ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्या आणि दुर्गम आदिवासी भागांना बारमाही रस्त्यांनी जोडले जात आहे. रस्त्यांचे प्रश्न सुटल्याने विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. तसेच शेतपाणंद रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजना राबविण्यात येत आहे. मजबूत रस्ते म्हणजेच शेतकरी, उद्योग आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा भक्कम पाया होणार आहे

**- ॲड.अमोल देशपांडे, (अध्यक्ष, विधीज्ञ मंडळ, मोहोळ)**

## राज्याची खंबीर वाटचाल करणारा अर्थसंकल्प



अर्थसंकल्प सर्वसामान्य, शेतकरी व युवकांना दिलासा देणारा सर्वसमावेश असाच आहे. पीक कर्जमाफीसाठी करण्यात आलेली तरतूद, वेळेवर कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर ५० हजाराचा लाभ तसेच सौर ऊर्जा योजनेमुळे दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. तसेच रोजगार निर्मितीच्या दृष्टीने राज्यात मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय युवकांसाठी संधी निर्माण करणारा आहे. एकंदरीत, विकसित महाराष्ट्र २०४७ कडे वाटचाल करणारा अर्थसंकल्प आहे.

**- रोहिणी तडवळकर, भाजपा शहराध्यक्षा**

## आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अर्थसंकल्प



हा अर्थसंकल्प म्हणजे ग्रामीण आणि शहरी भागाचा समन्वय आणि समतोल राखणारा आहे. विशेष म्हणजे ए आय तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतीची उत्पादन वाढ, खर्चात बचत आणि सकस निरोगी अन्न तयार करणारे उत्पादन करण्यावर भर देणारा हा आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अर्थसंकल्प आहे. याचा उपयोग निश्चितपणे शेतीची सुधारणा चांगले उत्पन्न आणि तंत्रज्ञानाचा वापर करून उद्योग समृद्धी होण्यासाठी होईल . अशा प्रकारचा शेतीसाठी ए आय आधारित अर्थसंकल्प सादर करणारे आपले महाराष्ट्र हे पहिलेच राज्य ठरले आहे. तसेच कर्जमाफीकडे टाकलेले पाऊल हे सुद्धा शेतकरी समृद्ध करण्याचे दृष्टीने केलेले ठोस प्रयत्न आहेत. त्यामुळे मी अर्थमंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अनाथ शिंदे आणि सुनेत्रा वहिनी पवार यांचे आणि राज्य सरकारचे अभिनंदन करत आहे.

**-राजन पाटील, माजी आमदार आणि भाजप नेते**

## बळीराजाला दिलेला शब्द पाळला



२ लाख पर्यंत कर्जमाफी तसेच नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन.. दिवंगत अजित दादा यांच्या स्मरणार्थ दरवर्षी गतिमान नागरी सेवा पुरस्कार दिला जाईल. समाजकल्याण, शिक्षण व कौशल्य, उत्तम आरोग्य यावरती केंद्रित करून मांडलेला अर्थसंकल्प असून यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्राताई पवार यांचे मी अभिनंदन करत आहे.

**- सिद्धी वस्त्रे, नगराध्यक्षा मोहोळ**

## नव्या युगाचा अर्थसंकल्प



अर्थसंकल्प हा केवळ आर्थिक दस्तऐवज नसून राज्याच्या भविष्योन्मुख विकासदृष्टीचा विचारपूर्वक मांडलेला आराखडा आहे. डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नवोपक्रम यांना दिलेले प्राधान्य राज्याच्या अर्थव्यवस्थेला ज्ञानाधिष्ठित बळ देणारे आहे. ग्रामीण-शहरी दरी कमी करत नव्या संधी निर्माण करण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात दिसतो. त्यामुळे हा अर्थसंकल्प आर्थिक नियोजनाबरोबर सामाजिक परिवर्तनाचीही नवी शक्यता निर्माण करणारा ठरतो.

**- प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर**

## शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार



मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस साहेब यांनी आज अर्थसंकल्प सादर केला यामध्ये शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा केली याबद्दल सरकारचे मनःपूर्वक आभार परंतु ही कर्जमाफी फक्त पीक कर्जासाठीच व फक्त दोन लाख मर्यादेपर्यंतच आहे याशिवाय काही निकष या कर्जमाफीसाठी लावले जाणार आहेत यामुळे मध्यम मुदत कर्ज असणारे, दीर्घ मुदत कर्ज असणारे शेतकरी कर्जमाफी पासून वंचित राहणार आहेत याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी फक्त ५० हजार रुपये प्रोत्साहन पर अनुदानाची घोषणा केली आहे त्यामुळे ही कर्जमाफी तोकडी वाटते. कर्जमाफी ही शेतकऱ्यांना सरसकट करायला हवी होती.

**- वैभव वसंतराव पोळ (लघुउद्योजक व अध्यक्ष लोकविकास फार्मर प्रोड्युसर कंपनी शेटफळ)**

## आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचे अर्थसंकल्प



महाराष्ट्र राज्य सरकारने सादर केलेला यंदाचा अर्थसंकल्प विकासाभिमुख आणि सर्वसमावेशक असल्याचे दिसून येते. पायाभूत सुविधा, उद्योगवाढ, शेती आणि रोजगारनिर्मितीवर दिलेले प्राधान्य राज्याच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचे आहे. उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी जाहीर केलेल्या योजना आणि गुंतवणुकीस प्रोत्साहन देणारे निर्णय स्वागतार्ह आहेत. ग्रामीण विकास, सिंचन आणि शेतकऱ्यांसाठी केलेल्या तरतुदीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळेल अशी अपेक्षा आहे. तसेच तरुणांसाठी कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर दिलेला भर सकारात्मक आहे. मात्र जाहीर केलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली तरच त्याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचेल. एकूणच हा अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे पाऊल ठरेल.

**- किरण कोठारी, अध्यक्ष कोठारी ग्रीटेक प्रा. लि. मोहोळ**

## नवीन उद्योग गुंतवणुकीसाठी अनुकूल अर्थसंकल्प



महाराष्ट्र सरकारने सादर केलेला २०२६-२७ चा अर्थसंकल्प उद्योगवाढ आणि गुंतवणूक वाढवण्याच्या दृष्टीने सकारात्मक वाटतो. पायाभूत सुविधा, कनेक्टिव्हिटी आणि औद्योगिक विकासावर दिलेला भर राज्यात नवीन उद्योग गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करेल. औद्योगिक क्षेत्राला पूरक धोरणे आणि प्रकल्पांमुळे उत्पादन क्षेत्र, ऑटोमोबाईल आणि ऑटो-कॉम्पोनंट उद्योगांना मोठी संधी निर्माण होईल. महाराष्ट्र आधीच देशातील महत्त्वाचे ऑटोमोबाईल उत्पादन केंद्र आहे आणि या अर्थसंकल्पामुळे त्या क्षेत्राला आणखी गती मिळेल. एकूणच, उद्योग-अनुकूल दृष्टीकोन आणि विकासाभिमुख तरतुदींमुळे राज्यातील उत्पादन व ऑटोमोबाईल क्षेत्राच्या वाढीस निश्चितच चालना मिळेल, असा विश्वास आहे.

**- यतिन शहा, संचालक, प्रिसिजन कॅमशॉफ्ट लि.**

## ग्रामीण भागातील अर्थकारणाला चालना देणारा



राज्यातील अनेक भागामध्ये यंदा झालेल्या पावसाने शेतकऱ्यांची अतोनात नुकसान झाले आहे. या नुकसानेची केंद्र सरकार व राज्य सरकारने काही अंशी भरपाई दिली आहे. या अर्थसंकल्पात दोन लाख रुपये कर्ज माफीची घोषणा शेतकऱ्यांसाठी मोठी जमेची बाजू आहे. त्याचबरोबर उद्योग व्यवसायाला चालना देण्यासाठी शासनाने यात तरतूद केली आहे. यावेळीचा अर्थसंकल्प स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या अनुपस्थितीत होत असला तरी दादांच्या विचारांचाच अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केला आहे.

**- ॲड. मीनल साठे, नगराध्यक्षा माढा**

## समतोल साधणारा अर्थसंकल्प



अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने समतोल साधणारा आहे. यामध्ये प्रामुख्याने विचार केल्यास स्व. अजित दादांचे स्मारक उभारणी करून हा अर्थसंकल्प अजित दादाना समर्पित केल्याचं अर्थमंत्री तथा मुख्यमंत्री फडणवीसांनी जाहीर केले. उद्योगासाठी जाहीर केलेलं धोरण रोजगार निर्मिती करण्यास प्रोत्साहन मिळेल देणारे आहे. तसेच शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा ही यात जमेची बाजू म्हणावी लागेल. पण शेतकऱ्यांसाठी आशादायक बाब म्हणजे उत्पादित केलेल्या मालाला भाव नाही त्याबदल्यात सरकारने भरपाई देणं अपेक्षित होतं ते झालं नाही.

**- औदुंबर वाकावकर, निवृत्त पोलिस अधिकारी, माढा**

## केवळ घोषणांचा पाऊस



महाराष्ट्राचा अर्थसंकल्प हा विकासाचे गाजर दाखवणारा असून सोलापूरच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या दृष्टीने निराशाजनक आहे. मोठमोठ्या घोषणा करून जनतेची दिशाभूल करण्याचा हा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांना अल्प कर्जमाफी करून त्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. कांदा उत्पादकांना तर पदरमोड करावी लागली इतका कमी भाव कांद्याला मिळत आहे. कांदा उत्पादकांना अनुदानाची अपेक्षा होती. परंतु सरकारने ती फोल ठरविली आहे.

**- सातलिंग शटगार, जिल्हाध्यक्ष कॉंग्रेस**

## अर्थसंकल्पात सोलापूरचा विचार नाही

राज्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून योग्य अर्थसंकल्प मात्र सोलापूरसाठी भरीव तरतूद आवश्यक होती. परंतु तसे प्राथमिक स्तरावरून दिसले नाही. नवनवीन उद्योग आणि रोजगार निर्मिती यावर प्रश्नचिन्ह आहे. सोलापूर शहर जिल्ह्यासाठी भरीव निधीची तरतूद नसल्याने कमतरता जाणवते. आयटीपार्क संदर्भात घोषणा आवश्यक होती परंतु तसे काही झाले नाही.

**- सी. ए. सुशील बंदपट्टे**

## कर्जमाफीची अंमलबजावणी होणे गरजेचे

शेतकऱ्यांसाठी केवळ कर्जमाफी केली. मात्र शेतकरी कर्जबाजारी होऊ नये, यासाठी ठोस पर्यायी उपयोजनात्मक योजनांची तरतूद नाही. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होण्याचे प्रमाण कायम राहणार आहे. त्याच पद्धतीने कर्जमाफीची घोषणा केली आहे. परंतु त्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांसाठी इतर काही योजना राबवण्यात येणार असल्याची घोषणा केली. परंतु त्या जुन्याच योजना पुन्हा पॉलिश करून समोर आणल्या गेल्या आहेत.

**- विजय रणदिवे, जिल्हाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना**

## राज्याचा सर्वसमावेशक अर्थसंकल्प

सर्वसामान्य, शेतकरी व युवकांना दिलासा देणारा सर्वसमावेश असाच अर्थसंकल्प आहे. रोजगार निर्मितीच्या दृष्टीने राज्यात मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय युवकांसाठी संधी निर्माण करणारा आहे. मुंबई, पुणे आदींबाबतही योग्य निर्णय यामध्ये घेण्यात आले आहेत. याबरोबरच महिलांसाठी सुरू असलेल्या योजनांचा लाभ पुढेही सुरू राहणार असल्याने कुटुंबांच्या आर्थिक स्थैर्याला मदत होईल, यामुळे आपल्या सोलापूर जिल्ह्यांमध्ये उद्योग व रोजगार वाढण्यास चालना मिळेल.

**- शशिकांत चव्हाण, भाजपा जिल्हाध्यक्ष**

## फुगीर आकड्यांचा अर्थसंकल्प

अर्थसंकल्पात ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. शेतकऱ्यांचा विरोध असताना देखील शक्तिपीठ महामार्ग कोणाच्या हट्ट साठी करण्यात येत आहे याचा मात्र खुलासा करण्यात आला नाही शहरा ऐवजी ग्रामीण भागातल्या लघुउद्योग, शेतकर, शेतमजूर, सर्वसामान्य गृहिणी यांच्याकडे स्पष्ट दुर्लक्ष केल्याचे या अर्थसंकल्पातून दिसून येत आहे

**- प्रा. काकासाहेब कुलकर्णी, प्रदेश प्रवक्ता कॉंग्रेस कमिटी**

## महत्वाचे...



### निबंध स्पर्धेत १०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**सोलापूर, दि. ६ मार्च-**

माझा शिवबा चंद्रनील फाउंडेशन अंतर्गत निबंध स्पर्धांमध्ये जिजामाता प्रशाला कोंडी उत्तर सोलापूर या प्रशालेचे ८ विद्यार्थ्यांनी मिळवला. ज्ञानेश्वर शिंदे द्वितीय, श्रावणी पवार द्वितीय, तनुजा थोरवडे तृतीय क्रमांक तसेच शितल सौदागर ढगे, प्रांजलीी पवार, साक्षी देशपांडे, कल्याणी वाघमारे आदी विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ व सचिवा शिल्पा ठोकळ आणि मुख्याध्यापक उदय जाधव यांनी अभिनंदन केले. स्पर्धेसाठी सारंग पाटील यांनी परिश्रम घेतले.



### माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांचा मंदिर समितीतर्फे सत्कार

**अक्कलकोट, दि.६ मार्च-**

श्री स्वामी समर्थांचे आशीर्वाद मोलाचे आहेत. त्यांच्या कृपेनेच जनतेची प्रामाणिकपणे सेवा करत असल्याचे माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी सांगितले. येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास त्यांनी भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील व तुळजापूरचे नगरसेवक विशाल रोचकरी यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सत्कार केला. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रा.शिवशरण अचलेर, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, प्रसाद सोनार, समर्थ स्वामी, तुषार मोरे, धनराज स्वामी आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.

### नान्नज येथील खून प्रकरणात ३ सख्ख्या भावांची निर्दोष मुक्तता

**अक्कलकोट, दि. ६ मार्च-**

नान्नज (ता.उत्तर सोलापूर) येथील गाजलेल्या खून प्रकरणात तीन सख्ख्या भावांची सबळ पुराव्याअभावी सोलापूर जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांनी निर्दोष मुक्तता केली. फिर्यादीच्या जबाबनुसार, मयत फुलचंद पवार यांना शिवीगाळ व वादातून मारहाण करण्यात आली होती. भांडणा दरम्यान ते घरासमोरील चेंबरवर पडून गंभीर जखमी झाले व उपचारादरम्यान सिव्हिल हॉस्पिटल, सोलापूर येथे त्यांचा मृत्यू झाला. आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात पिंटू राजू पवार (वय २५ वर्षे), कालिदास राजू पवार (वय २१ वर्षे) व अनिल राजू पवार (वय १९ वर्षे), सर्व रा. नान्नज, ता. उत्तर सोलापूर, यांच्याविरुद्ध सोलापूर तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल करण्यात येऊन खटला चालविण्यात आला. यामध्ये सरकारतर्फे एकूण ९ साक्षीदार तपासण्यात आले. मात्र, आरोपीतर्फे ॲड. कदीर औटी यांनी युक्तिवाद केला. सदर युक्तिवाद मान्य करून संबंधित प्रकरणातील सर्व बाबींचा सखोल विचार करून न्यायालयाने सबळ व ठोस पुराव्या अभावी तिन्ही आरोपींची न्यायाधीश शर्मा यांनी निर्दोष मुक्तता केली. आरोपीतर्फे ॲड. कदीर औटी, ॲड. दत्तात्रेय कापुरे, ॲड. वैभव बोंगे, ॲड. ओंकार फडतरे, ॲड. शिवरत्न वाघ, ॲड. मोहीम पठाण, ॲड. मनीष बाबरे, ॲड. रोहित थोरात, ॲड. त्वरिता वाघ व ॲड. अजय वाघमारे यांनी काम पाहिले. सरकारतर्फे ॲड. कुर्डूकर यांनी बाजू मांडली.

### माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या अक्कलकोट तालुका अध्यक्षपदी ॲड. टिनवाला



**अक्कलकोट दि. ६ मार्च-**

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या अक्कलकोट महिला तालुका अध्यक्षपदी ॲड. फारिया टिनवाला यांची निवड करण्यात आली. ही नियुक्ती पुढील तीन वर्ष किंवा पुढील आदेश येईपर्यंत लागू राहील. सदर दिलेले पद हे मानद स्वरुपाचे असून भारतीय संविधान, भारतीय कायदे व माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनची आचारसंहिता यांचे काटेकोरपणे पालन करायचे आहे. सर्वसामान्य नागरिक व समाजामध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ पसार व प्रचार करावा अशी अपेक्षा नियुक्ती पत्र देताना राज्याध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी व्यक्त केली.



### खेडगी महाविद्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात

**अक्कलकोट, दि.६ मार्च -**

येथील सी. बी. खेडगी महाविद्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थिनींनी 'माय भूमी, जन्मभूमी, कर्मभूमी आमुची' हे प्रेरणादायी गीत सादर केले. प्रा. वर्षाराणी हत्ताळी यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. एस. धबाले होते. प्रा. श्रीकांत जिद्दीमनी, प्रा. श्रीमंत बुक्कानुरे, डॉ. सोमनाथ राऊत यांची उपस्थिती होती. प्रा. महेश पाटील, प्रा. नागेश विजापुरे, प्रा. गिरी, प्रा. दिपीका दिवटे, प्रा. रत्नप्रभा उप्पिन, प्रा. ललिता लवटे आदीसह विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. शिवशरण कलशेट्टी यांनी विशेष सहकार्य केले. प्रा. अभिजीत कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. हत्ताळी यांनी आभार मानले.

# पंढरपूर एमआयडीसीचा प्रश्न तात्काळ मार्गी लावा : उद्योगमंत्री सामंत

## अधिकाऱ्यांची घेतली बैठक; आमदार आवताडे यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ मार्च -**

पंढरपूर एमआयडीसी मार्गी लागण्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच सूचना केल्या आहेत. पंढरपूर एमआयडीसीच्या बाबतीत लवकरात लवकर मार्गी लावण्याकरिता संबंधित अधिकाऱ्यांनी मर्यादित वेळेत हा विषय सोडवा, अशा सूचना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी एमआयडीसीच्या संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.



पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर एमआयडीसीच्या संदर्भात विधान भवन मुंबई येथे अर्थसंकल्पीय अधिवेशना दरम्यान उद्योग मंत्री उदय सामंत त्यांच्याकडे पाठपुरावा करण्याकरिता बैठकीत केलेला पाठपुरावा आणि वस्तुस्थिती मांडली. आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर एमआयडीसी (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) संदर्भात सातत्याने पाठपुरावा केला. हा प्रश्न तब्बल ४० वर्षांपासून प्रलंबित होता, ज्यामुळे पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी ते प्रयत्नशील आहेत. आमदार समाधान आवताडे यांनी उद्योग मंत्रालय, एमआयडीसी अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क साधून, बैठका घेऊन आणि अखंड पाठपुरावा करून कासेगाव (ता. पंढरपूर) येथे एमआयडीसीसाठी यापूर्वी मंजुरी मिळवली आहे. यामध्ये ऑगस्ट २०२४ मध्ये उद्योग मंत्रालयाने ५४ एकर जमीन 'औद्योगिक क्षेत्र' म्हणून घोषित केली.

याबाबत अध्यादेश काढण्यात आला, ज्यामुळे एमआयडीसी उभारणीला गती मिळाली. दरम्यान, अर्थसंकल्प अधिवेशनात झालेल्या बैठकीत पंढरपूर एमआयडीसी हा विषय मार्गी लावण्याचे आदेश उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली. यावेळी एमआयडीसीचे सर्व अधिकारी उपस्थित होते. त्यामुळे पुढील काम गतीने होण्याची शक्यता आहे.



## कल्याणशेट्टी संकुलात २४२ विद्यार्थिनींची अरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.६ मार्च-**

येथील कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात झालेल्या शिबिरात सुमारे २४२ विद्यार्थिनींची अरोग्य तपासणी करण्यात आली. रक्तदाब, रक्तातील साखरेचे प्रमाण, हिमोग्लोबिन, रेड ब्लड काउंट, व्हाईट ब्लड काउंट, प्लेटलेट यांची तपासणी यावेळी झाली.

कै. पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाचे रासेयो विभाग, सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सेमी इंग्लिश विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरण सप्ताहात महिला आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शितल जाधव, उज्वला फडतरे शिवानी शिरोदे, शबाना शिकलगार, माधव जिवनगे यांनी तपासणी केली. अध्यक्षस्थानी मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. मुख्याध्यापक भरमशेट्टी यांनी प्रस्ताविक केले. कल्पना स्वामी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.शितल झिंगाडे-भस्मे यांनी आभार मानले.

## राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त बार्शीच्या श्री शिवाजी महाविद्यालयात व्याख्यान

### डॉ. अब्दुल कलाम यांच्या बरोबरचे क्षण संस्मरणीय : डॉ. व्यंकटेश गंभीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ मार्च -**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या विज्ञान मंडळाच्या वतीने राष्ट्रीय विज्ञान दिन निमित्त आधुनिक तंत्रज्ञान व संधी या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. ए. बी. शेख हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विज्ञान केंद्र, सोलापूरचे वरिष्ठ संशोधक व माजी संचालक डॉ. व्यंकटेश गंभीर हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे आणि सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय विज्ञान मंडळाचे समन्वयक डॉ. आर. आर. कोठावळे यांनी करून दिला. यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. व्यंकटेश गंभीर यांनी आधुनिक तंत्रज्ञान व संधी या विषयावर मार्गदर्शन करताना विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे विद्यार्थ्यांसाठी निर्माण झालेल्या विविध करिअर संधींबद्दल सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी विज्ञानाकडे संशोधनात्मक दृष्टीकोनातून पाहावे, असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर इस्रोची कामगिरी सांगून डॉ. अब्दुल कलाम यांच्या बरोबर व्यतीत केलेल्या क्षणांचा मागोवा घेतला. त्यांच्या बरोबर संशोधन कार्य करतानाचे क्षण संस्मरणीय होते. कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. ए. बी. शेख यांनी विज्ञानाच्या प्रगतीत विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी मान्यवरांच्या हस्ते प्रश्नमंजूषा व निबंध स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राहुल पालके व डॉ. युवराज नवले यांनी केले तर आभार डॉ. डी. के. जमाले यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महिलांनी अन्यायाविरोधात आवाज उठवावा

- जिल्हा सरकारी वकील राजपूत यांचे आवाहन
- कै. आवाबाई वाडिया कर्तृत्वशालिनी महिला पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**



समाजव्यवस्था सुरक्षित पाहिजे, संवेदनशीलता, संस्कार व संस्कृतीची जपणूक ही आपली जबाबदारी आहे. महिलांवरील अत्याचाराला आळा घालायचा तर महिलांनी आवाज उठवावा असे आवाहन जिल्हा सरकारी वकील तथा सी.बी.आय. कौन्सिल ॲड. प्रदीपसिंह राजपूत यांनी केले.

श्री. सिद्धेश्वर वुमन्स इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये महिला दिनानिमित्त फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या वतीने व कॉलेज च्या ऑफ इंजीनियरिंग, सोलापूर यांच्या सहकार्याने जागतिक महिला दिनानिमित्त कै. आवाबाई वाडिया कर्तृत्वशालिनी महिला पुरस्काराचे वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या माजी अध्यक्षा प्रा. डॉ. नभा काकडे होत्या.

यावेळी व्यासपीठावर श्री. सिद्धेश्वर वुमेन्स कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचे प्राचार्य डॉ. टी. पी. चव्हाण, मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, फायनान्स डव्हायझर सपना चिट्टे, सदस्या प्रा. डॉ. विजया महाजन, डॉ. राजीव प्रधान, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड उपस्थित होते.

ॲड. रोजपूत यांच्या हस्ते स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ डॉ. मंजुश्री यशवंत कुलकर्णी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, भाजपा शहराध्यक्षा व नगरसेविका रोहिणी रामचंद्र तडवळकर, पाखर संकुलच्या अध्यक्षा शुभांगी जयकृष्ण बुवा, समाजसेविका कॉ. ॲड. सरिता मोकाशी, विद्यमान नगरसेविका वंदना अजित गायकवाड, बालविकास प्रकल्प सदस्या ॲड. सुवर्णा हेमंत कोकरे यांचा सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल व बुके देवून सत्कार करण्यात आला. यावेळी प्रथमच सिद्धेश्वर इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थिनींनी तयार केलेल्या रोबोटच्या साहाय्याने सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व बुके देण्यासाठी वापर करण्यात आला तसेच सिद्धेश्वर कॉलेजच्या पी.एचडी प्राप्त शिक्षकांचा महिला दिनानिमित्त सन्मान करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक अरुण भालेराव, अजित गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत प्राचार्य डॉ. टी. पी. चव्हाण यांनी केले. प्रास्ताविक प्रा.डॉ.विजया महाजन यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सोनाली पाटील यांनी केले तर आभार प्रा. अमृता निंबार्गीकर यांनी केले.



## सांगोला महाविद्यालयात विद्यापीठस्तरीय कार्यशाळा

**सांगोला, दि. ६ मार्च -**

फायनान्शिअल लिटरसी अँड इन्व्हेस्टमेंट लिटरसी या विषयावर सांगोला महाविद्यालयातील वाणिज्य विभाग अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष तसेच मेसर्स मोतीलाल ओसवाल फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी व्यवसाय विकास व्यवस्थापक निनाद रामदासी यांनी बचतीचे महत्त्व, आर्थिक स्वातंत्र्य, आर्थिक साक्षरता, महागाई तसेच शाखा व्यवस्थापक विकास जाधव यांनी योग्य नियोजनातून संपत्ती कशी निर्माण करावी याबाबत मार्गदर्शन केले. तर आर्थिक सल्लागार रणजित जाधव यांनी गुंतवणूक व विमा यांचे महत्त्व सांगितले. प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांनी अध्यक्षीय मार्गदर्शनात योग्य आर्थिक नियोजन केल्यास भविष्यात आर्थिक स्थैर्य प्राप्त होण्यास मदत होते असे नमूद केले. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रा.डॉ.राम पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ.विद्या जाधव तर सूत्रसंचालन प्रा.समाधान माने, प्रा.सचिन सुरवसे यांनी केले. आभार प्रा.प्राप्ती लामगुंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाणिज्य विभागातील प्रा.निकिता लामगुंडे, प्रा.महाडिक, कार्यालयीन अधीक्षक विलास माने व अमर केदार यांचे सहकार्य लाभले.

# गुढीपाडव्यापासून तामलवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह

## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे होणार कलशारोहण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाच्या वर्षीही गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ होणार असून, अखंड हरिनाम सप्ताहाचे हे ५२ वर्ष आहे. यंदा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे शिखर बांधकाम पुर्ण झाले असल्याने कळसारोहण कार्यक्रमही होणार असल्याचे अध्यक्ष सुनील पाटील यांनी सांगितले.

संतश्रेष्ठ जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांचे वंशज वै. सोपानकाका महाराज देहुकर, वै. ज्ञानेश्वर (माऊली) महाराज देहुकर यांच्या कृपाशीर्वादाने व श्री गुरु बापुसाहेब महाराज देहुकर यांच्या मार्गदर्शनाने , श्रीगुरु कान्होबा महाराज देहुकर यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.१९ मार्च रोजी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ होणार आहे. अखंड हरिनाम सप्ताहाबरोबरच यंदाच्या वर्षी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर कलशारोहण कार्यक्रमही करण्यात येणार आहे. यानिमित्त रोज पहाटे काकडाआरती, सकाळी जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण, दुपारी गाथा भजन, सायंकाळी गाथा पारायण, हरिपाठ, प्रवचन व रात्री किर्तन सेवा असे दैनंदिन कार्यक्रम पार पडतील.

**हभप समाधान महाराजांच्या हस्ते होणार कळसारोहण**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर कळसारोहण मोठ्या भक्तिभावाने पार पडणार असून, दि.२५ मार्च, वार बुधवार रोजी सकाळी ७.०० वाजता हभप समाधान महाराज कदम (श्री दत्त आश्रम सांगवी-पुणे) यांच्या हस्ते कलशारोहण करण्यात येणार आहे.




**सप्ताहामध्ये यांची होणार कीर्तन-प्रवचन सेवा**

अखंड हरिनाम सप्ताहामध्ये दररोज रात्री ८ ते १० या वेळेत श्रीगुरु डॉ. महेश महाराज देहुकर, हभप आकाश महाराज देशमुख लातुर, हभप दत्ता महाराज सोमवंशी आंबेजोगाई, हभप जगन्नाथ महाराज देशमुख पंढरपूर, हभप शिवाजी महाराज बोकारे आळंदी देवाची, श्रीगुरु कान्होबा महाराज देहुकर यांची संकीर्तन सेवा होणार असून, श्रीगुरु बापुसाहेब महाराज देहुकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. तर हभप विनायक पाटील, तामलवाडी, हभप अंगद चुंगे पिंपळा बु., हभप शाम जोशी कासेगाव, हभप दत्तात्रय क्षीरसागर उळे यांची प्रवचन सेवा होणार आहे.

'या' दिवशी होणार कलश दिंडी नगरप्रदक्षिणा श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर शिखर जिर्णोद्धाराचे काम पुर्ण झाले असुन यंदाच्या वर्षी कलशारोहण करण्यात येणार असून, दि.२४ मार्च, वार मंगळवार रोजी संतश्रेष्ठ जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांचे वंशज श्रीगुरु बापुसाहेब महाराज देहुकर यांच्या मार्गदर्शनाने व श्रीगुरु कान्होबा महाराज देहुकर यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच गावच्या लेकींच्या उपस्थितीत भव्य अशी कलश दिंडी काढत नगरप्रदक्षिणा काढण्यात येणार आहे.



## महत्वाचे...



### ह.दे.चे सुरेश मंकणी यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ६ मार्च-** शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे संस्थेचे नियामक मंडळाचे नवनिर्वाचित सदस्य तथा हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे नूतन शाळा समिती अध्यक्ष सुरेश मंकणी यांचा सत्कार माजी शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, प्राचार्य रविंद्र पानसरे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, पर्यवेक्षक भानुदास बनसोडे, आप्पासाहेब राऊत, औदुंबर सर्वगोड, महिंद्रा रणधीर, गणेश नेवरे, मारुती शहाणे, प्रा.प्रमोद चुंगे, प्रा.अरविंद नडखांबे, प्रा.अक्षय गवळी उपस्थित होते.



### पोस्टर स्पर्धेत साक्षी चिल्ला, स्नेहा बाकळे यांचे यश

**सोलापूर, दि.६ मार्च-** व्हीव्हीपी इंजिनिअरिंग कॉलेजच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील पोस्टर स्पर्धेत येथील मंगळवेढेकर महाविद्यालयातील साक्षी चिल्ला (BC-III), स्नेहा बाकळे (BC-II) या विद्यार्थिनींनी यश संपादन केले. देशभरातील २५० स्पर्धक यात भाग घेतले होते. प्रा.सुहास कुलकर्णी यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष डॉ.देशमुख, प्राचार्य डॉ.गायकवाड यांच्या हस्ते चिल्ला व बाकळे यांचा सन्मान करण्यात आला.

# सोलापूर जिल्ह्यातील २४ हजार शेतकऱ्यांनी घेतले होते कर्ज

## शेतकऱ्यांचे २ लाख रुपयापर्यंतचे कर्ज होणार माफ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-** ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील २४ हजार शेतकऱ्यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेतले होते. जे शेतकरी नियमित परतफेड करतात अशा शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्यात येईल. २ लाख रुपयांपर्यंत कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची माहिती संकलन कार्य सुरु आहे, अशी माहिती सोलापूर जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेचे प्रशासक कुंदन भोळे यांनी दिली.

२ लाखांहून कमी अधिक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांची तालुकानिहाय आकडेवारी याप्रमाणे; करमाळा ४ हजार १४८, माढा ३ हजार १९१, मंगळवेढा २ हजार ७७३, अक्कलकोट २ हजार २५१, पंढरपूर २ हजार २१०, दक्षिण सोलापूर १ हजार ८२२, मोहोळ १ हजार ८२०, माळशिरस १ हजार ८९३, बार्शी १ हजार ८०१, सांगोला ९९५, उत्तर सोलापूर ६२३ शेतकरी.

**शेतकऱ्यांसाठी इतर घोषणा**
आगामी दोन वर्षांमध्ये महाराष्ट्रात नैसर्गिक शेती अभियानाची सुरुवात करण्यात येणार आहे. महिला गोपालक, शेळी पालकांसाठी विशेष योजना राबविण्यात येणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



# हमीभाव केंद्राचा उडतोय बोजवारा; आतापर्यंत १७ शेतकऱ्यांनी केली नोंदणी

- मकासाठी फक्त १० हजार क्विंटल वाढीव कोटा
- हमीभावापेक्षा बाजारभाव जास्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मार्च -** हमीभावाने तूर खरेदी सुरु होण्यास विलंब झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी बाजारातच माल विक्री केला. त्यानंतर बाजारातील तुरीचे दर हमीभावापेक्षा जास्त झाल्याने शेतकऱ्यांनी सरकारी खरेदी केंद्रांकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे हमीभावा बोजवारा उडत असल्याचे दिसून येते. जिल्ह्यात आत्तापर्यंत केवळ १७ तूर उत्पादक शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

तुरीचा हमीभाव प्रतिक्विंटल ८ हजार रुपये आहे. सध्या सोलापूर बाजारात पांढ्या तुरीला ७५०० ते ८०८५ रुपये, तर लाल तुरीला ५२५३ ते ६६०३ रुपये प्रतिक्विंटल असा दर मिळत आहे. जिल्ह्यात मक्याचे वाढलेले क्षेत्र लक्षात घेऊन प्रशासनाने ८० हजार क्विंटल खरेदी उद्दिष्ट वाढवून देण्याची मागणी राज्य सरकारकडे केली होती. मात्र, शासनाने जिल्ह्यासाठी केवळ १० हजार क्विंटल वाढीव खरेदी कोटा मंजूर केला आहे.



सोलापूर जिल्ह्यासाठी आधी २५ हजार क्विंटल मका खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले होते आणि ते पूर्ण झाले आहे. त्यानंतर मिळालेल्या वाढीव उद्दिष्टानुसार जिल्ह्यातील सात खरेदी केंद्रांवर मका खरेदी व नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. गुरुवार, दि.५ मार्च २०२६ पर्यंत ३ हजार २५८.८२ क्विंटल मका वाढीव उद्दिष्टातून खरेदी करण्यात आला आहे.

जिल्ह्याचे सरासरी पेरणी क्षेत्र ४७ हजार १२ हेक्टर असून यंदा मक्याच्या क्षेत्रात दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. कृषी विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार जिल्ह्यात सुमारे ७ लाख ७१ हजार क्विंटल मक्याचे उत्पादन अपेक्षित आहे. केंद्र सरकारने मक्यासाठी प्रतिक्विंटल २ हजार ४०० रुपये हमीभाव जाहीर केला आहे. मात्र सोलापूर बाजार समितीत मक्याला प्रतिक्विंटल १ हजार ५०० ते १ हजार ८०० रुपये दर मिळत आहे.

राज्य सरकारने दिलेले २५ हजार क्विंटल खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण झाल्यानंतरही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर मका शिल्लक असल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून करण्यात आली. त्यामुळे प्रशासनाने ८० हजार क्विंटलने उद्दिष्ट वाढवण्याची मागणी केली होती. मात्र शासनाकडून १० हजार क्विंटल वाढीव उद्दिष्ट देण्यात आले. जिल्ह्यातील सात केंद्रांवर मका खरेदी सुरु आहे, असे जिल्हा पणन अधिकारी मनोज वाजपेयी यांनी सांगितले.



# दक्षिणमध्ये आधुनिक कृषी भवन, ॲग्री मॉल उभारण्याचा प्रस्ताव

- कृषी विकासासंदर्भात मंत्रालयात बैठक
- आ. सुभाष देशमुख यांनी घेतला पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-** दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात आधुनिक कृषी भवन व कृषी बाजारपेठ (ॲग्री मॉल) उभारण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव मंत्रालयात झालेल्या बैठकीत मांडण्यात आला. महाराष्ट्राचे कृषीमंत्री दत्तात्रेय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली असून, आमदार सुभाष देशमुख यांच्या पुढाकाराने ती आयोजित करण्यात आली.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कृषी विकास, सिंचन सुविधा आणि शेतकरी हिताच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली. कृषी पायाभूत सुविधा मजबूत करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. दक्षिण सोलापूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या ठिकाणी सुसज्ज व आधुनिक कृषी भवन उभारण्याचा प्रस्ताव बैठकीत मांडण्यात आला. दक्षिण सोलापूर तालुक्यात सिंचन क्षमता वाढविण्यासाठी सामुदायिक व वैयक्तिक शेततळ्यांची संख्या वाढविण्याबाबत चर्चा करण्यात आली. सीना व भीमा नदीच्या पाण्याचा योग्य वापर करून जलसंधारण व सूक्ष्म सिंचन योजना प्रभावीपणे राबविण्यावर भर देण्यात आला. तालुक्यातील काही भागात चुकीच्या पाणी व्यवस्थापनामुळे जमिनी क्षारयुक्त होत असल्याने त्या जमिनींच्या पुनर्वसनासाठी विशेष योजना राबविण्याची गरज व्यक्त करण्यात आली. यासाठी मृदा आरोग्य सुधारणा कार्यक्रम व जनजागृती मोहिमा राबविण्याबाबतही चर्चा झाली.

दक्षिण सोलापूर परिसरात ऊस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या लक्षात घेता येथे स्वतंत्र ऊस संशोधन केंद्र स्थापन करण्याचा प्रस्तावही बैठकीत मांडण्यात आला. या माध्यमातून ऊस वाण संशोधन, कीड व रोग नियंत्रण तसेच उत्पादनवाढीसाठी तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. तसेच एक गाव - एक पीक योजना प्रभावीपणे राबविणे आणि बोगस बियाणे, खते व कीटकनाशक विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

**बैठकीतील प्रमुख मुद्दे**
✼ आधुनिक कृषी भवन व ॲग्री मॉल उभारण्याचा प्रस्ताव ✼ सिंचन क्षमता वाढविण्यासाठी शेततळ्यांवर भर ✼ क्षारयुक्त जमिनींच्या पुनर्वसनासाठी विशेष उपाययोजना ✼ दक्षिण सोलापूरमध्ये ऊस संशोधन केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव ✼ एक गाव-एक पीक योजनेची प्रभावी अंमलबजावणी ✼बोगस कृषी निविष्ठांवर कठोर कारवाई.

# उपशिक्षणाधिकारी सुरेश वाघमारे यांच्याकडे माध्यमिक शिक्षण विभागाची धुरा

## शिक्षणाधिकारी व दोन उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या मर्यादित उपस्थितीत एकहाती कारभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ मार्च-** सोलापूर जिल्हा परिषद अंतर्गत माध्यमिक शिक्षण विभागाचा कारभार सध्या उपशिक्षणाधिकारी सुरेश वाघमारे यांच्या कार्यतत्परतेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असल्याचे चित्र दिसून येत आहे. शिक्षणाधिकारी आणि इतर दोन उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत किंवा मर्यादित उपस्थितीत दैनंदिन कामकाजाची जबाबदारी वाघमारे यांच्यावर पडत आहे.

माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप हे आठवड्यातून केवळ एक ते दोन दिवस कार्यालयात उपस्थित राहतात. सुनावण्या, न्यायालयीन प्रकरणे, तसेच शाळा तपासणीच्या दौऱ्यांमुळे त्यांचा बराच वेळ कार्यालयाबाहेर जातो. परिणामी विभागातील प्रशासकीय काम काजावर ताण निर्माण होतो.

उपशिक्षणाधिकारी प्रकाश नांगरे यांच्याकडे जिल्ह्यातील विविध शाळांना भेटी देण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे यांच्याकडे त्यांच्या पदासोबतच प्राथमिक शिक्षण विभागातील वेतन अधीक्षक कार्यालयाची अतिरिक्त जबाबदारी आहे. त्यामुळे माध्यमिक विभागातील कामकाजासाठी आवश्यक असलेली पूर्णवेळ उपस्थिती मिळत नाही.

पूर्वी किरकोळ कामांसाठीही शिक्षकांना तासनतास थांबावे लागत होते. मात्र वाघमारे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर काही प्रमाणात सुधारणा झाल्याचे शिक्षकांकडून सांगितले जात आहे. दरम्यान, माध्यमिक शिक्षण विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त होत आहे.



# दुबई येथे कॉन्फरन्ससाठी गेलेली १४ जणांची टीम मायदेशी परतली

## आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नास यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-** दुबई येथे कॉन्फरन्सकरिता गेलेली सोलापूर जिल्ह्यातील १४ जणांची टीम मुंबईत सुखरुप पोहोचली. दुबई येथे कॉन्फरन्ससाठी गेलेले सोलापुरातील काही लोक अडकल्याची माहिती आ.सुभाष देशमुख यांना मिळाल्यानंतर त्यांनी मंत्रालय कक्षामार्फत अडकलेल्या सोलापूरकरांना आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नाला यश आले आहे.

आपत्ती विभागातील जिल्हा नियंत्रण कक्षाद्वारे आलेल्या नागरिकांची आणि विदेशात अडकलेल्या नागरिकांची माहिती घेण्यात येत आहे. अडकलेल्या नागरिकांना आणण्यासाठी अजूनही प्रयत्न सुरु आहेत, असे मंत्रालय स्तरावरील अधिकारी, सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नाने आलेल्या नागरिकांमध्ये गौरव बेंद्रे, दिपक मस्के, पवन येद्रु, हणमंत जाधव, प्रसन्न शहा, महादेव चांगले, मनिषा अभंगराव, शिवराज काळे, प्रविण कुलकर्णी, शफीक मुल्ला, शंकर तहसीलदार, सज्जन निचळ यांच्यासह इतर काही जणांचा समावेश आहे.

# आदिवासी बांधवांचा विश्वास जिंकून परिवर्तन घडविले : डॉ. आमटे





**सोलापूर : पु. अ. होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सातव्या नामविस्तार दिनानिमित्त शुक्रवारी विद्यापीठ कॅम्पसमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पालखीतून काढलेल्या ग्रंथ दिंडीचे छायाचित्र. ग्रंथ प्रदर्शनाचेही यानिमित्त आयोजन करण्यात आले होते. दुसऱ्या छायाचित्रात अहिल्यारत्न पुरस्कार स्वीकारताना डॉ. मंदाकिनी आमटे**

- विद्यापीठाचा 'अहिल्यारत्न' पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च -** भामरागडच्या दुर्गम जंगलात काम सुरु केले तेव्हा रस्ते, वीज, पाणी अशी कोणतीही सुविधा नव्हती. आदिवासी बांधवांना आम ची भाषा समजत नव्हती. आरोग्यसेवेची कोणतीही साधनेही नव्हती. मात्र सातत्याने सेवा दिल्यामुळे त्यांचा विश्वास जिंकता आला. त्यांच्या जीवनात परिवर्तन घडू लागले, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेविका डॉ.मंदाकिनी आमटे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सातव्या नामविस्तार दिन, अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून ज्येष्ठ सम ाजसेविका डॉ. मंदाकिनी आमटे यांना 'अहिल्यारत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, रोप आणि ५१ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर हे होते. व्यासपीठावर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे कुलगुरु डॉ. संजीव सोनवणे, पद्मश्री डॉ.प्रकाश आमटे, प्र-कुलगुरु डॉ.लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.मंदाकिनी आमटे पुढे म्हणाल्या की, १९७२ साली विवाहानंतर पती डॉ.प्रकाश आमटे यांच्यासह गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील हेमलकसा येथे आदिवासी बांधवांसाठी कार्य सुरु केले. अंधश्रद्धेमुळे अनेक जण मांत्रिकांकडे जात असत; परंतु सातत्याने उपचार करुन विविध आजार बरे झाल्यानंतर लोकांचा विश्वास बसू लागला. आरोग्यसह शेती, शिक्षण क्षेत्रातही काम सुरु करण्यात आले.

पद्मश्री डॉ.प्रकाश आमटे म्हणाले, वडील बाबा आमटे यांनी आनंदवनातून सम ाजसेवेची प्रेरणा दिली. त्या प्रेरणेनेच आम्ही हेमलकसा येथे आदिवासी बांधवांसाठी कार्य सुरु केले. सेवाभावाने सातत्याने काम केल्यास समाजाचा विश्वास संपादन करता येतो. कोणतीही काम लहान समजू नये; मनापासून आणि समर्पित भावनेने केलेल्या कार्यातूनच समाजात परिवर्तन घडते. यावेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजीव सोनवणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी रांगोळी, निबंध स्पर्धा, स्पर्धा, लोकवादन, ग्रंथदिंडी व ग्रंथप्रदर्शन, लोककला सादरीकरण तसेच वृक्षारोपण आदी कार्यक्रम पार पडले.

डॉ.प्रभाकर कोळेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ.अनिल घनवट यांनी मान्यवरांचा परिचय करुन दिला. डॉ.शिवाजी शिंदे यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ.तेजस्विनी कांबळे यांनी सूत्रसंचालन तर डॉ. केदारनाथ काळवणे यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रिसिजनच्या सुहासिनी शहा, राजाभाऊ सरवदे, पद्मजादेवी मोहिते-पाटील, एम.डी. कमळे, प्रा.सचिन गायकवाड, ॲड.मल्लिनाथ शहाबादे, यतिराज होनमाने, प्रा.जैनुद्दीन मुल्ला आदी उपस्थित होते.




# एमआयडीसीसाठी अंदाजपत्रकात चार कोटींची तरतूद : महापौर

## स्वच्छ व सुंदर एमआयडीसी अभियानाचा प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ मार्च-** महानगरपालिकेच्या म ध्यमातून दरवर्षी एमआयडीसी परिसरासाठी ४ कोटी रुपयांचे बजेट ठेवण्यात येईल, अशी ग्वाही महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली. अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील कारखानदार व उद्योजकांच्यावतीने आयोजित सत्काराप्रसंगी उत्तर देताना ते बोलत होते. दरम्यान, स्वच्छ व सुंदर एमआयडीसी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वर देवकर, सभागृहनेते नरेंद्र काळे, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते, एम आयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष तिलोकचंद कासवा, यंत्रमागधारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, चेंबर ऑफ कॉम र्सचे अध्यक्ष राजू राठी, ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, नगरसेवकद्वय अजय पोन्नम, श्रीनिवास दायमा, अक्षय अंजिखाने यांच्यासह अंबादास बिंगी, संजय साळुंखे, नीलेश पोफलिया, प्रमोद दरगड, नितीन करवा, संगीता दायमा, कृष्णा दायमा उपस्थित होते.

एमआयडीसी परिसराच्या विकासासाठी शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांनी पायाभूत सुविधांसाठी ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा, असेही महापौर कोंड्याल यांनी सांगितले. याप्रसंगी एमआयडीसी परिसरातील कारखानदार व उद्योजकांसोबत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७९१ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● मुख्य संपादक : प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE Printed at SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.Publised at TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |RNI No. MAHMAR/2023/86468
● CHIEF GROUP EDITOR : DILIP YASHWANT PETHE ● CHIEF EDITOR : PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## होतकरू विद्यार्थ्यांसाठी 'विद्यार्थी दत्तक' योजनेचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**
मराठी भाषा गौरव दिनाच्या औचित्याने धाराशिव येथे ज्ञानकिरण बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने गरीब, होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी दत्तक या महत्वाकांक्षी योजनेचा शुभारंभ उत्साहात करण्यात आला.

शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या संस्थेच्या या उपक्रमाचा शुभारंभ जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय सभागृहात पार पडलेल्या कार्यक्रमात धाराशिवचे निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) तथा सदस्य सचिव, जिल्हा मराठी भाषा समिती स्वाती शेंडे, उपजिल्हाधिकारी श्रीकांत पाटील, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनूरे, शिक्षणाधिकारी (प्रा.) रविंद्र खंदारे, यांच्या हस्ते करण्यात आला.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### प्रगतिशील शेतकरी पाटील यांचा सत्कार

**लोहारा, दि.६ मार्च -**
तुळजापूर येथे आयोजित तुळजाभवानी कृषी महोत्सव २०२४-२५ मध्ये केळी पिकात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल लोहारा तालुक्यातील खेड येथील प्रगतिशील शेतकरी सिद्राम मारुती पाटील यांचा सन्मान करण्यात आला. जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पूजार यांच्या हस्ते सिद्राम पाटील यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी कृषी अधिकारी मोरे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. या गौरवाबद्दल लोहारा तालुक्यातील मित्रपरिवार व शेतकरी बांधवांच्या वतीने सिद्राम पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संतोष फरीदाबादकर, प्रमोद जाधव, परमेश्वर लोहार, लक्ष्मण शेवाळे, उमाकांत सगट, महेबूब फकीर, सुधाकर पोतदार, हनमंत पाटील, काकासाहेब पाटील आदींनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.




### विद्यार्थ्यांचा पालक मेळावा उत्साहात

**कळंब, दि.६ मार्च -**
शहरातील सावित्रीबाई फुले विद्यालयात इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. दहावीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी तास सुरू करण्याबाबत पालकांशी चर्चा करण्यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य काकासाहेब मुंडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. पांडुरंग भवर, अनिरुद्ध पवार, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. मीनाक्षी शिंदे भवर, तसेच अविनाश घोडके उपस्थित होते. पालक प्रतिनिधी म्हणून कोकाटे व कवडे उपस्थित होते. यावेळी एनएमएस परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन जीवनसिंह ठाकूर यांनी तर आभार शितल थोरात यांनी मानले.

### डॉ. कदम यांची उपप्राचार्यपदी नियुक्ती

**नळदुर्ग, दि.६ मार्च -**
नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अशोक कदम यांची महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी नियुक्ती



करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. या नियुक्तीबद्दल बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, सचिव उल्हास बोरगांवकर, कार्याध्यक्ष रामचंद्र आलुरे, सदस्य बाबुराव चव्हाण यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी यांनी अभिनंदन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, कार्यालय अधीक्षक धनंजय पाटील, नॅक को-ऑर्डिनेटर डॉ. शिवाजी घोडके, गणित विभाग प्रमुख डॉ. एन. बी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. मोतीराम पवार तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.




### नागराळ (लो) येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**लोहारा, दि.६ मार्च -**
लोहारा तालुक्यातील नागराळ (लो) येथे दि.२ मार्च रोजी ग्रामपंचायत कार्यालयात कोहिजण फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने शेतकरी मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे प्रकल्प समन्वयक मनोज देवकते यांच्या मार्गदर्शनाखाली अनुकूलन तज्ञ व सामाजिक कार्यकर्ते श्रीकृष्ण गंगणे यांनी संस्थेची माहिती देत बदलत्या हवामान परिस्थितीनुसार शेतकऱ्यांनी करावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी वातावरण बदलाचे दुष्परिणाम, सेंद्रिय शेतीचे महत्त्व तसेच वृक्षलागवडीची गरज या विषयांवर विशेष चर्चा करण्यात आली. तसेच ट्रस्टमार्फत राबविण्यात येणाऱ्या लोककल्याणकारी योजनांची माहिती पुस्तिका उपस्थित शेतकऱ्यांना वितरित करण्यात आली. या उपक्रमात क्लायमेट चॅम्पियन किरण चिंचोले, सदस्य रोहित पाटील यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास गटातील सदस्य बळीराम गोरे, रत्ना गोरे, जयश्री गोरे, अर्चना भोकरे, सीना चिंचोले, शामल घाडगे, सत्यनारायण गोरे, अर्जुन गोरे, आदित्य काकडे, अतुल गोरे, नीलकंठ गोरे, उमाकांत गोरे, संजय गोरे, तानाजी गोरे, गुंडू जाधव, महादेव गोरे, प्रवीण माटे आदी ग्रामस्थ शेतकरी उपस्थित होते.

# धाराशिव जिल्ह्यात पंचायत समित्यांवर महायुतीचे वर्चस्व

**आठ पंचायत समित्यांमध्ये सभापती-उपसभापती निवड... काही ठिकाणी बिनविरोध तर काही ठिकाणी चुरशीच्या लढती...**




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**
जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील पंचायत समित्यांच्या सभापती व उपसभापती पदांच्या निवडणुका पार पडल्या असून अनेक ठिकाणी महायुतीने आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. धाराशिव, तुळजापूर, उमरगा, लोहारा, कळंब, भूम, परंडा आणि वाशी या पंचायत समित्यांमध्ये नव्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. काही ठिकाणी चुरशीच्या लढती झाल्या तर काही ठिकाणी उमेदवार बिनविरोध निवडून आले.

धाराशिव पंचायत समितीच्या सभापतीपदी वानेवाडी येथील गोकर्णा गोपाळ कदम यांची निवड झाली असून उपसभापतीपदी वडगाव येथील प्रमोद पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

तुळजापूर पंचायत समितीच्या सभापतीपदी भाजपाचे विक्रमसिंह देशमुख यांची निवड झाली असून उपसभापतीपदी रोहिणी मेलगीरी यांची निवड झाली आहे. कळंब पंचायत समितीच्या सभापतीपदी शिंदे गटाच्या शिवसेनेचे राजश्री धनंजय वरपे यांची निवड झाली असून उपसभापतीपदी भाजपाच्या प्रणिता प्रणव चव्हाण यांची निवड झाली आहे.

उमरगा पंचायत समितीच्या सभापतीपदी शिवसेना युवा नेत्या कु. आकांक्षा ज्ञानराज चौगुले यांची बिनविरोध निवड झाली. उपसभापतीपदी रेखा इंगळे यांनी तीन मतांनी विजय मिळवला.

लोहारा पंचायत समितीच्या सभापतीपदी शिवसेनेच्या पल्लवी दादासाहेब जानकर यांची निवड झाली असून उपसभापतीपदी शिवसेनेचे अमोल पांडुरंग पाटील यांची निवड झाली आहे.

परंडा पंचायत समितीच्या सभापतीपदी अर्चना जाधव यांची तर उपसभापतीपदी परसु गवारे यांची निवड झाली. भूम पंचायत समितीच्या सभापतीपदी पूजा ढगे यांची निवड झाली असून उपसभापतीपदी वंचित बहुजन आघाडीच्या प्रियंका रणबागुल विजयी झाल्या. वाशी पंचायत समितीच्या सभापतीपदी प्रणिता गायकवाड यांची निवड झाली असून उपसभापतीपदी नितीन रणदिवे यांची निवड झाली आहे.

भूम, परंडा आणि वाशी या पंचायत समित्यांमधील सभापती-उपसभापती निवडीत आमदार डॉ. तानाजी सावंत यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने आपले वर्चस्व कायम राखले आहे. या तिन्ही पंचायत समित्यांवर शिवसेनेचा भगवा फडकला असून सभापतीपदी शिवसेनेचे उमेदवार निवडून आले आहेत.

जिल्ह्यातील बहुमत असलेल्या धाराशिव आणि तुळजापूर पंचायत समित्यांवर भाजपाचे सभापती विराजमान झाले आहेत. तर उमरगा आणि लोहारा पंचायत समित्यांमध्ये शिवसेना महायुतीचे सभापती विजयी झाले आहेत. पंचायत समित्यांमधील या निवडणुकांमुळे जिल्ह्यातील राजकीय समीकरणांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

| जिल्ह्यातील पंचायत समिती सभापती | | जिल्ह्यातील पंचायत समिती उपसभापती | |
|---|---|---|---|
| धाराशिव (भाजपा) | कळंब (शिवसेना) | धाराशिव (भाजपा) | कळंब (भाजपा) |
| सौ. गोकर्णा कदम | सौ. राजर्षी वरपे | प्रमोद पाटील | सौ. प्रणिता चव्हाण |
| तुळजापूर (भाजपा) | वाशी (शिवसेना) | तुळजापूर (भाजपा) | वाशी (शिवसेना) |
| विक्रमसिंह देशमुख | सौ. प्रणिता गायकवाड | सौ. रोहिणी मेलगिरी | नितीन रणदिवे |
| उमरगा (शिवसेना) | भूम (शिवसेना) | उमरगा (भाजपा) | भूम (वंचित बहुजन आघाडी) |
| ॲड. आकांक्षा चौगुले | सौ. पुजा ढगे | सौ. रेखा इंगळे | सौ. प्रियंका रणबागुल |
| लोहारा (शिवसेना) | परंडा (शिवसेना) | लोहारा (शिवसेना) | परंडा (शिवसेना) |
| सौ. पल्लवी जानकर | सौ. अर्चना जाधव | अमोल पाटील | परशु गवारे |

## उमरगा पं.स. सभापतीपदी ॲड. आकांक्षा चौगुले बिनविरोध



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ मार्च -**
उमरगा पंचायत समितीच्या सभापतीपदी शिवसेनेचे उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या कन्या आणि केसरजवळगा गणाच्या पंचायत समिती सदस्या ॲड. आकांक्षा ज्ञानराज चौगुले यांची शुक्रवारी (दि.६) बिनविरोध निवड करण्यात आली. तर उपसभापतीपदी मुळज गणातून विजयी झालेल्या भाजपच्या रेखा विक्रम इंगळे यांनी बहुमताने विजय मिळवला.

सभापती पदासाठी केसरजवळगा गणाच्या सदस्य ॲड. आकांक्षा चौगुले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. सभापती पदासाठी केवळ एकच अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. दरम्यान, उपसभापती पदासाठी तलमोड गणाचे सदस्य दगडू कालिदास मोरे आणि मुळज गणातील भाजपच्या रेखा विक्रम इंगळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. यामध्ये दगडू मोरे यांना ७ मते तर रेखा इंगळे यांना १० मते मिळाली. उबाठा गटाचे जकेकुर गणाचे सदस्य हरीदास जाधव हे मतदानावेळी गैरहजर होते. त्यामुळे बहुमताने रेखा इंगळे यांची उपसभापतीपदी निवड झाल्याचे पीठासीन अधिकारी दत्तू शेवाळे यांनी जाहीर केले. निवड प्रक्रियेनंतर महायुतीच्या वतीने नवनिर्वाचित सभापती व उपसभापती यांचा सत्कार करण्यात आला.

### उपसभापतीपदी रेखा इंगळे

यावेळी शिवसेनेचे उपनेते तथा मा.आ. ज्ञानराज चौगुले, शिवसेनेचे जितेंद्र शिंदे, नगराध्यक्ष किरण गायकवाड, भाजपचे अभयराजे चालुक्य, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, तालुकाध्यक्ष बळीराम सुरवसे, भाजपचे हंसराज गायकवाड, धर्मराज जाधव, सचिन जाधव, धनंजय मसांडे, पंढरीनाथ कोणे, शरद पवार, शफी चौधरी आदी उपस्थित होते.

### ग्रामीण भागातील विकासाला बळ देणार : ॲड. आकांक्षा चौगुले

मला पंचायत समितीत काम करण्याची संधी महायुतीच्या माध्यमातून मिळाली आहे. शासनाच्या विविध योजना व वैयक्तिक लाभाच्या योजना सामान्य जनतेपर्यंत पोहोचवणे तसेच ग्रामीण भागाच्या विकासाला बळ देणे हे माझे प्रमुख ध्येय राहील. शिवसेना नेते व सहकारी सदस्यांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी नक्कीच सार्थ ठरवेन, असे नवनिर्वाचित सभापती ॲड. आकांक्षा चौगुले यांनी सांगितले.

## धाराशिव सभापतीपदी गोकर्णा कदम, उपसभापतीपदी प्रमोद पाटील



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**
पंचायत समिती निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या घवघवीत यशानंतर आज सभापती व उपसभापती पदांच्या निवडी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या.

यामध्ये सभापतीपदी सौ. गोकर्णा गोपाळ कदम (वानेवाडी) तर उपसभापतीपदी प्रमोद पाटील (वडगाव सि.) यांची निवड झाल्याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी पंचायत समिती निवडणुकीत विजयी झालेल्या भाजपा महायुतीच्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांचा देखील सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

याप्रसंगी सुरेश देशमुख, दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, सुनील चव्हाण, अनिल काळे, नेताजी पाटील यांच्यासह तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी, पंचायत समिती सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कळंब पंचायत समितीत महायुतीची बाजी; चिठ्ठीद्वारे सभापती-उपसभापती निवड



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.६ मार्च -**
पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदाच्या निवडणुकीत महायुतीने विजय मिळवत सभापती पदी शिवसेनेच्या राजश्री धनंजय वरपे तर उपसभापती पदी भाजपाच्या प्रणिता प्रणव चव्हाण यांची निवड झाली. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या निवडणुकीत अखेर चिठ्ठीद्वारे निर्णय लागल्याने या निकालाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले होते.




सभापती पदासाठी शिवसेनेच्या राजश्री धनंजय वरपे आणि उबाठा गटाकडून सीमा टेकाळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. तर उपसभापती पदासाठी भाजपाच्या प्रणिता प्रणव चव्हाण आणि उबाठा गटाकडून मनोज घोगरे यांचा उमेदवारी अर्ज होता. पंचायत समितीत दोन्ही गटांकडे प्रत्येकी आठ सदस्य असल्याने मतदान घेण्यात आले. मतदानानंतरही दोन्ही बाजूंना समान मते मिळाल्याने नियमानुसार लहान मुलाच्या हस्ते चिठ्ठी काढण्यात आली. या चिठ्ठीतून राजश्री धनंजय वरपे यांची सभापती आणि प्रणिता प्रणव चव्हाण यांची उपसभापती म्हणून निवड निश्चित झाली.

या विजयाच्या निकालानंतर शिवसेना भाजपा महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष साजरा केला. यावेळी शिवसेना धाराशिव जिल्हाप्रमुख अजित पिंगळे यांनी कार्यकर्त्यांचे अभिनंदन करत हा विजय महायुतीच्या एकजुटीचा आणि जनतेच्या विश्वासाचा असल्याचे सांगितले.

## तुळजापूर पं.स. सभापतीपदी विक्रमसिंह देशमुख; उपसभापतीपदी रोहिणी मेलगीरी

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडून सत्कार...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ मार्च -**
तुळजापूर पंचायत समितीच्या सभापतीपदी भाजपाचे विक्रमसिंह देशमुख (काटी) यांची तर उपसभापतीपदी रोहिणी विवेकानंद मेलगीरी (सिंदगाव) यांची निवड झाल्यानंतर आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले की, आपल्या नेतृत्वगुणांमुळे, कार्यतत्परतेमुळे आणि जनतेप्रती असलेल्या दृढ बांधिलकीमुळे तुळजापूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा ठाम विश्वास आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि विकासकामांना गती देण्यासाठी सभापती व उपसभापती प्रभावी व लोकाभिमुख कामगिरी करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच आपल्या नेतृत्वामुळे तुळजापूर तालुक्याची प्रगती अधिक वेगाने घडो, हीच सदिच्छा असल्याचेही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

याप्रसंगी भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, सुनील चव्हाण, नितीन काळे, विनोद गंगणे यांच्यासह पंचायत समिती सदस्य, तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी; चौघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**
येरमाळा पोलीस ठाणे हद्दीत सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरीप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत मनिषा नितीन बांगर (वय ३०, रा. बांगरवाडी, ता. कळंब, जि. धाराशिव) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी नितीन गोपीनाथ बांगर, गोपीनाथ मारुती बांगर, गंगाबाई बांगर व पिंट्या बांगर यांनी दि.१ मार्च रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या दरम्यान फिर्यादी यांच्या राहत्या घरातून सोन्याचे दागिने व २० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ८० हजार ९६६ रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचा आरोप आहे.



याप्रकरणी मनिषा बांगर यांनी दि.५ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## संक्षिप्त...

### तालुका कृषी दुकानदार संघटनेच्या अध्यक्षपदी एरंडे; उपाध्यक्षपदी हवा व धुमाळे




शिरूर अनंतपाळ : तालुक्यातील कृषी दुकानदार संघटनेची नवीन कार्यकारिणी नुकतीच सर्वानुमते जाहीर करण्यात आली. यामध्ये शिवशंकर फर्टिलायझर्सचे बसवराज एरंडे यांची अध्यक्षपदी, विशाल हवा व प्रवीण धुमाळे यांची उपाध्यक्षपदी, तर वीरभद्र दरेकर यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे. १ मार्च रोजी शहरात झालेल्या संघटनेच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया पार पडली. कृषी क्षेत्रासमोरील वाढती आव्हाने, बदलते धोरणात्मक निर्णय आणि शेतकरी हिताचे प्रश्न लक्षात घेता संघटनेला सक्षम नेतृत्वाची आवश्यकता असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारताना बसवराज एरंडे यांनी सर्व कृषी दुकानदारांना सोबत घेऊन संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. सचिवपदी निवड झाल्यानंतर वीरभद्र दरेकर यांनी संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यावर भर देण्याचे सांगितले. तसेच उपाध्यक्ष विशाल हवा व प्रवीण धुमाळे यांनी शेतकरी हिताच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्याचे आश्र्वासन दिले. यावेळी सोमनाथ तांबोळकर, अशोक देवंगरे, सतिश हंद्राळे, गोविंद शिंदे, सुनिल कोरे, बालाजी बिराजदार, दत्ता हिंगमीरे, किरण निला, परमेश्र्वर ससाने, रामदास झुकले, अलोक महाजन, बालाजी चौसष्टे, शिवराज भुसनुरे यांच्यासह इतर पदाधिकारी व सदस्यांचीही निवड जाहीर करण्यात आली. नवीन कार्यकारिणीमुळे तालुक्यातील कृषी व्यावसायिकांच्या प्रश्नांना योग्य दिशा मिळेल, व्यापार म्हणजे केवळ नफाच नव्हे तर ग्राहकांच्या सेवेसाठी प्रथम प्राधान्य असले पाहिजे ग्राहकांच्या मागणीचा कल पाहून त्यांच्या सेवेसाठी आमची संघटना तत्पर असेल तसेच शेतकरी व विक्रेते यांच्यात समन्वय अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### चर्मकार समाजासाठी भव्य सभागृह बांधू- सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील




**चाकूर :** चाकूर येथील चर्मकार समाजाच्या विविध सामाजिक कामासाठी त्यांच्या मागणीनुसार भव्य सभागृह बांधण्यासाठी नगरपंचायतने जागा उपलब्ध करून दिल्यानंतर लागलीच मी निधी देऊन भव्य सभागृह बांधू असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी चाकूर येथे केले. ते चाकूर येथे संत गुरु रविदास महाराज यांच्या ६४९ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सुखदेव महाराज, नामदेव कदम, उपनगराध्यक्ष साईप्रसाद हिप्पाळे ,माजी नगराध्यक्ष मिलिंदराव महालिंगे, नूतन जिल्हा परिषद सदस्य भानुदास पोटे, दयानंद सुरवसे , प्रदेश सरचिटणीस शिवानंद हैंगणे, नगरसेवक नितीन रेड्डी, शिवदर्शन स्वामी, पप्पन कांबळे, राम कसबे,संदीप शेटे, रवींद्र कुलकर्णी, रोहिदास वाघमारे, सचिन तोरे, सिद्धेश्र्वर पवार, संतोष माने, अमरदीप हाके पाटील सह विविध मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना सहकार मंत्री ना. पाटील म्हणाले की, रविदास महाराजांनी भक्तीतून मानवतेचा संदेश दिला.मन शुद्ध असेल तर चांगले कार्य करता येते असे रविदास महाराज म्हणतात.साहित्यातून समाजाला रविदास महाराजांनी उपदेश दिला. संत हे समाजासाठी जगत असतात असेही सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले. या कार्यक्रमाचे आयोजन जीवन हौसे, बाबुराव लोकरे, उद्धव सूर्यवंशी, राम शेवाळे, बालाजी गायकवाड ,परमेश्र्वर शिंदे, विजय धनेश्र्वर, विठ्ठल सूर्यवंशी, बालाजी सूर्यवंशी, बबलू कांबळे आदींच्या पुढाकारातून करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राम शेवाळे यांनी केले. कार्यक्रमास चाकूर व परिसरातील चर्मकार समाजाची विविध समाज बांधव व चाकूर शहरातील विविध मान्यवर मंडळी उपस्थित होते.

### सात विद्यार्थी एन एम एम एस परीक्षेमध्ये पास झाल्याने पं. स. सदस्याच्यावतीने सत्कार



**देवणी :** बोरोळ ता.देवणी येथील २०२५-२६ शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या इयत्ता आठवी वर्गासाठी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेली शिष्यवृत्ती योजना परीक्षा(छचचड).या परीक्षेत इयत्ता आठवी वर्गातील सूर्यवंशी लक्ष्मी,बापूने संस्कार, बिरादार अमृता, बिरादार प्रिया,नेलवाडे श्यनाम,गायकवाड सुहासिनी, मुळखेडे श्रद्धा हे सात विद्यार्थी पास झाले असून त्यांचा जिल्हा परिषद प्रशाला बोरोळ येथे जाऊन देवणी पंचायत समितीचे सदस्य गजानन भोपणीकर यांच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला व राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येत असलेल्या या परीक्षेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल भोपणीकर परिवाराकडुन आनंद व्यक्त करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या. तसेच राष्ट्रीय आविष्कार योजने अंतर्गत केरळ येथील अभ्यास भेट दौ-यासाठी जाऊन आलेली विद्यार्थीनी कुमारी जान्हवी सत्यदेव गरड हिचा सत्कार व अनिकेत संतोष पंढरपुरे या विद्यार्थीचा वाढदिवस साजरा करून सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शालेय समिती अध्यक्ष सत्यदेव गरड, काशिनाथ मामा शेंडगे, मु. अ. महेश तांदळे, ग्राम पंचायत सदस्य प्रताप कोयले, शालेय समिती सदस्य संतोष पंढरपुरे, बालाजी कोयले, शाकीर पठाण, दस्तगीर पठाण, शिक्षिका अर्चना फावडे, नागनाथ अलमले, बालाजी कापडे,यादव बालुरे, सत्यनारायण खिंडीवाले, खंडेराव सुर्यवंशी, श्री. व सौ. राजवाडे सह अदिंची उपस्थिती होती.

# उदगीरात भव्य शिक्षक साहित्य संमेलन

## शिक्षणाला साहित्याची जोड आवश्यक : माजी मंत्री, आ. संजय बनसोडे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०५ मार्च :** सृजनशील शिक्षक म्हणजे समाजाचा शिल्पकारआहे, शिक्षकांच्या लेखन-वाचन आणि अभिव्यक्तीला चालना मिळाली तर विद्यार्थ्यांमध्ये विचारशीलता, संवेदनशीलता आणि संस्कारांची बीजे रोवली जातात. साहित्य, शिक्षण व संस्कृती यांचा समन्वय घडविणारे असे उपक्रम ग्रामीण भागातील शिक्षकांना नवसंजीवनी देणारे ठरतात. आजच्या तंत्रज्ञानयुगातही मूल्याधिष्ठित शिक्षण देण्यासाठी शिक्षकांनी सर्जनशीलतेचा ध्यास घ्यावा,. शिक्षण क्षेत्र केवळ पुस्तकांच्या चौकटीत न अडकता साहित्य, कला आणि संस्कृतीच्या संगमातून अधिक समृद्ध व्हावे, यासाठी शिक्षकांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळणे अत्यावश्यक आहे, असे ठाम प्रतिपादन माजी मंत्री संजय बनसोडे यांनी

रंगकर्मी साहित्य, कला, क्रीडा प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी (दि. १ मार्च २०२६) स्व. शिवराज पाटील चाकूरकर साहित्य नगरी, लिंकन इंटरनॅशनल स्कूल येथे आयोजित भव्य शिक्षक साहित्य संमेलनात ते उद्घाटक म्हणून बोलत आसताना काढले.या

संमेलनाध्यक्षपदी प्राचार्य डॉ.




राजकुमार मस्के होते. विशेष उपस्थिती अभिनेत्री शीतल पाटील यांची लाभली. स्वागताध्यक्ष दिलीपकुमार राजेंद्र गायकवाड, प्राचार्य प्रमोद चौधरी, सिद्धेश्र्वर पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.समारोप व पारितोषिक वितरण सोहळासायंकाळी ४.३० वाजता समारोप व पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. यावेळी प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, अभिनेत्री शीतल पाटील तसेच धनंजय गुंडसूरकर (माजी सदस्य, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, मुंबई) उपस्थित होते.

सूत्रसंचालन अनिता येलमटे, ॲड. महेश मळगे यांनी केले; तर आभारप्रदर्शन सचिन शिवशेटे व हणमंत केंद्रे यांनी मानले.

सायंकाळी ४.३० वाजता समारोप व पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. यावेळी प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, अभिनेत्री शीतल पाटील तसेच धनंजय गुंडसूरकर (माजी सदस्य, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, मुंबई) उपस्थित होते.

सूत्रसंचालन अनिता येलमटे, ॲड. महेश मळगे यांनी केले; तर आभारप्रदर्शन सचिन शिवशेटे व हणमंत केंद्रे यांनी मानले. या प्रतिष्ठाणाचे

अध्यक्ष प्रा. बिभीषण मद्देवाड, सचिव प्रा. ज्योती मद्देवाड, कार्यवाह रसुल पठाण, सहकार्यवाह प्रा. रामदास केदार व हणमंत केंद्रे,नागनाथ गुट्टे,रसुल पठाण प्रा. रामदास केदार ,रसुल पठाण , लक्ष्मण बेंबडे , दादाराव दाडगे, ॲड. महेश मळगे , नीता मोरे, सचिन शिवशेट्टे ,जहांगीर पटेल ज्ञानेश्र्वर बडगे,हणमंत केंद्रे ,संदीप निडवदे यांच्या परिश्रमातून संमेलन यशस्वी झाले.

शिक्षक, साहित्यप्रेमी व नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे उदगीरमध्ये सर्जनशीलतेचा हा सोहळा ऐतिहासिक ठरला.

**परिसंवादातून 'मराठी शाळांचा' भविष्यवेध घेतला.**

दुपारी दुसऱ्या सत्रात स्व. दि. ली. होळीकर व्यासपीठावर मराठी शाळा : काल-आज आणि उद्या - आधुनिक शिक्षणातील तंत्रज्ञान, शिक्षकांची भूमिका व कर्तव्य या विषयावर परिसंवाद रंगला.

अध्यक्षस्थानी डॉ. श्रीपाद सिमंतकर होते. डॉ. विठ्ठल गोरें व पुंडलिक मुळे यांनी बदलते शैक्षणिक प्रवाह, तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव आणि मराठी शाळा टिकविण्यासाठी आवश्यक उपाययोजना यावर प्रभावी मांडणी केली.

मराठी शाळांचे अस्तित्व टिकवण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत डिजिटल साधनांचा योग्य वापर आवश्यक असल्याचे मत व्यक्त झाले.या कार्यक्रमाचे प्रभावी सुत्रसंचलन हणमंत केंद्रे यांनी तर आभार ज्ञानोबा मुंडे यांनी मानले

**गुरूजनांच्या कवितांनी रंगला काव्यमहोत्सव**

साहित्य संमेलनाच्या तिसर्या सत्रात स्व. प्राचार्य कवी व्यंकटेश चौधरी व्यासपीठावर गुरूजनांचे कविसंमेलन रंगले. अध्यक्षस्थानी शिक्षण विस्तार अधिकारी राजू मेश्राम होते.

डॉ. सुशीलकुमार चिमोरे, अंबादास केदार, डॉ. कामाक्षी पवार, अनीता खडके, नीता मोरे, प्रा. ज्ञानेश्र्वर हंडरगूळीकर, प्रा. व्यंकट सूर्यवंशी, डॉ. नरसिंग कदम, तुकाराम हारगिले, रेश्मा शेख, शंकर राठोड, रंजना गायकवाड आदी कवी-शिक्षकांनी आपल्या ओजस्वी, भावस्पर्शी आणि सामाजिक आशयाच्या कवितांनी सभागृह दुमदुमून सोडले.

कविसंमेलनाने प्रेक्षकांची मने जिंकत शिक्षकांच्या अंतर्मनातील सर्जनशीलतेचा सुरेल आविष्कार घडविला.

**५ हजार दुर्मिळ पोस्ट तिकिटांचे व गड-किल्ल्यांच्या प्रतिकृतींचे प्रदर्शन**

संमेलनाचे आणखी एक आकर्षण म्हणजे युनेस्को जागतिक वारसा यादीतील गड-किल्ल्यांच्या प्रतिकृती आणि तब्बल ५ हजार दुर्मिळ पोस्ट तिकिटांचे तसेच विज्ञान प्रदर्शन. सकाळी ९.३० वाजता या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. महादेव खळुरे यांनी प्रदर्शनाचे नियोजन पाहिले.

## प्राचार्या ॲड. सविता मुरुमकर यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**कासार शिरसी, दि. ०५ मार्च :** निलंगा तालुक्यातील कासार येथील श्री करीबसवेश्वर माध्य. व उच्च माध्यमिक शाळेच्या प्राचार्या ॲड. सविता संभाजीराव मुरूमकर यांना भारतीय साहित्य अकादमी नवी दिल्ली यांच्या वतीने २०२५-२६ च्या विरांगणा सावित्रीबाई फुले नॅशनल फेलोशिप आवार्ड या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरीची दखल घेऊन या संस्थेने ही निवड केली आहे. या सन्मानाबद्दल विविध स्तरातून मुरूमकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ॲड. मुरूमकर यांना या पूर्वीही त्यांच्या समाज कार्याबद्दल अनेक पुरस्कानी त्यांना सन्मानित



करण्यात आले आहे. मुरुमकर यांच्या सर्व पातळीवरील शैक्षणिक, सामाजिक, राष्ट्रीय कार्याची दखल घेऊन त्याचा सन्मान होत आहेत. त्यांना मिळालेल्या सन्मानासाठी सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठित बस्वरत्न पुरस्कार, प्रशालेतील अतुलनीय योगदानाबद्दल आदर्श प्राचार्या, कोविड काळात कोरोना योद्धा असे अनेक पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आले आहेत.

**ॲड. मुरूमकर यांचे कार्य**

ॲड. मुरूमकर हे शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी मोफत वाचनालय चालवत आहेत. संविधान जागर अंतर्गत संविधानाचे वाटप.सुशिक्षित बेरोजगारांना रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कार्य. मतदान जनजागृती. अंधश्रध्दा निर्मूलनात सक्रिय सहभाग. व्यसनमुक्तीसाठी व्याख्याने व चर्चासत्रे. स्वच्छता अभियान. बालसंगोपन व कुपोषणमुक्त मुले असे अनेक कार्य ॲड. मुरूमकर हे करत असतात. त्यांच्या या शैक्षणिक व सामाजिक पातळीवरील कार्याची दखल घेऊन या पुरस्कारासाठी त्यांची ही निवड करण्यात आली होती.

## रब्बी हंगामातील तुर पिकांची येरोळ, शिरूर अनंतपाळच्या शेतकऱ्यांनी केली पाहणी

### परळीच्या सेलु गावच्या शेतकऱ्याचा १५ एकरचा तुरीचा यशस्वी फड



**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ दि. ०५ मार्च :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ आणि शिरुर अनंतपाळ येथील शेतकऱ्यांनी परळी तालुक्यातील सेलू येथील प्रगतिशील शेतकरी नामदेव कांशे यांनी रब्बी हंगामात तब्बल १५ एकर वर नवीन जातीच्या लाल तुर पिकाची यशस्वी लागवड केली असून, ती पाहण्यासाठी येरोळ आणि शिरूर अनंतपाळ येथील शेतकऱ्यांनी पहाणी दौरा केला.

परळी पासून जवळच असलेल्या सेलू येथील शेतकरी नामदेव कांशे या शेतकऱ्यांने स्वताच्या पंधरा एकर शेतीमध्ये दरवर्षी शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी विविध पिकाच्या माध्यमातून शेतीत भरघोस उत्पादन घेतात गेल्या वर्षी तेलंगणा राज्यातून लाल तुर या पिकाच्या नवीन जातीचे रब्बी हंगामात येणारे तुरचे बियाणे आनुन चार एकर मध्ये पेरा केला असता या शेतकऱ्यांला एकरी बारा क्विंटल उत्पादन मिळाले त्यामुळे यंदा रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी तब्बल पंधरा एकर वर तुर पिक पेरा केला आहे याची माहिती येरोळ येथील शेतकरी भिवाजी लोकरे यांना मिळाली त्यामुळे येरोळ व शिरुर अनंतपाळ येथील शेतकऱ्यांनी परळी व सेलू येथील शेतकरी नामदेव कांशे यांच्या पंधरा एकर वर घेतलेल्या तुर पिकांची पाहणी केली रब्बी हंगामात पाऊस नसल्याने या पिकावर धुईसह रोगराई प्रादुर्भाव परिणाम होत नाही सदरचे पिक फुलोरा,फळ अवस्थेत जोरदार वाढताना पाहावयास मिळाले शिवाय तुर पिकाला बाजारात भाव पण चांगला आसतो त्यामुळे सदरील तुर पिक पाहून त्याची माहिती घेऊन शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करित सदरील शेतकऱ्यांकडे पुढील हंगामात उत्पन्न घेण्यासाठी बियाणे बुकिंग केले ऊसापेक्षा हे पिक कमी मेहणतीत कमी पाण्यावर चांगले उत्पन्न मिळवून देते असे शेतकरी नामदेव कांशी यांनी माहिती दिली.

यावेळी चेअरमन रामकिशन गड्डिमे,भिवाजी लोकरे, अशोक कोरे,गुंडेराव चौसष्टे,गुंडेराव सांगवे,ओम बेबंळगे, सुधीर येरोळकर,प्रा. प्रभाकर चोचंडे, राघवेंद्र कुलकर्णी, महेश पोदार,पत्रकार शिवानंद भुसारे,यांच्या सह शेतकरी उपस्थित होते.

## ९ मार्चपासून जिजाऊ-सावित्री व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ०५ मार्च :** समाजात विवेकी व्यक्ती घडवणे आणि विवेकी समाजव्यवस्थेकडे वाटचाल करणे या उदात्त हेतूने अहमदपूर येथे 'जिजाऊ-सावित्री व्याख्यानमाला-२०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, वीर भगतसिंह विद्यार्थी परिषद, डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, वंचित वनवासी आघाडी व सर्व परिवर्तनवादी संघटनांच्या वतीने या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असून

यंदाचे हे २० वे वर्ष आहे. ही व्याख्यानमाला सोमवार, दिनांक ९ मार्च ते बुधवार, दिनांक ११ मार्च २०२६ या कालावधीत स्थानिक संस्कृती मंगल कार्यालय, कॉलेज रोड, अहमदपूर येथे दररोज सायंकाळी ६:०० वाजता संपन्न होणार आहे.

या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प




सोमवार, ९ मार्च रोजी यवतमाळ येथील मिथकशास्त्र अभ्यासक व संस्कृती संशोधक स्नेहाताई टोम्ये गुंफणार असून, त्या 'स्त्री-काल आज आणि उद्या!' या विषयावर आपले विचार मांडतील. त्यानंतर मंगळवार, १० मार्च रोजी पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते पैगंबर शेख हे 'शिव, फुले, शाहू, आंबेडकरी चळवळ आणि आजचा तरुण' या विषयावर प्रबोधन करतील. व्याख्यानमालेचा समारोप बुधवार, ११ मार्च रोजी होणार असून यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार 'वारकरी विचार, स्वराज्याचा जयजयकार आणि संविधानाचा स्वीकार' या विषयावर आपले मत मांडणार आहेत.

माणूस जेव्हा विवेकाचा खून करून कर्मकांडात अडकतो, तेव्हा तो स्वतःच्या बरबादीवर खुश होतो; हीच परिस्थिती बदलण्यासाठी आणि समाजात वैचारिक क्रांती घडवण्यासाठी या व्याख्यानमालेचा प्रपंच करण्यात आला असल्याचे आयोजकांनी निमंत्रण पत्रिकेत नमूद केले आहे. तरी अहमदपूर तालुक्यातील सर्व नागरिकांनी आणि विचारवंतांनी या व्याख्यानमालेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विनीत समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## जय पराजयाची व्याख्या विद्यार्थ्यांनी समजून घ्यावी : एस बी पवार

### मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती व काव्यवाचन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०५ मार्च :** आज समाजामध्ये कायद्याची प्रक्रिया, कायदे, याबद्दल सामान्य लोकांना माहिती नाही. जेव्हा जेव्हा माणसावर संकट येतात तेव्हा त्यांना कायद्याबद्दलचे ज्ञान असेल, किंवा सकस, बुद्धीला चालना देणारे ग्रंथ त्यांनी वाचले असतील, तर तो त्या संकटावर मात करू शकतो, यातून ज्ञान घेऊन आपण जे जगतो तेच आपले खरे आयुष्य असते हे समजून घ्यावे. मी अजून जिंकलो नाही कारण शर्यत अजून संपलेली नाही. मी अजून हरलो नाही कारण मी आणखी थांबलो नाही. हा विचार लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी कष्ट करत रहावे यश हमखास मिळेल. जय पराजयाची व्याख्या विद्यार्थ्यांनी समजून घेतली पाहिजे, असे मत अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. एस.बी. पवार यांनी व्यक्त केले. ते निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात मराठी भाषा व साहित्य विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, तालुका विधी सेवा समिती व विधिज्ञ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

ते पुढे म्हणाले की कायद्याची भाषा मराठी असावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. विविध कायदे निर्माण झाले परंतु त्याची खरी ओळख सर्वसामान्य समाजाला झालेली नाही. लहान मुला संदर्भातील लैंगिक अत्याचार, छेडछाड याबाबत संरक्षण देणारा कायदा (पोक्सो कायदा) तसेच कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ निवारण कायदा (पॉश कायदा) याची गरज आज निर्माण झाली आहे. एक काळ होता की स्त्री चूल आणि मूल याच्या पलीकडे नव्हती. पण आज सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिला काम करतात, त्यामुळे असे कायदे निर्माण झालेले आहेत.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम उपस्थित होते. त्यांनी मराठी साहित्यातील दर्जेदार साहित्याचे वाचन या पिढीने करावे व एका पिढीने ते दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करावे, असा सल्ला दिला. मराठी विभाग प्रमुख डॉ. भास्कर गायकवाड यांनी वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या वाङ्मयीन कार्याचा परिचय देऊन मराठी भाषा गौरव दिनाचा उद्देश स्पष्ट केला.

विचार मंचावर दिवाणी न्यायालयातील न्यायाधीश श्री.आर. व्ही.पांडे, विधीज्ञ मंडळाच्या श्रीमती. व्ही. व्ही. कुलकर्णी, श्री.एच.डी. अलमले, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. विठ्ठल सांडूर, प्रा. शिवरुद्र बदनाळे यांची उपस्थिती होती.

दुपारच्या सत्रात झालेल्या काव्यवाचन स्पर्धेत कु.सावरे तनुजा, कु.मोहिते पायल, कु.श्रद्धा परांडे,कु. शिवदीक्षा सुरवसे या विद्यार्थिनींनी



आपल्या कविता सादर केल्या. कवितेची निर्मिती ही प्रतिभेशिवाय होत नाही. लयबद्धता, सुचकता, अल्पाक्षरत्व या घटकातून कवितेची निर्मिती होत असते. हा विचार काव्यवाचन स्पर्धेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसमोर स्पष्ट झाला. शिवजयंती निमित्त वाणिज्य विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरणही यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मराठी विभाग प्रमुख डॉ .भास्कर गायकवाड, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.अजित मुळजकर, डॉ.ज्ञानेश्वर चौधरी,हिंदी विभागाचे डॉ. गोविंद शिवशेट्टे, डॉ. विजय कुलकर्णी, प्रा. मनीषा घोगरे, प्रा. मनीषा गायकवाड, प्रा. सपना मोरे, प्रा. दुर्गेश्वरी चौथवे, श्री. सुनील वाकळे व मराठी भाषेवर प्रेम करणारे अनेक विद्यार्थी उपस्थित होते. काव्यस्पर्धेचे सूत्रसंचालन व आभार डॉ. गोविंद शिवशेट्टे यांनी मानले.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तुळजापूरात लॉजवर नेऊन महिलेवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**

एका ३० वर्षीय महिलेवर लॉजवर नेऊन लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका गावातील ३० वर्षीय महिलेवर (नाव व गाव गोपनीय) दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे १२ वाजता एका तरुणाने तिला लॉजवर नेऊन लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली.



या प्रकरणी पीडित महिलेने दि. ५ मार्च २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ६४, ७९ तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### पलक वरवटेची 'इन्स्पायर अवॉर्ड'साठी निवड

**उमरगा, दि.६ मार्च -**

आयएसओ मानांकित व मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळवलेल्या टोबॅको फ्री जिल्हा परिषद हायस्कूल, उमरगा येथील इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी पलक वरवटे हिची 'इन्स्पायर अवॉर्ड'साठी निवड झाली आहे. पलक हिने ऑटोमॅटिक इरिगेशन विथ स्मार्ट न्यूट्रिएंट डिटेक्टर हा प्रकल्प सादर केला असून या प्रकल्पासाठी तिला दहा हजार रुपयांचे अनुदान मिळणार आहे. या प्रकल्पासाठी विज्ञान शिक्षिका भाग्यश्री पंडित, विद्यानंद सुत्रावे तसेच अटल तालुका समन्वयक ताज्योद्दीन सरवडे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शकुंतला मोरे, आ. प्रवीण स्वामी, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, शिला मुदगडे, अमर वरवटे, अशोक पतगे, सदानंद शिवदे-पाटील, सुजाता मोरे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे व सर्व शिक्षकांनी पलकचे अभिनंदन केले.

### सृष्टी पाटीलचे सी.ए. पदवी प्रदान

**नळदुर्ग, दि.६ मार्च -**

नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील कार्यालयीन अधीक्षक धनंजय पाटील यांची कन्या सृष्टी धनंजय पाटील हिने वाणिज्य शाखेतील सर्वोच्च सी.ए. पदवी प्राप्त केल्याबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



सृष्टीचे प्राथमिक शिक्षण तुळजामाता इंग्लिश स्कूल, तुळजापूर येथे झाले. तर अकरावी-बारावीचे शिक्षण तिने शाहू महाविद्यालय, लातूर येथे पूर्ण केले. पुढील उच्च शिक्षण तिने पुणे येथे घेतले असून सध्या ती अमेरिकन कंपनी मास्टरकार्डमध्ये नोकरी करत आहे. तिच्या या यशाबद्दल माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, उल्हास बोरगांवकर, रामचंद्र आलुरे, बाबुराव चव्हाण यांच्यासह प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, उपप्राचार्य डॉ. अशोक कदम, डॉ. शिवाजी घोडके, डॉ. एन.बी. जाधव तसेच शिक्षक, कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



### बिभीषण शिंदे यांना पुरस्कार

**खामसवाडी, दि.६ मार्च -**

कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जगदंबा माध्यमिक विद्यालयातील विज्ञान विषयाचे शिक्षक बिभीषण शिंदे यांना डॉ.सी.व्ही. रमण जिल्हास्तरीय विज्ञान शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार जिल्हा अध्यापक विज्ञान मंडळ, धाराशिव यांच्या वतीने दिला जातो. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर अशोक शेळके, मुख्याध्यापिका सावंत, अनंत गर्जे, आबाराव पाटोळे आदींनी शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन शिंदे यांचा सत्कार केला. शिक्षक आ. विक्रम काळे यांनी शिंदे यांच्या घरी भेट देऊन सहपत्नींसह त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी दिलीप पाटील, श्रीमंत पाटील, सुनील पाटील, राम शेळके आदी उपस्थित होते.

### वैष्णवीची 'इन्स्पायर अवॉर्ड'साठी निवड

**तुळजापूर, दि.६ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील आपसिंगा येथील नरेंद्र आर्य विद्यालयातील विद्यार्थिनी कु. वैष्णवी नागेश कोल्हे हिच्या प्रयोगाची इन्स्पायर अवॉर्ड मानांकन २०२५-२६ साठी निवड झाली आहे.



विद्यालयाच्या अटल लॅबच्या समन्वयक अनुष्का मसलेकर यांच्या उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण मार्गदर्शनामुळे ही निवड शक्य झाली. तसेच तिला गणित शिक्षिका लता पवार आणि विज्ञान शिक्षक प्रकाश मगर यांचेही मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक जयराज सूर्यवंशी तसेच नरेंद्र आर्य शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी वैष्णवीचे अभिनंदन केले आहे.


# 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' अभियान सुरू

### जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत शिबिरे; नागरिकांच्या महसूल विषयक तक्रारींचे तत्काळ निराकरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या दैनंदिन प्रश्नांचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान (टप्पा-१) राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत शिबिरे आयोजित करण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या अभियानाअंतर्गत भोगवटादार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित करून अद्ययावत ७/१२ वाटप, 'जिवंत ७/१२' मोहिमेद्वारे प्रलंबित नोंदींची दुरुस्ती, सामाजिक अर्थसहाय्य योजनांतील लाभार्थ्यांचे अर्ज व मंजुरी आदेशांचे वितरण आदी कामे करण्यात येणार आहेत.




तसेच तुकडेबंदी कायद्यांतर्गत व्यवहारांची गावनिहाय यादी तयार करून फेरफार नोंदी अद्ययावत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शिबिरांमध्ये प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती, ७/१२ वरील चुका दुरुस्त करणे, विविध प्रमाणपत्रांचे अर्ज स्वीकारणे व वितरण, कमी-जास्त पत्रके तयार करून गाव नमुने अद्ययावत करणे आदी सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. याशिवाय ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक नोंदणी, पीएम किसान, तक्रार निवारण कक्ष, समाधान ॲप, आपले सरकार पोर्टल व पीजी पोर्टलवरील तक्रारींचे निवारणही करण्यात येणार आहे.

अभियानादरम्यान महसूल कायद्यातील नव्या सुधारणांबाबत जनजागृती करण्यात येणार असून महाभूमी पोर्टलवरील क्यूआर कोडयुक्त डिजिटल ७/१२ ची वैधता तसेच सनद प्रणालीतील बदल याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. याशिवाय नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा), आयुष्यमान कार्ड वितरण, रेशनकार्ड दुरुस्ती, कृषी सेवा, बँक व पोस्ट सेवा आदी सुविधा शिबिरांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या अभियानात लोकप्रतिनिधी व प्रशासनाची भूमिका महत्त्वाची असून खासदार, आमदार, जिल्हा परिषद व पंचायत समिती पदाधिकारी, सरपंच तसेच महिला बचत गट व स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घेण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी सर्व विभागांनी समन्वयाने कार्यवाही करून हे अभियान प्रभावी व लोकाभिमुख पद्धतीने राबवावे, असे निर्देश दिले आहेत.

## अतिक्रमण कारवाईदरम्यान स्वच्छता निरीक्षकाला मारहाण



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**

अतिक्रमण काढण्याच्या कारवाईदरम्यान स्वच्छता निरीक्षकास शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वैजीनाथ शामराव सुरवसे (रा. तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी दि. ५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तुळजापूर येथील जुने बसस्थानक पाठीमागील पाण्याच्या टाकीजवळ अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईदरम्यान गोंधळ घातला.

त्या वेळी दत्तात्रय रामभाऊ साळुंखे (वय ५८, व्यवसाय - स्वच्छता निरीक्षक, नगरपरिषद तुळजापूर, रा. विश्वासनगर तुळजापूर) हे सुमारे ९० कर्मचाऱ्यांसह अतिक्रमण काढण्याचे काम करत होते. त्यावेळी आरोपीने तुम्ही कोणाच्या आदेशाने अतिक्रमण काढता? असे म्हणत शिवीगाळ केली व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून बघून घेतो अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

याप्रकरणी दत्तात्रय साळुंखे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## घरफोडीत सोन्याचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**

ढोकी पोलीस ठाणे हद्दीत घरफोडीची घटना घडली असून अज्ञात चोरट्याने घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख ६८ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत सुखदेव सोलार वाघमारे (वय ६५, रा. जवळे दु., ता.जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अज्ञात व्यक्तीने दि.२० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ ते २१ फेब्रुवारी रोजी वाघमारे यांच्या राहत्या घराचा कडी-कोंडा तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील सोन्याचे दागिने व ५३ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण १,६८,५०० रुपयांचा माल चोरी करून नेला.



याप्रकरणी सुखदेव वाघमारे यांनी दि.५ मार्च रोजी दिलेल्या तक्रारीवरून ढोकी पोलीसात गुन्हा दाखल केला.

## शिवजयंती नाचून नाही तर वाचून साजरी करा : प्रा. विशाल गरड

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.६ मार्च -**

अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार आत्मसात करायचे असतील तर शिवजयंती नाचून नव्हे तर वाचून साजरी झाली पाहिजे, असे प्रतिपादन इतिहासकार व थोर व्याख्याते प्रा. विशाल गरड यांनी केले.

खामसवाडी येथील शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व आजचा युवक या विषयावरील लोकव्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शिवजयंती समितीचे श्रीकांत बाकले, अक्षय शेळके, अमर शेळके, बलराम कुलकर्णी, प्रशांत सुरवसे आदींनी प्रा. गरड यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार केला. तसेच जिल्हा परिषद शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.



पुढे बोलताना प्रा. गरड म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ राजे नव्हते तर ते राजतज्ञ, अर्थतज्ञ, अभियंता व वास्तुतज्ञ असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. लहान वयातच त्यांनी स्वराज्याचे स्वप्न पाहिले आणि लोकशाही पद्धतीची बीजे स्वराज्यात रुजवली. त्यामुळे रयत सुखी होती. आजच्या तरुण पिढीने मोबाईल व सोशल मीडियाच्या आहारी न जाता शिवाजी महाराजांचा अभ्यास करून त्यांचे विचार आत्मसात करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

या लोकव्याख्यान कार्यक्रमाला विद्यार्थी, युवक, महिला व गावातील अनेक नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीकांत बाकले, विशाल शेळके, संतोष शेळके, बलराम कुलकर्णी तसेच दत्ता शेळके, प्रज्योत माने, अक्षय शेळके, अतुल शेळके, रवी सावंत, अजहर बेग आदींनी परिश्रम घेतले.

## नळदुर्गमध्ये शिव-बसव-राणा जन्मोत्सवास उत्साहात प्रारंभ



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ मार्च -**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, समाजसुधारक महात्मा बसवेश्वर महाराज आणि शौर्याचे प्रतीक वीर महाराणा प्रतापसिंह या तीन महापुरुषांच्या प्रतिमांची प्रतिष्ठापना करून दि.४ मार्च रोजी नळदुर्ग येथे शिव-बसव-राणा सार्वजनिक जन्मोत्सवास मोठ्या उत्साहात प्रारंभ करण्यात आला. यानिमित्त भव्य शोभायात्रा काढून महापुरुषांच्या प्रतिमांची प्रतिष्ठापना करण्यात आली.

सालाबादप्रमाणे यंदाही नळदुर्ग येथे शिव-बसव-राणा सार्वजनिक जन्मोत्सव समितीच्या वतीने दि.४ ते ७ मार्च या कालावधीत या तीन महापुरुषांची जयंती एकत्रित साजरी केली जात आहे. दि.४ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता लोकमान्य वाचनालय येथून हलग्यांच्या नादात भव्य शोभायात्रेला प्रारंभ झाला. शोभायात्रेत घोड्यावर स्वार होऊन बालकांनी शिवाजी महाराज, बसवेश्वर महाराज आणि महाराणा प्रताप यांच्या वेशभूषेत सहभाग घेतला होता. लहान मुलांची ही वेशभूषा शोभायात्रेचे मुख्य आकर्षण ठरली. तसेच भगवे फेटे परिधान करून महिलाही या शोभायात्रेत सहभागी झाल्या.

ही शोभायात्रा लोकमान्य वाचनालय येथून निघून राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, शास्त्री चौक, भवानी चौक, श्रीराम मंदिर, सावरकर चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक, मल्लिकार्जुन मंदिर, चावडी चौक, महात्मा बसवेश्वर चौक मार्गे पुन्हा भवानी चौकात पोहोचली. तेथे शोभायात्रेचे विसर्जन करण्यात आले. यानंतर भवानी चौकातील मंडपात नगराध्यक्ष बसवराज धरणे, नगरसेवक दत्तात्रय दासकार, तानाजी जाधव, सुधीर पोतदार, शशिकांत पुदाले, आकाश कुलकर्णी, प्रविण गायकवाड, नगरसेविका मिनाक्षी काळे, अपर्णा बेडगे, सुमन ठाकुर, राणी सुरवसे, कमल गायकवाड यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून प्रतिष्ठापना करण्यात आली. कार्यक्रमात समितीचे अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, उपाध्यक्ष संदीप गायकवाड, ओमकार कदम, कोषाध्यक्ष संतोष पुदाले, सचिव राजकुमार वैद्य, सांस्कृतिक प्रमुख प्रमोद जाधव व सुरेखा जाधव यांनी समितीच्या वतीने मान्यवरांचा सत्कार केला.

या कार्यक्रमास सुधीर हजारे, किशोर नळदुर्गकर, रमेश जाधव, धीमाजी घुगे, विलास येडगे, भीमाशंकर बताले, रणजित डुकरे तसेच शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते. तसेच दि.७ मार्च रोजी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

## तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याला २३ लाखांचे पॅकेज




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**

मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे महत्त्व ओळखून तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातून पदवी घेतल्याचा अभिमान असून महाविद्यालयात मिळालेल्या सॉफ्टवेअर प्रशिक्षणामुळेच कंपनीत त्वरित निवड होऊन २३ लाखांचे वार्षिक पॅकेज मिळत असल्याचे गौरवोद्गार माजी विद्यार्थी ढोणे यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना त्यांनी सॉलिडवर्क्स, कॅटिया, सीरिओ यांसारख्या सॉफ्टवेअरचे मूलभूत प्रशिक्षण विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे सांगितले. तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये प्लास्टिक मोल्डिंगसारख्या क्षेत्रात डिझाईन सॉफ्टवेअरचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी पदवीबरोबरच कौशल्याधारित सहा ते नऊ महिन्यांचे अभ्यासक्रम पूर्ण करावेत, असा सल्लाही त्यांनी दिला.

यावेळी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गरजेनुसार महाविद्यालयात इनपुट कोर्सेस व मोफत प्लेसमेंट प्रशिक्षण दिले जात असल्याचे सांगितले. शैक्षणिक डीन व मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ. डी. डी. दाते यांनी एआय आधारित सॉफ्टवेअरमधील कौशल्याचे महत्त्व अधोरेखित केले.

# धाराशिव येथे ५०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाचे काम तातडीने पूर्ण करा : पालकमंत्री सरनाईक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**

धाराशिव येथे रुग्णांना दर्जेदार व आधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणाऱ्या ५०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

मंत्रालयात पार पडलेल्या संयुक्त आढावा बैठकीत त्यांनी या लोकहितकारी प्रकल्पाचे काम निर्धारित वेळेत व उच्च गुणवत्तेने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, या रुग्णालयाचे काम रुग्णसेवेचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण केले जावे. तसेच पुढील काही दिवसांत हे रुग्णालय सर्वसामान्य जनतेसाठी खुले करण्याचे नियोजन करावे. धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांना आधुनिक व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी या उद्देशाने सुमारे ३६० कोटी रुपये खर्चून ५०० खाटांचे अत्याधुनिक जिल्हा रुग्णालय उभारण्यास शासनाने मान्यता दिली आहे.



पालकमंत्री सरनाईक आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या प्रकल्पाच्या आढावा बैठकीत रुग्णालयाच्या बांधकामासाठी आवश्यक निधी, तांत्रिक अडचणी आणि कामाच्या प्रगतीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

प्रस्तावित रुग्णालयाची मुख्य इमारत तीन मजली असून तिचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ४५ हजार चौ.मी. आहे. या प्रकल्पात कॅन्टीन, धर्मशाळा, लॉन्ड्री, मॉर्च्युरी, फार्मसी इमारत, पार्किंग व्यवस्था, गॅस मॅनिफोल्ड रूम व ऑक्सिजन प्लांट, तसेच बायोमेडिकल वेस्ट व्यवस्थापनासाठी स्वतंत्र सुविधा उभारण्यात येणार आहेत. याशिवाय वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांचीही व्यवस्था करण्यात येणार आहे. काम अधिक सुनियोजित आणि जलद गतीने पूर्ण व्हावे यासाठी रुग्णालय इमारत व निवासस्थानांसाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही मंत्र्यांनी दिले.

रुग्णालय परिसरात अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा व मलनिस्सारण व्यवस्था, अग्निशमन यंत्रणा, सौर ऊर्जा प्रणाली, पावसाचे पाणी साठवण (रेन वॉटर हार्वेस्टिंग), पार्किंग आणि हरित परिसर विकासाची कामे करताना ती गुणवत्तापूर्ण पद्धतीने व पुढील दोन दशकांच्या गरजा लक्षात घेऊन करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

धाराशिव जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याने काम करताना गुणवत्तेला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले. या रुग्णालयाच्या माध्यमातून गरजू नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट साध्य व्हावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.




या बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## लातूर तालुक्यात हरंगुळ मंडळातील टाकळी (शि) येथे समाधान शिबीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०६ मार्च :** राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लातूर तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्रमांक-१ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पहिले शिबीर हरंगुळ महसूल मंडळात शनिवार, ७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता मौजे टाकळी शि. येथे आयोजित करण्यात आले आहे. या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी आढावा घेतला. सर्व संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

शेतकरी आणि नागरिकांना त्यांच्या हक्काच्या शासकीय सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्यासाठी या शिबिरात विविध १६ विभागांचे स्वतंत्र स्टॉल्स लावण्यात येणार आहेत. यामध्ये महसूल व पुरवठा विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न, जात, रहिवासी आणि राष्ट्रीयत्व, प्रमाणपत्र क्रिमिलियर इत्यादी प्रमाणपत्रांचे वाटप. नवीन रेशन कार्ड वितरण, रेशन कार्ड दुरुस्ती आणि ई-केवायसी सुविधा पुरविल्या जाणार आहेत. कृषी व पशुसंवर्धन विभागामार्फत ग्री स्टॅक, फार्मर आयडी मधील त्रुटी दूर करणे, बी-बियाणे व खतांची माहिती आणि पशुधनाचे लसीकरण आदी सेवा, तर पंचायत समिती मार्फत विहीर साठी अर्ज, इत्यादी व आरोग्य विभागामार्फत नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, औषधोपचार आणि साथरोगांबाबत जनजागृती केली जाणार आहे. तसेच यावेळी पीक कर्ज वाटपाबाबत मार्गदर्शन, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची माहिती, वनसंवर्धन आणि महावितरणच्या वीज कनेक्शनबाबतच्या तक्रारींचे निवारण केले जाणार आहे.



# लातूर जिल्हा पोलीस दलात आणखी चार आधुनिक फॉरेन्सिक व्हॅन दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०६ मार्च :** महाराष्ट्र पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाच्या धोरणांतर्गत लातूर जिल्हा पोलीस दलाच्या तपास यंत्रणेला बळकटी देण्यासाठी आणखी चार आधुनिक फॉरेन्सिक व्हॅन लातूर जिल्हा पोलीस दलात दाखल झाल्या आहेत. या व्हॅनमुळे गुन्ह्यांच्या तपास प्रक्रियेत वैज्ञानिक पद्धतींचा अधिक प्रभावी वापर करता येणार असून गुन्हे उघडकीस आणण्यास तसेच न्यायालयीन प्रक्रियेत सबळ पुरावे सादर करण्यास मोठी मदत होणार आहे.

यापूर्वी लातूर पोलीस दलाकडे तीन फॉरेन्सिक व्हॅन कार्यरत होत्या. त्या माध्यमातून अनेक गंभीर व गुंतागुंतीच्या गुन्ह्यांच्या घटनास्थळी तात्काळ भेट देऊन तेथील भौतिक पुरावे शास्त्रीय पद्धतीने गोळा करण्यात आले आहेत. घटनास्थळी उपलब्ध असलेले बोटांचे ठसे, रक्ताचे नमुने, शस्त्राचे अवशेष, विविध भौतिक पुरावे तसेच इतर वैज्ञानिक नमुने संकलित करून त्यांचे योग्य प्रकारे जतन व विश्लेषण करण्यात येत असल्यामुळे गुन्ह्याच्या तपासाला दिशा मिळत आहे. या पुराव्यांच्या आधारे न्यायालयात आरोपीविरुद्ध सबळ व भक्कम पुरावे सादर करण्यात येत असून अनेक प्रकरणांमध्ये आरोपींना शिक्षा होण्यास मदत मिळाली आहे.

आता नव्याने दाखल झालेल्या चार फॉरेन्सिक व्हॅनमुळे जिल्ह्यातील कोणत्याही गुन्ह्याच्या घटनास्थळी तात्काळ पोहोचून वैज्ञानिक पद्धतीने तपास कार्यवाही करण्याची क्षमता अधिक वाढणार आहे. घटनास्थळी मिळणारे सूक्ष्म पुरावे सुरक्षितरीत्या गोळा करून त्यांचे योग्य दस्तऐवजीकरण करण्याची सुविधा या व्हॅनमध्ये उपलब्ध आहे. त्यामुळे गुन्ह्याचा तपास अधिक अचूक, पारदर्शक व परिणामकारक होण्यास मदत होणार आहे.

फॉरेन्सिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे गुन्ह्यांच्या तपासात पारंपरिक पद्धतींसोबतच आधुनिक वैज्ञानिक पद्धतींचा वापर वाढत आहे. यामुळे केवळ गुन्हे उघडकीस आणणेच नव्हे तर निर्दोष व्यक्तींवर अन्याय होऊ नये यासाठीही महत्त्वाची भूमिका बजावली जाते. तसेच न्यायालयीन प्रक्रियेत वैज्ञानिक पुराव्यांना अधिक विश्र्वासार्हता असल्याने आरोपींना शिक्षा होण्याची शक्यता वाढते. महाराष्ट्र पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेअंतर्गत लातूर जिल्हा पोलीस दल सातत्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत असून गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यास कटिबद्ध आहे. या नव्या फॉरेन्सिक व्हॅनमुळे जिल्ह्यातील तपास यंत्रणा अधिक



सक्षम होणार असून गुन्हे उघडकीस आणण्याची गती व अचूकता वाढणार आहे.

एकंदरीत, आधुनिक फॉरेन्सिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून गुन्हे तपास अधिक सक्षम करण्यासाठी लातूर पोलीस दलाने उचललेले हे पाऊल महत्त्वपूर्ण ठरणार असून कोणताही गुन्हेगार कायद्याच्या कचाट्यातून सुटणार नाही, असा विश्वास पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी व्यक्त केला आहे.

## विविध वृत्त...

### सहकारमहर्षी शिवाजीराव नाडे यांच्या स्मरणार्थ विविध सामाजिक उपक्रम

**लातूर :** मुरुड येथील सहकार महर्षी स्व. शिवाजीराव नाडे यांच्या स्मरणार्थ मुरुडमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले.त्यात मुरुडच्या आठवडी बाजारात बोअरवेल्स घेऊन त्यात मोटार पंप टाकण्यात आला. बाजारात येणाऱ्या शेतकरी, व्यापारी यांच्यासाठी दोन ठिकाणी पाण्याच्या मोठ्या टाक्या बसऊन पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली. तसेच जनता विद्या मंदिर प्रशालेत इयत्ता नववीतील सर्व मुलींची रक्त तपासणी करण्यात आली. आठवीतील मुलांना उन्हाळी टोप्याचे वाटप करण्यात आले. तर पाचवीतील मुलांना पाणी बॉटल वाटप करण्यात आल्या. तसेच १०० फळरोपाचे वाटपही यावेळी विद्यार्थ्यांना करण्यात आले. या सर्व कार्यक्रमाचे नियोजन क्षेत्र विकास समितीचे सचिव प्रवीण पाटील यांच्यामार्फत करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचीव ॲड. विजय पाटील, प्रशासकीय अधिकारी अमर मोरे, सहसचिव विवेक पांगळ, मुख्याध्यापक डी. व्ही. जाधव, पर्यवेक्षिका श्रीमती तनुजा कोष्टी यांसह शिक्षक, शिक्षिका विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमर इंगळे यांनी केले. दशरथ बर्डे यांनी सहकारमहर्षी यांच्या कार्याची माहिती दिली.

### परिमल विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत यश

**लातूर :** परिमल शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित परिमल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील ६९ विद्यार्थी एन.एम.एम.एस. परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. त्याबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे परिमल शिक्षण प्रसारक मंडळाचे, सचिव बी. एस. जाधव, प्राचार्य श्रीनिवास जाधव पाटील, पर्यवेक्षक शेळके, मुळे, शेलमोहेकर, विभाग प्रमुख गजरे, पालक आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्वांचे कौतुक केले. या विद्यार्थ्यांमध्ये जान्हवी भागवत अंबुरे १४४ गुण, रुद्र रमाकांत दळवे १३८ गुण, अनिता रुपचंद पाटील १२७ गुण, पार्थ सुधाकर कदम, अजित बाळासाहेब मुळे प्रत्येकी १२४ गुण, आदर्श राजेश देसाई १२२ गुण, दिव्या नामदेव कोलपुसे १२० गुण, पांडुरंग वेंकटराव देवकते, संग्राम गोविंदराव यादव, प्रणव दत्तात्रय डिगोळे प्रत्येकी ११४ गुण, श्रेयश बाळकृष्ण देशपांडे ११२ गुण, समर्थ सचिदानंद चव्हाण १११ गुण, आरुष अभिजित धनेगावे १०९ गुण, समर्थ शंकर जाधव, अदिती दयानंद वाडीकर प्रत्येकी १०८ गुण, कृष्णा बालाजी मोराळे १०२ गुण, सोहम सतीश नवटके, प्रताप दत्तात्रय सोनवणे प्रत्येकी १०१ गुण, आदित्य अभिमन्यू सूर्यवंशी, दिशा मनोज मुंगळे प्रत्येकी १०० गुण मिळवले आहेत. २८ डिसेंबर रोजी संपूर्ण राज्यभरात घेण्यात आलेल्या राष्ट्रीय दृष्ट्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठीच्या या परीक्षेत विद्यार्थी उत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमी असताना सुद्धा परीक्षेचे पूर्वनियोजन, अंमलबजावणी, ज्यादा ताशीका, सराव परीक्षा, इत्यादी माध्यमातून केलेल्या परिपूर्ण तयारीतून विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखून स्पर्धा परीक्षेतील लातूर पॅटर्नला साजेशी गुणवत्ता सिद्ध केली आहे.

### लातूर जिल्ह्यातील एस.टी. आगारांमध्ये प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिनाचे आयोजन

**लातूर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत प्रत्येक आगारात प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन साजरा करण्यात येत आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यातील पाच आगारांमध्ये साजरा करण्यात येणाऱ्या प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिनाच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. संबंधित तारखेला सकाळी १० ते सांयकाळी २ वाजेपर्यंत प्रवासी राजा दिन आणि दुपारी ३ ते सांयकाळी ५ वाजेपर्यंत कामगार पालक दिन साजरा होणार आहे. अहमदपूर येथे ११ मार्च, २०२६ रोजी, निलंगा येथे १८ मार्च, २०२६, लातूर येथे २५ मार्च २०२६, उदगीर येथे १ एप्रिल २०२६, औसा येथे ८ एप्रिल, २०२६ रोजी राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक हे प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिनाला उपस्थित राहतील.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

## लातूर जिल्ह्यातील नागरिकांनी व्हॉट्सॲप चॅटबॉटद्वारे अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०६ मार्च :** राज्य शासनाच्या महसूल विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानांतर्गत लातूर जिल्ह्यात मंडळनिहाय एकदिवसीय समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाचा उद्देश शेतकरी व सामान्य नागरिकांच्या महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न, तक्रारी व अर्ज गतीने निकाली काढणे, डिजिटल सेवांचा विस्तार करणे आणि जनतेला एकाच दिवशी सेवा पुरवणे हा आहे. याकरिता नागरिकांनी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या व्हॉट्सॲप चॅटबॉटद्वारे अर्ज करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे.



या शिबिरांतर्गत प्रलंबित फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क, लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत मार्गदर्शन, अकृषक तरतुदींसंदर्भात सल्ला, डिजिटल सातबारा सुविधा, कमी-जास्त पत्रक तयार करून गाव दप्तर अद्ययावत करणे, तुकड्याच्या नोंदणीकृत दस्तऐवजाची नोंद कब्जेदार सदरी घेणे, इतर हक्कातील नोंद कमी करून भोगवटदार सदरी घेणे, संपादीत केलेल्या खाजगी व्यक्तीचे नाव कमी करून संपादीत यंत्रणेचे नाव भोगवटदार सदरी घेणे, अकृषी सातबारा वेगळा करणे, सामाजिक अर्थसहाय्याचे अर्ज स्वीकारणे व मंजुरी आदेश वाटप करणे अशा प्रमुख सेवांचा समावेश आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी व्हॉट्सॲप चॅटबॉट (क्रमांक ९५२९०९३०२२) सुरू करण्यात आला आहे. या चॅटबॉटच्या माध्यमातून तसेच सोबत जोडलेल्या क्यूआर कोडद्वारे नागरिक आपल्या अडचणी, तक्रारी किंवा अर्ज थेट सादर करू शकतात. यामुळे शिबिरांमध्ये येण्यापूर्वीच पूर्वनोंदणी व मार्गदर्शन मिळेल, ज्यामुळे प्रक्रिया अधिक गतिमान होईल. तरी सर्व नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा आणि शिबिरांमध्ये जास्तीत जास्त सहभाग घेऊन आपल्या प्रलंबित महसूली बाबींचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले आहे.

### शिबिरांचे प्राथमिक वेळापत्रक

- ७ मार्च २०२६ हरंगुळ बु. (लातूर), किनीथोट (औसा), पोहरेगाव (रेणापूर), औराद शहाजनी (निलंगा), किनगाव (अहमदपूर) इत्यादी.
- १४ मार्च २०२६ बाभळगाव (लातूर), बेलकुंड (औसा), कारेपूर (रेणापूर), हलगरा (निलंगा), नळेगाव (चाकूर) इत्यादी.
- १० एप्रिल २०२६ गातेगाव (लातूर), भादा (औसा), पानगाव (रेणापूर), शिरुर ताजबंद (अहमदपूर) इत्यादी.
- १७ एप्रिल २०२६ कासारखेडा (लातूर), उजनी (औसा), पळशी (रेणापूर), निटूर (निलंगा), आष्टा (चाकूर) इत्यादी.
- ८ मे २०२६ जिल्ह्यातील प्रमुख नगर परिषद/नगर पंचायत स्तरावर शिबिरे (लातूर, औसा, रेणापूर, निलंगा, देवणी, शिरुर अनंतपाळ, अहमदपूर, चाकूर, उदगीर, जळकोट)

## लातूर जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी १६ मार्च रोजी, पंचायत समित्यांच्या सभापती पदांसाठी ९ मार्च रोजी निवडणूक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०६ मार्च :** महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम ११(१) आणि ५९(१) नुसार, सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ पहिल्या बैठकीपासून सुरू होतो. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार लातूर जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची पहिली बैठक २० मार्च २०२६ पूर्वी आयोजित करण्यात येणार आहे.

याअनुषंगाने लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदांची निवड १६ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजता होणार आहे. तसेच, लातूर जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या सभापती आणि उपसभापती पदांची निवडणूक ९ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजता होणार आहे.

लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदांची निवडणूक प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या यशवंतराव सभागृहामध्ये पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी लातूरच्या अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांची पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, लातूर जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या सभापती आणि उपसभापती पदांच्या निवडणुका संबंधित पंचायत समितीच्या सभागृहात घेण्यात येणार असून, संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांची पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडणूक प्रक्रियेसाठी संबंधित पीठासीन अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सदस्यांना आवश्यक नोटिसा निर्गमित केल्या असून, सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहून प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांनी केले आहे.

### अटल विद्यार्थी व शिक्षक जिल्हास्तरीय प्रकल्प प्रदर्शन दयानंद कलात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०६ मार्च :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे, महाराष्ट्र, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरुड, दयानंद कला महाविद्यालय, लातूर व रोटरी क्लब, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अटल विद्यार्थी व शिक्षक जिल्हास्तरीय प्रकल्प २०२५-२६ चे प्रदर्शनाचे आयोजन दयानंद कला महाविद्यालयात करण्यात आले होते . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मारुती सलगर होते, या प्रदर्शनाचे उद्घाटन श्री संजय पंचगल्ले (सहाय्यक शिक्षण संचालक) यांच्या हस्ते करण्यात आले.श्री संजय पंचगल्ले यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात विद्यार्थ्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारावा, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नवनिर्मिती करावी, असे आवाहन केले.

# ई-चलनच्या जाचाविरोधात वाहतूकदारांचा रणसंग्राम; आरटीओ कार्यालयाला वेढा

## प्रवेशद्वारावर चक्का जाम तर अधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या; प्रशासकीय कामकाज ठप्प

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०६ मार्च :** सरकारच्या चुकीच्या ई-चलन प्रणालीने सामान्य वाहन मालकांचे कंबरडे मोडले असून, या अन्यायाविरोधात महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटीने राज्यव्यापी आंदोलन छेडले आहे. लातूर जिल्ह्यातील वाहतूकदार संघटनांनी आज आक्रमक पवित्रा घेतला. प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर शेकडो वाहने उभी करून चक्का जाम करण्यात आला, तर आक्रमक आंदोलकांनी थेट प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या दालनासमोर ठिय्या मांडून जोरदार घोषणाबाजी केली. दंडाची लूट थांबवा, अन्यथा खुर्च्या खाली करा, अशा घोषणांनी आज आरटीओ परिसर दणाणून गेला होता.



आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकाळी १० वाजल्यापासूनच शेकडो खासगी बस, टॅक्सी आणि टेम्पो मालकांनी परिवहन कार्यालयाबाहेर गर्दी करण्यास सुरुवात केली. पाहता पाहता कार्यालयाच्या मुख्य गेटवर गाड्यांचा खच पडला आणि आत येण्या-जाण्याचे सर्व मार्ग बंद झाले. संघटनेचे पदाधिकारी आणि संतप्त वाहतूकदार थेट परिवहन अधिकाऱ्यांच्या दालनात शिरले. दालनाबाहेरच त्यांनी ठिय्या दिला, ज्यामुळे अधिकाऱ्यांनाही आपल्या केबिनमधून बाहेर पडणे मुश्किल झाले होते.

आंदोलकांचे नेतृत्व करणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या मते: दंडाची सक्ती वसुली: गाड्यांचे फिटनेस सर्टिफिकेट, परमिट रिन्यूअल किंवा हस्तांतरण करायचे असल्यास, जुने सर्व ई-चलन भरल्याशिवाय सॉफ्टवेअर पुढे जात नाही. यामुळे मालकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

तांत्रिक गोंधळ: अनेकदा सिग्नलवर गाडी नसताना किंवा केवळ तांत्रिक चुकीमुळे हजारो रुपयांचे दंड चुकीच्या पद्धतीने पडत आहेत. या तक्रारींकडे आरटीओ प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला. अव्वाच्या सव्वा दंड: एका लहान चुकीसाठी ५ ते १० हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जात असल्याने, गाडी चालवून मिळणाऱ्या नफ्यापेक्षा दंडाची रक्कमच जास्त होत आहे.

काळ्या फिती लावून निषेध आंदोलनादरम्यान अनेक वाहन मालकांनी आपल्या वाहनांना काळ्या फिती बांधून सरकारच्या डिजिटल लुटीचा निषेध केला. आम्ही कर भरतो, विमा भरतो, मग आम्हाला गुन्हेगारांसारखी वागणूक का? असा सवाल उपस्थित केला.

दोन ते तीन तास चाललेल्या या हायव्होल्टेज ड्राम्यानंतर आरटीओ प्रशासनाने आंदोलकांशी चर्चा केली. ई-चलन ही राज्यस्तरावरील ऑनलाईन प्रणाली आहे, त्यात स्थानिक स्तरावर बदल करणे कठीण आहे, असे स्पष्टीकरण अधिकाऱ्यांनी दिले. मात्र, आंदोलक आपल्या मागणीवर ठाम होते. जोपर्यंत चुकीचे दंड रद्द करण्याबाबत लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत कार्यालय सोडून न जाण्याचा पवित्रा त्यांनी घेतला होता.

**मागण्यांचे निवेदन सादर:**

विनाकारण पडलेले आणि तांत्रिक त्रुटी असलेले ई-चलन त्वरित रद्द करावेत. दंडाची रक्कम भरण्यासाठी हप्ते पाडून द्यावेत किंवा रकमेत सवलत द्यावी. थकीत दंड असल्यामुळे परमिट किंवा पासिंग अडवू नये.

आता चेंडू सरकारच्या आणि परिवहन विभागाच्या कोर्टात असून, हे आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या आंदोलनामुळे आरटीओमधील कामासाठी आलेल्या सामान्य नागरिकांचे मात्र प्रचंड हाल झाले. आंदोलनात लातूर जिल्हा ट्रॅव्हल्स असोसिएशन, लातूर जिल्हा युवा मोटार मालक संघ, लोकनायक मोटार चालक मालक संघ आणि खासगी वाहन चालक मालक मोठ्या संख्येने सहभागी होते. प्रशासनाने आंदोलनाची दखल घेत तात्काळ ई-चलन प्रणाली रद्द करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा जुगलकिशोर तोष्णीवाल, संदीप पाटील, उत्तम लोंढे, खय्युम शेख, विजय केदार, विश्वास कुलकर्णी, सचिन मोटे, सुनिल देशपांडे, गोविंद दायमा, मदन केंद्रे, सोमनाथ मेदगे, इनायत सय्यद, नरेश घंटे, अमोल लोकरे यांनी दिला आहे.